

फाशी बखळ \ रत्नाकर मतकरी
मेहता पब्लिशिंग हाऊस
मेहता पब्लिशिंग हाऊस



काशी खिचक

रत्नाकर मतकरी

मेहता पब्लिशिंग हाऊस

All rights reserved along with e-books & layout. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, without the prior written consent of the P ublisher and the licence holder. P lease contac us at **Mehta Publishing House,** 1941, Madiwale Colony, Sadashiv Peth, Pune 411030.

✆ +91 020-24476924 / 24460313

Email : info@mehtapublishinghouse.com production@mehtapublishinghouse.com
sales@mehtapublishinghouse.com

Website : www.mehtapublishinghouse.com

या पुस्तकातील लेखकाची मते, घटना, वर्णने ही त्या लेखकाची असून त्याच्याशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

PHASHI BAKHAL by RATNAKAR MATKARI

फाशी बखळ : रत्नाकर मतकरी / कथासंग्रह

© सौ. प्रतिभा मतकरी

राधा निवास, टिळक रोड, दादर, मुंबई - ४०००१४.

E-mail : matkari_ratanakar@yahoo.co.in

प्रकाशक : सुनील अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे - ४११०३०.

अक्षरजुळणी : एच्. एम्. टाइपसेटर्स, ११२०, सदाशिव पेठ,
पुणे -४११०३०.

मुद्रक : स्पेक्ट्रम ऑफसेट, डी-२/४, सत्यम इस्टेट,
सीडीएसएसच्या मागे, एरंडवणे, पुणे - ४११००४.

प्रकाशनकाल : २५ ऑक्टोबर, १९७४ / मार्च, २००८ / डिसेंबर, २००८ / ऑगस्ट, २०१० जानेवारी, २०१३/
पुनर्मुद्रण : मार्च, २०१६

मुखपृष्ठ : चंद्रमोहन कुलकर्णी

किंमत : ` १२०/-

P Book ISBN 9788177669503

E Book ISBN 9789386454225

गूढकथेचे प्रयोजन

एक पाद्री एका निग्रो सद्गृहस्थाच्या घरी गेला. त्या घरात वयात येऊ घातलेली एक मुलगी होती. म्हणून पाद्र्याने त्या मुलीच्या आईला विचारले, ''हिला काही धर्म, काही नीती वगैरे शिकवता की नाही?'' बाईने सांगितले, ''फादर, मी हिला सारे नीतीशास्त्र शिकवले आहे.'' पाद्रीला आश्चर्यच वाटले. पंधरा-सोळाची ही टीचभर मुलगी आणि तिला आख्खे नीतीशास्त्र शिकवले! म्हणून चाचणीसाठी त्याने मुलीला प्रश्न विचारला, ''पोरी, नीतीचे मूलतत्त्व काय?'' पोरीने उत्तर दिले, ''फादर, कुणाला, कुठे आणि केव्हा नाही म्हणायचे, हे कळणे म्हणजे नीती कळणे आणि योग्य ठिकाणी नाही म्हणणे म्हणजे नीतीप्रमाणे वागणे.'' पाद्रीबुवा आ वासून त्या चिमुरडीकडे पाहातच राहिले. थोड्या वेळाने तोंड मिटून ते म्हणाले, ''बाई, तुझी नीतीची व्याख्या मला काही बायबलमध्ये कुठे आढळली नाही, पण ती सोपी आहे आणि खरीपण आहे. याच व्याख्येप्रमाणे वाग. देव तुझे भले करील...'' मोझेसला सिनाईच्या शिखरावर देवाने दहा धर्माज्ञा दिल्या होत्या. त्यांतील '**दाऊशॅल्ट नॉट'चे हे निग्रो भाषांतर. साधे, सोपे आणि सुटसुटीत.**

गोष्ट विनोदी असली, तरी सत्य आहे. तीमधील नकारापासून कोणाचीही सुटका नाही. माणूस कळपाची अवस्था मागे टाकून समाजात राहू लागला आणि त्याबरोबरच त्याच्या पाठीमागे नीतीचे शुक्लकाष्ठ लागले *(कळप व समाज या दोहोंतील फरक ज्ञात्यांना कळावा.)* . नीतीबरोबरच या नकाराचे लोढणे त्याच्या गळ्यात पडले. हे विधान जरा विचित्र दिसेल, पण नीतीचे मूळ शोधले की, त्यातील सत्य पटावे. नीती - नीती म्हणजे तरी काय? सहजप्रवृत्तींचा नैसर्गिक प्रवाह रोधून त्याला वेगळ्या मार्गाला लावणारे बांध म्हणजे नीती. हे नवे मार्ग समाजोपयोगी असतात, म्हणून समाजात राहणाऱ्या प्रत्येकाला त्यांचे बंधन स्वीकारावे लागते. काही स्वच्छेने ती बंधने स्वीकारतात, काही दंडाच्या भीतीने त्यांचे जोखड मानेवर वागवतात. उरलेले? त्यांच्याबद्दल बोलणे नको. सापडले तर समाज त्यांना दंड करतो. न सापडले तर समाजात राहून ते कळपकालीन सुखे चोरून भोगतात. पण समाजातील बहुतांश लोकांना ही बंधने पाळावी लागतात. म्हणूनच मग एखादा 'बच्चन' आक्रोश करतो :

> " वेद लोकाचार प्रहरी, ताकते हरचाल मेरी |
> बद्ध इस वातावरण में, क्या करे अभिलाष यौवन |"

ही बंधने सुखद नसतात. सहजप्रवृत्ती एकीकडे धावते. तिला अडवायचे, म्हणजे मनाला शीण होतो, त्याची घालमेल होते, त्याला कष्ट पडतात. म्हणून मानसशास्त्र तिच्या उन्नयना *(Sublimation)* चा मार्ग सांगते. ज्यांना तो साधतो, ते सुखी होतात. ज्यांना तो साधत नाही, त्यांच्यापाठची घालमेल व कुतरओढ सुटता सुटत नाही. रामदासांनी मोझेससारखे अनेक 'दाऊशॅल्ट नॉटस्' आपल्या मनाला 'मनाचे श्लोकात' सुनावले होते. त्यांचीही घालमेल झाली असावी. तिचे पडसाद आपल्याला 'करुणाष्टका'त ऐकू येतील.

जिथे रामदासांची ही कथा, तिथे इतरांचे काय होत असेल? त्यांचेही जीवन 'हे नको, ते नको' या बंधनांत करकचून निघते. सहजप्रवृत्तींना आवरता आवरता त्यांची दमछाक होते. त्यांच्या मनाचा कोंडमारा होतो. प्रत्येक सहजप्रवृत्तीची एक सहचारी भावना असते. प्रवृत्ती कोंडली की, तीही कोंडली जाते आणि तिला वाव मिळाला नाही की, माणसाच्या मनात वेगवेगळे कॉम्प्लेक्सेस तयार होतात. या कॉम्प्लेक्सेसमधूनच पुढे मानसिक विकृतींचा प्रादुर्भाव होतो. ही आपत्ती टाळण्यासाठीच सर्व दाबलेल्या प्रवृत्तींना मुक्त वाव मिळावा म्हणून धर्मांनी काही सण शोधून काढले. सॅटर्नेलिया, एप्रिल फूल, शिमगा आर्दी असे सण होत. पण या सणांत निचरा होई तो असंस्कृत माणसांच्या भावनांचा. माणूस सुसंस्कृत झाला आणि त्याने ह्या निचऱ्यासाठी सुसंस्कृत मार्ग शोधून काढले. त्यातूनच साहित्याचा जन्म झालेला दिसेल. वर 'शोधून काढले' असा कर्तरी प्रयोग केला आहे. खोलात शिरले तर त्याला साहित्याचा 'शोध लागला' हे क्रियापद अधिक बरोबर असल्याचे आढळून येईल. असो.

साहित्य आले, म्हणजे काय झाले? जीवनात मानवाच्या सर्व भावभावनांना आविष्काराचा वाव मिळत नाही. राग आला की, माणसाला युद्ध करावेसे वाटते. आधी गद्यात वादावादी मग गुद्द्यांनी मारामारी. पण ही इच्छा झाली की, कोणीतरी तार सुरात त्याला बजावतो, 'नको रे मना क्रोध हा खेदकारी.' म्हणून जीवनात युद्धोर्मी उसळली, तरी तो विरते. नाही तर तिला प्रयत्नपूर्वक विरवावे लागते. तिला योग्य तो वाव मिळतच नाही. म्हणून मानव युद्धाची वर्णने ऐकतो, लिहितो, वाचतो. ह्या

साहित्याच्या वाचन-मननाने त्याच्या युद्धोमोंचा थोड्याबहुत प्रमाणात निचरा होतो. जो गोष्ट क्रोधाचो, तीच कामाची. त्याला जीवनात विमुक्त वाव नाही. निदान मानसिक पातळीवर तरी त्याला वाट मिळावी, म्हणून माणसे शृंगारिक वाङ्मयाकडे वळतात. डोळ्यांसमोर रूपाचे ताटवे फिरतात. जीवन हिडिंबेबरोबर कंठावे लागते, म्हणून त्या रूपाच्या तांड्याशी प्रत्यक्षात सन्निकर्ष तर दूरच, संभाषणही नाही; अशा जीवनात ते वाङ्मय काही दिवास्वप्ने (सूज्ञ वाचकांपुरते चांगल्या अर्थाने. उल्लूभाईंच्या बाबतीत प्रश्नचिन्हे) उभी करतात. त्या स्वप्नांनी अवरुद्ध कामाचा निचरा होतो. माणसे अनिष्ट कॉम्प्लेक्सेसना बळी पडत नाहीत. साहित्यशास्त्र शोकांतिकेच्या अनुबंधात कॅथार्सिसचा सिद्धांत मांडते. तो सर्व भावनांनादेखील तेवढाच लागू आहे. जीवनात सर्व भावनांच्या कॅथार्सिसची आवश्यकता असते. वाङ्मय ते कॅथार्सिस घडवून आणते. ही त्याची महत्ता होय. खोलवर विचार केला तर भावना व रस यांचा परस्परांशी असलेला संबंध सहज स्पष्ट होईल. म्हणूनच, मग एखादा महाकवी 'नवरसी भरवी सागरु' म्हणून शारदेची प्रार्थना करतो.

प्राचीन साहित्यात कटाक्षाने या सर्व कॅथार्टिक रसांना वाव दिलेला आढळेल. रामायण, महाभारत, कथासरित्सागर, फार कशाला खुद्द एकनाथी रामायण, या व अशाच सर्व महाग्रंथांत सर्व 'येरा रसा पंक्तिकरा'चा योग्य तो 'मानु' राखलेला दिसतो तो यामुळे. एकनाथांनी तर लंकाकांडात बीभत्सालाही स्थान दिलेले आढळते. परवा-परवापर्यंत आपल्या साहित्यात हे सर्व प्रकार सापडत; पण मध्येच इंग्रजी अंमल आला. त्याबरोबर इंग्रजी साहित्य आपल्याकडे आले. त्यामुळे आपल्या साहित्यिक आवडीनिवडी बदलल्या. आपल्या साहित्यात वास्तवाला महत्त्व आले. त्यातील अवास्तव-अतिवास्तवाचा जमाना संपला. रत्नाकर मतकरी यांच्या लिखाणाने मराठी लेखणी पुन्हा एकदा त्या प्रांतांत शिरलेली दिसते. ते भीतीला आवाहन करून कथा लिहितात. भीती म्हणजे काय? स्वत:च्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला की, जी भावना बळावते तिला 'भीती' म्हणतात. हा धोका जेव्हा ज्ञात असतो, तेव्हा भीती वाटते. पण त्याबरोबरच रागही येतो. त्यामुळे त्या धोक्याच्या प्रतिकाराचे प्रयत्न आपण करतो. याउलट तो धोका जेव्हा अज्ञात असतो, तेव्हाच आपल्याला खरी भीती काय ते कळते. या अर्थाने अज्ञान हे सर्व भीतीचे उगमस्थान होय. एकेकाळी माणसे ग्रहणाला भीत. त्याला दुश्चिन्ह समजत. त्यानंतर येणाऱ्या अशुभाच्या आशंकेने सारे भयाकुल होत. आज? आज ग्रहण म्हणजे काय हे आपल्याला कळते. म्हणून आपण ग्रहणाला भीत नाही. जशाजशा या व अशा ज्ञानाच्या मर्यादा वाढतील, तशीतशी आपली ही भीतीही कमी होईल. पण आज तरी एक प्रांत असा आहे की, जो आणखी अनेक शतके अज्ञातच राहणार आहे. तो म्हणजे मरणापलीकडचा प्रांत. माणसाला कालही तो अज्ञातच होता, आजही अज्ञात आहे व उद्याही अज्ञातच राहणार आहे. मतकरी यांच्या कथा या प्रांतात वावरतात आणि म्हणून त्या कथा वाचताना भीती वाटते. अनेकांना त्या भयकथा वाटण्याचा संभव आहे; पण त्या निव्वळ भयकथा नाहीत. त्यांना गूढतेचे एक अस्तर आहे. त्यांच्या कथात भुते आहेत; पण त्यांच्या कथा लौकिक अर्थाने भुताच्या कथा नाहीत. त्या तशा गोष्टी कोणत्याही खेड्यात आजही शेकड्यांनी ऐकायला मिळतात. सांगणारा छातीवर हात ठोकून सांगतो. गोष्टी सत्य असल्याचे साक्षीपुरावे देतो. ऐकणारा स्तिमित होऊन ऐकतो. पण गोष्टीचा गोषवारा काय? चकवा असला, तर याला भटक भटक भटकवले. वाटाड्या असला, तर त्याला अमावास्येतली अंधारी वाट दाखवली. समंधाने सोम्याला झपाटले. खवीसाने गोम्यापाशी अबीर चादर मागितली. या मर्यादेपलीकडे त्यातील रहस्य जात नाही. कुठेकुठे भानामतीच्या गोष्टी ऐकू येतात. या घरातले कपडे पेटले, त्या घरात अन्नात घाण कालवली. मतकरी यांच्या कथांचा पल्ला यापलीकडचा आहे. त्यांच्या कथांत भूत भुताच्या कथा सांगते. प्राध्यापक शाळिग्रामांना फाशीच्या बखळीत भूत भेटते. ते त्याला फाशी देतात आणि शेवटी.... सारेच अजब! पण अजब वाटत नाही तो प्राध्यापकांचा गिल्ट कॉम्प्लेक्स - 'मी! मी स्वत: असे कसे केले! मी एका माणसाला फाशी जायला मदत केली - मी त्याला फासावर लटकवले. कुठला कोण माणूस? त्याचा-माझा काय संबंध? पण मी त्याचे मरण - माझ्या हातांनी - माझ्या स्वत:च्या हातांनी - नाथाला भीती मुळीच वाटत नव्हती. फक्त एक विलक्षण जाणीव! अपराधाची! स्वत:च्या हातून दुष्कृत्य घडल्याची!' - हे वाचले की प्राध्यापक का झपाटले गेले ते कळते, त्यांचा शेवट काय याची कल्पना येते; पण कल्पना येत नाही ती कथेच्या शेवटाची. प्रश्न येतो त्यांना दिसले काय? दिसले ते दिसले कसे? हे सारेच गूढ आहे आणि म्हणूनच भयंकर आहे, भयोत्पादक आहे. त्यातील भयावहता गोष्टीच्या सुरुवातीमुळे अधिक गडद होते. सुरुवातीला गोष्टीत आपण वाचतो ते गाढ मैत्रीचे हृद्य वर्णन. टीन-एज् मैत्री, पोरींवर बाण मारणारी, एकत्र अभ्यास करणारी, एका टेबलाभोवती बसून चहा पिणारी मैत्री. त्या मैत्रीचा परिपाक काय?... इथेच गूढ गूढतर होते आणि नेमकी त्यामुळेच भीतीलाही भीती वाटते.

आरंभान्तातील असा विरोध हा मतकरी यांच्या कथांचा एक स्थायीभाव आहे. 'सोडवणूक' ही गोष्ट घ्या. सिंधू-जनार्दन संवाद वाचला की कौटुंबिक सुखाचे एक तरल सुंदर चित्र डोळ्यांसमोर साकारते आणि शेवट काय? तर वन्संच्या भुताने केलेले वहिनीचे बाळंतपण. सुंदराकडून भयंकराकडील ही वाटचाल अधिक भयंकर आहे. मुलाचा सांगाडा काय? थडगं खणायला लावणारी रंगूताई काय? प्रचंड पिंपळ काय? हे सारे सवाई भयंकर भासते, ते या आरंभान्तातील विरोधामुळे. परंतु त्यातील पात्रपरिपोषाला कुठे तडा गेलेला दिसत नाही. त्यामुळे ते आणखी भयंकर होते. 'प्रिया' ही तिसरी भूतकथा. सुरुवातीचा संवाद ना. सी. फडक्यांच्या कुठल्याही प्रणयरम्य कादंबरीत खपून जाईल; पण शेवट? चौथी भूतकथा म्हणजे 'झाड'. ते तर कुणा एका कारकुनाचे आत्मचरित्र आहे. दोन लाखांचे घबाड गुंडाळून तो फरारी होतो. आता कुठे तरी जाऊन आरामात चैन करायची, हा त्याचा उद्देश. गाव सापडले, घर मिळाले, सारे छान झाले. पण शेवट? शेवट पुन्हा विचित्र! शेवटच्या धक्क्याने वाचक अक्षरश: कोलमडतो. कथाकाराचे अवघे कौशल्य या कथेत स्पष्ट होते. पडावातील संध्याकाळ मळकट आणि उदासवाणी. धक्क्यावर काळोख. सावल्यांमधून अचानक पुढे आलेली घोडागाडी. चेहरा न दाखविणारा, भाडे न घेता चालता होणारा मूक गाडीवान! जुने गंजलेले फाटक. मोडकळीला आलेले जुनाट घर आणि त्या घराच्या अंगणात पहारा करीत उभे असलेले ते सरळसोट झाड. अथपासून इतिपर्यंत सारेच वातावरण गूढ आहे आणि म्हणूनच भयोत्पादक आहे. वाचकाला मोह पडतो तो त्या भयाचा. असो.

या संग्रहातील साऱ्याच कथा भुताच्या नाहीत. त्यात एक 'साधा माणूस'ही आहे; पण हा साधा माणूस देवमाणूस दिसतो. खून न करता तो स्वत:ला खुनी ठरवून घेतो. त्याचा हा सिडने कार्टन वाणाचा त्याग फलद्रूप होतो का? नीला सुखी होते का? कथेतून तशी सूचना मिळत नाही. सुभाषचे प्रेम आंधळे नाही. हिशोबी आहे. त्याला नीलाचा पैसा हवा होता. त्या पैशापोटीच त्याने अण्णासाहेबांचा खून केला. नीलाला हे माहीत आहे. असे जोडपे सुखी होईल का? समजा, झाले आणि मध्येच बकुळीच्या अपुऱ्या हाराचा वास उसळला तर? तर काय होईल? मतकरी याबद्दल काहीच सांगत नाहीत आणि सांगत नाहीत म्हणूनच बरेचसे सुचवतात. कथेतील बकुलीचा हार कळला, तरच केशवचा सिडने कार्टन अवतार कळतो आणि तो कळला की मन विषण्ण होते.

'फॅन्टॅस्टिक' ही कथा फॅन्टॅस्टिकच आहे. स्टोरी रायटर आणि राणी लालजीला ठार करू पाहतात. पण तो? तो सरणावर जिवंत होतो. वाचकाला वाटते गोष्ट संपली; पण तिचे शेपूट वळवळते आणि त्याचे फटके बसले की वाचकाला 'फॅन्टॅस्टिक'शिवाय दुसरे विशेषण सुचतच नाही. लालजीचे खरेच झाले काय? तो वाचला का मेला? हे ज्याला पहिल्या फटक्याला कळले, तो वाचक खरा वाचक.

गोष्टीत भूत नाही आणि भविष्य नाही. खून नाही नि दरोडा नाही आणि तरीही ही अशी गोष्ट मात्र भयंकर. अशी गोष्ट म्हणजे 'हडळ'. पहिल्याच परिच्छेदात गोष्टीचे भयाण वातावरण उभारते. पुढचे वर्णन अठरा विश्वे दारिद्र्याचे. त्यानंतर दिसते ती एक दरिद्री आई आणि तिच्या आसन्नमरण मुलाची रुग्णशय्या आणि या सर्वांत फुलते ते त्या दु:खी आईचे हताश भयदारुण वात्सल्य. मुलगा जाणार, त्याला भडाग्नी तर दिला पाहिजे. लाकडे तर नाहीत. म्हणून आई दुसऱ्या एका प्रेताच्या जळत्या चितेतील लाकडे चोरते. ते बघणारे तिला हडळ समजून पळतात. गावात एकच कालवा होतो. 'हडळ इलीहा, हडळ इलीहा?' आणि ती पोराच्या भडाग्नीची तयारी करणारी आई घरी येऊन पाहते, तर मुलगा अंथरुणात उठून बसलेला. तिला हाका मारतोय, 'आये...' 'हडळ आसंय रे मी - तुजी आये न्हई - हडळ आसंय, हडळ' असे म्हणत ती रडू लागते. इथे वाचक भांबावतो. संभाव्य सत्य, भीषणता, वात्सल्य, कारुण्य आणि विनोद या साऱ्यांच्या या सुंदर संगमात काय करावे, हेच त्याला कळत नाही आणि ते कळत नाही, यातच त्या कथेचे वैशिष्ट्य आहे.

अशा या कथा : भीषण, करुण, गूढ, भयंकर आणि तरीही सुंदर. सुंदर हे विशेषण या कथांना लावावे का? रूढार्थाने कदाचित या संदर्भात हे विशेषण समर्पक वाटणार नाही; पण सुंदर ह्या शब्दाचा मानसशास्त्रात एक वेगळा अर्थ आहे. जे ज्याला आवडते, ते त्याच्यापुरते सुंदर असते. या अर्थाने या कथा सुंदर आहेत. पुन्हा एक प्रश्न उभा राहतो. या कथा कुणाला आवडतात का? या प्रश्नाचे उत्तर 'हो आवडतात, अनेकांना आवडतात,' हेच आहे. पुन्हा एक प्रश्न : का आवडतात? ह्या वाचताना सुख होत नाही. झाला तर त्रासच होतो. एका बैठकीत संग्रहातील साऱ्या कथा वाचणारा वाचक विरळा. वाचन रात्री करावयाचे असेल, तर तो एक प्रसंगच. मुंबईच्या रात्रीत काही तरी बरे; पण किर्र रानातील एखाद्या सरकारी डाक बंगल्यामध्ये या कथा कुणी वाचू जाईल तर! तरीही या कथा सुंदर आहेत. कारण या कथांनी भयाच्या भावनेचे कॅथार्सिस होते. त्या भावनेला आपल्या जीवनात मुक्त वाव मिळत नाही. आपल्याला रोज रोज छळणारी भीती! ती दैनंदिन

जीवनातील क्षुद्र भीती असते. अज्ञातातला भेसूरपणा आपल्याला कांचेतच अनुभवायला मिळतो. या कथा आपल्याला त्या क्षेत्रात घेऊन जातात. या जगात भुते आपल्याशी बोलतात, माणसासारखी बोलतात आणि एकाएकी शेवटी आपल्याला कळते की, आपण ज्याला भेटलो, ज्याच्याशी बोललो, ज्याचे ऐकले, ज्याला सांगितले तो माणूस नव्हता, भूत होते. ह्या धक्क्याने आपण घाबरतो. या धक्क्यातच एक आनंद असतो आणि म्हणून ते घाबरणे एक सुखद संवेदना देऊन जाते. घाबरणे सुखद असते, हा कुणाला वदतोव्याघात वाटेल. पण तो तसा नाही. सेक्समध्ये मासोचिझम नावाचा एक प्रकार आहे. विकार म्हणा हवा तर; पण तो आहे. त्यांत प्रेमविषयाने प्रेमिकाला केलेला देहदंड त्याला सुख देतो. मार खाऊन मिळणाऱ्या दु:खातच त्या सुखाचा उगम असतो. तोच न्याय भीतीलाही लावता येईल. भीतीतही एक वेगळ्या प्रकारचे मासोचिझम असते, असू शकते. ज्याला आपण भितो, त्याच्यावर आपण प्रेम करतो आणि प्रेम करतो, म्हणूनच त्या प्रेमातून आपल्याला आनंद मिळतो. तसे नसते तर युरोपमध्ये डेव्हिल-वर्शिपचा पंथ निघालाच नसता व आपल्याकडे अघोरी मार्गाची उत्पत्ती न होती! या कथांत आपण ज्या गोष्टींना घाबरतो, त्या गोष्टी आपल्याला आनंद देऊन सुखावतात. घाबरणे हे जर दु:खदायक असेल, तर त्यानंतर निर्माण होणारी भावस्थिती आनंद देऊन जाते. हा एक प्रकारचा आत्मपीडनातून निर्माण होणारा आनंदच होय. म्हणून 'एक प्रकारचा मासोचिझम' असा विचित्र शब्दप्रयोग या अनुबंधात वापरलेला दिसेल. भीती दु:ख देते; पण त्या भीतीचा निचरा झाल्यावर आनंद होतो. तो आनंद जीवनात आपल्याला मिळत नाही. या कथा तो आनंद देतात, म्हणून त्या सुंदर वाटतात आणि त्या सुंदर वाटतात, म्हणून सुंदर आहेत. नाही तरी 'ब्युटी रेस्टस् इन द आय ऑफ बिहोल्डर' यापलीकडे सौंदर्याचे अधिक समर्पक कोणते लक्षण सांगता येईल? असो.

मतकरी यांचा हा तिसरा गूढ कथासंग्रह. पहिले दोन तर सुंदर होतेच, पण हा अधिक सुंदर आहे. कारण यात 'हडळ' ही कथा संग्रहित केलेली दिसेल. तिच्यासारखी एक कथा पाच वर्षांत एक वेळ सुचणे हेच कोणाही लेखकाचे सद्भाग्य होय. इथे पाहावे तो मतकरी संग्रहामागून संग्रह काढतात आणि ते सारे एकजात भयाण. निखळपणे भेसूर आणि तरीही अतिसुंदर. ही त्यांची लेखक म्हणून कमाई आहे. आजपर्यंत त्यांचा लौकिक होता तो नाटककार म्हणून. बालनाट्यात त्यांचा हातखंडा आहे. त्यांच्या 'प्रेमकहाणी'सारख्या मनोरम स्वप्नील नाटकाला पारितोषिक मिळाले होते आणि आता पाहावे तो ते भयासुर भुतांच्या वास्तव-अतिवास्तव अद्भुत-भीषण सुंदर कथा त्याच सफाईने लिहितात. अशी चौफेर प्रतिभा असलेला हा तरुण लेखक. त्याच्याकडून नजीकच्या भविष्यात याहूनही भव्यतर अपेक्षा करणे अस्थानी ठरू नये.

- धोंडो विठ्ठल देशपांडे

कथानुक्रम

फाशी बखळ / १
शेवटची बस / १२
फॅन्टॅस्टिक / २०
हडळ / ३२
सोडवणूक / ४३
प्रिया / ५७
झाड / ६७
सूर्यास्ताच्या शेवटच्या क्षणी / ७९
मला विक्रम दिसतो / ८८
साधा माणूस / १००

फाशी बखळ

प्राध्यापक रामनाथ शाळिग्राम ऊर्फ नाथा, असा अवचित आल्याचे पाहून शांतारामला आश्चर्य वाटले. नाथा आणि शांताराम, दोघे कॉलेजमधले, अगदी जवळचे, एका 'गँग'मधले म्हणावेत, तसे मित्र. हे दोघे आणि तिसरा वर्तक. वर्तक इतका जिवलग मित्र; पण त्याला कां कुणाला ठाऊक, नाथा आणि शांताराम यांनी त्याला कधीच पहिल्या नावाने हाक मारली नाही. तो अगदी पायजमा घालून कॉलेजला यायचा, तेव्हापासून वर्तकच होता आणि नाथा मात्र एवढा मोठा तर्कशास्त्राचा प्राध्यापक झाला, तरी नाथाच राहिला.

नाथा, शांताराम आणि वर्तक हे तिघे कॉलेजमधे एका बाकावर बसून कागदी बाण मारणारे, लायब्ररीत एकत्र बसून अभ्यास करणारे आणि एकाच टेबलावर बसून चहा पिणारे जोडीचे विद्यार्थी. पण गेल्या पंधरा-वीस वर्षांत तिघांच्याही वाटा दूरदूर गेल्या होत्या. अधुनमधून तिघांनाही एकमेकांची खूप आठवण येत असे, नाही असे नाही. तिघांची पत्रोपत्रीही होई, पण ती कारणपरत्वेच; आणि कारणेही दिवसेंदिवस अधिकाधिक व्यवहारी आणि रोखठोक होत चालली होती. म्हणजे नाथाच्या कॉलेजात एखाद्याला प्रवेश हवा असल्यास त्याला वर्तकचे पत्र जाई, किंवा शांतारामच्या गावी कोणी जाणार असल्यास त्याला उतरून घेण्यासाठी नाथा लिही. याला अर्थातच इलाज नव्हता. तिघे तीन गावी पोटाच्या पाठीमागे होते. शांताराम एका बँकेत अधिकारी होता, तर वर्तक मामलेदार कचेरीतल्या नोकरीतल्या बदल्यांच्या निमित्ताने गावोगाव फिरत होता. नाथा एका जिल्ह्याच्या गावी तर्कशास्त्राचा प्राध्यापक होता आणि गंभीर विषयावर - म्हणजे माणसाचे अंतर्मन, संज्ञाप्रवाह, मृत्यूनंतर अस्तित्व आहे की नाही? वगैरेंसारख्या गंभीर विषयांवरच लेख लिहून लेखक म्हणून मान्यता पावू लागला होता. इतके असले तरी ते तिघे एकमेकांना विसरले नव्हते खास. आपल्या मुलामाणसांना जुन्या आठवणी सांगत असताना त्यांच्या बोलण्यात एकमेकांचा उल्लेख हटकून येई. एकमेकांच्या लकबी, सवयी त्यांच्या चांगल्याच ध्यानात होत्या. गाडीत अवचित गाठ पडली, किंवा एखाद्याचे पत्र आले, तर त्यांना मनापासून आनंद होई. प्रत्येकजण आपापल्या कामात गुरफटून गेल्यामुळे एकमेकांची विचारपूस करीत नव्हता एवढेच. मात्र जुन्या मैत्रीचा ऋणानुबंध अजूनही तसा पक्का होता.

म्हणूनच नाथा अवचित आल्याचे पाहून शांतारामला आश्चर्य वाटले, आणि त्याबरोबर आनंदही झाला. त्यातून नाथाच्या बरोबर सामानसुमान काहीच नव्हते; त्यामुळे तो जवळपास कुठेतरी उतरला असावा, असा तर्क शांतारामने केला. त्याच्या गळ्याला मात्र 'प्रवासी' मफलर बांधलेला होता, त्यावरून तो नुकताच गाडीतून उतरल्यासारखा दिसत होता.

शांतारामने त्याच्या जेवणाखाण्याची चौकशी केली. नाथाचे सगळे झाले होते आणि आता पाणीसुद्धा प्यायला त्याच्या पोटात जागा नव्हती. मग शांतारामने अधिक आग्रह केला नाही. एक तर घरात त्याच्याशिवाय दुसरे कुणीच नव्हते. वेळ रात्रीची होती, आणि तो स्वत:च खानावळीतून जेवून येऊन झोपण्याच्या तयारीत होता. त्यातून धडपड करून चहा केला असता, तरी एकदा नाही म्हटल्यानंतर नाथाने प्राण गेला तरी तो घेतला नसता.

नाथाचा स्वभाव शांतारामला चांगलाच ठाऊक होता. आज तो तर्कशास्त्राचा प्राध्यापक झाला होता; पण कॉलेजमध्ये असल्यापासूनच त्याची मते निश्चित असत. ती सहसा बदलत नसत. अत्यंत विचारपूर्वक तो आपली मते बनवीत असे; त्यांना नेटाने चिकटून राहत असे; आणि चारचौघांत ती आग्रहीपणे, ठाशीवपणे मांडीत असे. त्याची मते आणि त्याचे बेत कधी पुन्हा पुन्हा बदलत नसत.

"राहणार आहेस ना इथंच? मी तुझी झोपायची व्यवस्था करतो." शांताराम म्हणाला.

"नको. मी लगेच परत जाणार," नाथा ठामपणे म्हणाला.

"परत? एवढ्या रात्री? काय वेड लागलंय का?" शांतारामने आश्चर्याने विचारले.

पण त्याच्या आश्चर्याचा नाथावर बिलकूल परिणाम झाला नाही. "मला गेलंच पाहिजे." तो शांतपणे

म्हणाला, ‘‘- पण तुला काही सांगायचं होतं म्हणून एवढ्या घाईत आलो.’’

शांतारामचा सगळा आग्रह गळून पडला. असे आजवर नेहमीच होत आले होते. शांतारामचा स्वभाव पडखाऊ होता. नाथा म्हणेल त्याप्रमाणे त्याचे मत बदलायचे. तो कधीच विरोध करीत नसे.

आत्ताही असेच झाले. ‘‘काय सांगणार आहेस?’’ शांताराम मवाळपणे म्हणाला - ‘‘तू कसल्या अडचणीत आहेस का?’’

त्याच्या प्रश्नाकडे नाथाने सोयीस्कर दुर्लक्ष केले. जणू असल्या प्रश्नांना उत्तरे देत बसण्याइतकीही सवड त्याला नव्हती.

‘‘मला मधे वर्तकचं पत्र आलं... अगदी अचानक,’’ नाथा म्हणाला. वर्तकचा उल्लेख येताच शांतारामला अधिकच गोडी वाटू लागली. त्याने वर्तकची खुशाली विचारली. ‘‘हो, तो खुशाल आहे.’’ मधे न थांबता नाथा सांगू लागला. ‘‘त्याचं पत्र आलं त्या सुमारास एका मासिकात मी पिशाच्चयोनीविषयी लेख लिहिला होता. पिशाच्चाचं अस्तित्व हे तर्कात बसणारं नाही, असं मी त्यात प्रतिपादन केलं होतं.’’

शांतारामला कॉलेज-कॅन्टीनमधे होणारे जुने वाद आठवले. ‘भुतं आहेत की नाहीत,’ या विषयावर तिघांमधे सतत वादविवाद होत. यामधे ठाम मत असे एकट्या नाथाचेच असे. भुते नाहीत, असे शांतारामचे मतही अर्थात त्याच्यासारखेच असे. पण दोघांना चिडवण्यात वर्तकला गंमत वाटत असे. तो मुद्दाम ‘भुतं आहेत’ असे म्हणायचा. आपल्या विधानाला पुष्टी येण्यासाठी इकडच्या-तिकडच्या खऱ्याखोट्या गोष्टी दडपून द्यायचा.

‘‘वर्तकनं पत्रातून माझ्या त्या लेखाचा उल्लेख केला होता आणि वर चिडवल्यासारखं लिहिलं होतं - ‘तुम्ही लोक अनुभव नसताना गप्पा मारता की भूतबित सब झूट है! छाती असेल तर आमच्या गावाला येऊन स्वत:च बघून जा. एकेक जागा अशा दाखवतो की पाहून भीतीनं छाती फाटेल.’ ’’

नाथा बोलत होता आणि शांताराम ऐकत होता. ऐकता ऐकता नाथाकडे - त्याच्या बोलण्याच्या आवेशाकडे - लक्षपूर्वक पाहत होता. बोलताना नाथाचे हातवारे होत होते, त्याची त्याला गंमत वाटत होती. नाथा गिड्डा, जाडगेला होता. वर्णानेही काळसर होता. त्या काळसर चेहऱ्यावर त्याचे मोठे डोळे अधिकच उठून दिसत, त्यात तो चष्मा, जाड काचांचा; काचांच्या कडांना मोठमोठी वर्तुळे. त्यातून त्याचे मजेशीर हातवारे. बोलता बोलता मधेच चष्मा काढून पुन्हा तो लावण्याची गमतीदार सवय - नाथाच्या विक्षिप्तपणाची शांतारामला नेहमीच गंमत वाटत आलेली होती आणि असे असतानाही नाथाच्या गांभीर्याचे दडपणही त्याच्यावर पडत आले होते.

‘‘मी वर्तकचं आव्हान स्वीकारायचं ठरवलं.’’ डोळ्यांवरचा चष्मा काढून, मफलर सारखा करीत नाथा म्हणाला. ‘‘मी त्याला लगोलग पत्र टाकलं की, तुझ्या गावी कधी येऊ ते बोल. माझी खात्री होती की, त्याच्या गावातले जिवंत गुंडच काहीतरी बदमाषी -’’

रात्र फार झाली होती. नुकतेच अकराचे टोले पडून गेले होते. शांतारामच्या डोळ्यांवरची झोप आता चांगलीच उडाली होती. बाहेर सारे शांत झाले होते. दूरवर अधुनमधून एखादे कुत्रे विव्हळत होते तेवढीच जाग! खिडकीचे तावदान वाऱ्याने अधुनमधून आपटत होते. वाऱ्याचा झोत आत आला की छताला टांगलेला दिवा झोके घेई आणि सगळ्याच वस्तूंच्या सावल्या आपले हातपाय पसरत - पुन्हा आखडून घेत.

चष्मा पुन्हा नाकावर बसवीत आणि हातवारे करीत नाथा म्हणाला, ‘‘शेवटी एकदा जायचा दिवस ठरला. गाडी ठरली. वर्तकनं मला स्टेशनवर उतरून घ्यायला यायचं कबूल केलं होतं...’’

-पण गाडी कधी नव्हे ती स्टेशनवर ठरलेल्या वेळेच्या चांगली पाऊण तास आधी आली.

हातातली बॅग सावरीत आणि आपल्या गिड्ड्या शरीराला झोले देत प्राध्यापक शाळिग्राम ऊर्फ नाथा त्या आडवाटेच्या स्टेशनवर उतरला. स्टेशनवर उभे राहिल्या राहिल्या त्याने बॅग खाली ठेवून नॅपकिन बाहेर काढला आणि आपली गिड्डी मान, घामेजलेले कपाळ, टक्कल, सारे एकदा खसखसून पुसून काढले.

गाडी थांबली न थांबली, एवढ्यात चालू झाली. गाडीत काहीतरी राहून जावे, तसे नाथाने दचकून गाडीकडे बघितले. उगाचच. धकधक् करीत गाडी स्टेशनबाहेर चालती झाली.

नाथाने फलाटभर पाहिले. टीचभर रुंदीचे ते स्टेशन. त्यातून रात्रीची वेळ. गाव इतके आडवाटेचे की, या स्टेशनवर उतरणारा नाथा हा एकच प्रवासी होता. स्टेशन अगदी निर्मनुष्य होते. तिकीटचेकरचादेखील पत्ता नव्हता. एक मळकट खरजुले कुत्रे मात्र आरामात पहुडले होते. बाकी चिटपाखरूसुद्धा जवळपास नव्हते. नाथाच्या मनात क्षणभर भीतीचा विचार आला - ‘इथल्या या काळोखातून कुणी पुढे होऊन आपला गळा धरला तर?’

खरे म्हणजे नाथाला उतरवून घ्यायला वर्तक येणार होता; पण त्याचा तर पत्ताच नव्हता. याला अर्थात त्याचाही इलाज नव्हता. गाडीच जिथे अनपेक्षितपणे लवकर आली होती, तिथे तो गाडीच्या वेळेवर कसा येणार? नाथाने अस्वस्थपणे घड्याळ पाहिले. गाडी चक्क पाऊण तास लवकर आली होती. आता वर्तकची वाट पाहत पाऊण तास इथे या काळोखात एकट्याने काढायचा, म्हणजे कठीण कर्म होते. या भिकार फलाटावर तर बसायला धड बाकदेखील नव्हते. नाथाने अस्वस्थपणे इकडेतिकडे फेऱ्या घातल्या आणि अखेरीस निर्णय घेतला.

त्याने कोटाच्या खिशातली डायरी काढली आणि वर्तकचा पत्ता वाचला. पत्ता तसा सविस्तर लिहिलेला होता. नाथाने तो नीट ध्यानात ठेवला. डायरी खिशात टाकली आणि बॅग उचलून काळोखात पाऊल टाकले.

चालताचालता त्याच्या मनात आले - 'कसल्या भिकार गावात हा वर्तक पोटापाठीमागे आलाय! धड रस्ते नाहीत, कुठे वाहने नाहीत की पुरेसे दिवे नाहीत!' वेळ रात्रीची असल्यामुळे टांगा तर सोडाच पण एक बैलगाडीसुद्धा स्टेशनबाहेर उभी नव्हती. आणि असणार तरी कशाला? त्या किरकोळ स्टेशनवर पॅसेंजर फारसे उतरतच नसत.

शेवटी नाथा पायीपायीच निघाला. एका हातात बॅगचे ओझे सांभाळीत. अंधारातून लाल मातीचा रस्ता तुडवीत.

वर्तकने लिहून पाठविलेल्या सगळ्या खुणा त्याने नीट ध्यानात ठेवल्या होत्या. डावीकडून सरळ जायचे, मग एक पिंपळाचा पार लागेल. तिथे वळल्यानंतर पाच-सात मिनिटांच्या अंतरावर एक छोटेसे बंगलीवजा घर होते, ते वर्तकचे.

पण पंधरा मिनिटे चालूनदेखील नाथाला ती बंगली लागली नाही. सगळी बैठी कौलारू घरे किंवा मोकळ्या जागा. खुणा तर बरोबर लक्षात ठेवल्या होत्या. पारापर्यंतचा रस्ताही बरोबर होता. मग पुढे कुठे वळताना चूक झाली की काय?

बरे, रात्री कुणाला उठवून विचारावे तरी पंचाईत. घरेदेखील शहरासारखी रस्त्याच्या कडेला लागून नव्हती. घरासमोर कुंपण, मग अडचणीच्या वेड्यावाकड्या वाटा, वाटेत दगडधोंडे, कुठेकुठे तर दारात आडसुद्धा. मग पायऱ्या, ओटा, असा खेडवळ कारभार. आत झोपलेल्या माणसाला 'उठवणे' म्हणजे कठीण काम!

नाथा परत उलटा वळला आणि पिंपळाशी आला.

पिंपळ वाऱ्याने सळसळत होता.

नाथाने सहज वर पाहिले.

मग तो स्वत:शीच हसला. त्याने कधीच असल्या गोष्टींवर विश्वास ठेवला नव्हता.

आणि एकदम आठवण झाली. आज अमावास्या!

एरवी नाथाला तिथ्याबिथ्या काही ठाऊक नसत. पण आज निघतानाच कुणीतरी म्हणाले होते - मुद्दाम अवसेच्या दिवशी कशाला प्रवासाला निघताय?

आता मात्र नाथाला स्वत:चीच चीड आली. 'आपल्यासारखा नास्तिक प्राध्यापक आणि अमावास्या, पिंपळ, असल्या गोष्टींचा विचार करतो?'

आणि तरीही त्याने हातातल्या घड्याळाकडे पाहिले. बाराला वीस मिनिटे कमी होती.

बापरे! - इतका वेळ आपण चालतोच आहोत? म्हणजे वाट नक्की चुकली. वर्तकची बंगली स्टेशनपासून पाच मिनिटांवर होती ना?

नाथाने बॅग उचलली, आणि आला त्याच्या विरुद्ध दिशेला चालायला सुरुवात केली.

पंधरा मिनिटे नाकासमोर चालल्यानंतर नाथाला थांबणे भागच पडले. समोरचा रस्ता सरळ एका गर्द झाडीत दिसेनासा झाला होता.

हताश होऊन नाथा तिथेच उभा राहिला. वर्तकची वाट न पाहता आपण स्वत:च पत्ता शोधीत निघालो, ही किती मोठी चूक केली, हे त्याला पटले होते. समोर चारी दिशांना काळोखाचा डोह पसरला होता आणि त्या काळोखात दमलेला भागलेला नाथा, हातातली बॅग गच्च पकडून केविलवाणेपणाने उभा होता. रातकिड्यांची किरकिर अगदी स्पष्ट ऐकू येत होती. एखादे चमत्कारिक वाद्य झिम् झिम् तालात वाजावे, तसा तो आवाज, आणि पानांची सळसळ याखेरीज बाकी सारे चिडीचिप् झाले होते.

रात्री बाराची वेळ! - दुसरी कसली हालचाल असेलच कशाला?

घड्याळ पाहून नाथाने खिशातून नॅपकिन काढला, आणि पुन्हा एकदा मानेवरचा घाम खसाखस पुसला.

आणि त्याच वेळी त्याला झाडीत एक दिवा लुकलुकताना दिसला.

नाथाने डोळे फाडफाडून पाहिले. दिवा इतका अचानक दिसला होता, की तो भासच असेल, असे त्याला पहिल्याने वाटले. मग वाटले की, काजवा असेल; पण काजवा थोडाच पिवळट असतो? नक्की तो दिवाच होता! आजुबाजूला पसरलेल्या त्या अथांग काळोखात त्या दिव्याचा नाथाला मोठाच आधार वाटला.

झपझप पावले टाकीत तो त्या दिव्याच्या रोखाने निघाला.

दिवा पेटत असलेल्या त्या घराशी नाथा येऊन पोहोचला, तेव्हा त्याची नजर सहज घड्याळाकडे गेली. बारा वाजून गेले होते. सगळ्या झाडीत ते लहानसे घर एकटेच उभे होते. त्या घरासमोर नव्हते अंगण, की नव्हते कुंपण. आजुबाजूच्या चिखलातून वाट काढीत घराशी यावे, म्हणून चिखलातच चार कोरडे दगड बसवलेले होते. तोल सांभाळीत दगडावर पाय ठेवून चालले की, माणूस नेमके घराच्या पायरीशीच पोचायचे.

घराचे एकूण रंगरूप या काळोखात नीटसे कळणे शक्यच नव्हते; पण ते तसे बकाल, जुने, रंग उडलेले, आणि एकूण खंगलेले आहे, एवढे नाथाच्या ध्यानात आले. एकच एक पिवळट, रोगट वाटणारा दिवा, बारा वाजून गेले तरी जळत होता.

दाराशी उभे राहून नाथाने आतली चाहूल घेतली. आतून कसलाच आवाज ऐकू येत नव्हता. मग मंडळी झोपी गेली होती की काय, कुणास ठाऊक! कुणी बोलत नव्हते, की चालत नव्हते, फक्त दिवा मात्र जळत होता.

अखेरीस नाथाने दारावर टकटक केले. आतून उत्तर आले नाही. नाथाने पुन्हा एकदा जोराने दार वाजवले. आतून उत्तर आले - 'आलो!' कुठूनतरी खोलातून यावा, तसा खंगलेला आवाज होता तो. पुन्हा बराच वेळ कुणी दार उघडले नाही. कदाचित उत्तर देणारा कशात तरी गुंतला असावा, असे वाटले.

नाथा पुन्हा जोरजोराने दरवाजा ठोठावण्याच्या विचारात होता. एवढ्यात अगदी अचानकपणे दरवाजा उघडला.

दारात एक हाडांचा सापळा उभा होता.

त्या माणसाचे ते स्वरूप पाहून नाथा क्षणभर गारठूनच गेला. त्याच्या अंगावर चिमूटभरदेखील मांस नव्हते. कातडी नुसती हाडाला चिकटून बसली होती. गालात खड्डे पडले होते. डोळेदेखील खड्ड्यातल्या बैदुलासारखे निस्तेज दिसत होते.

आणि तरीही नाथाला पाहून त्या विझलेल्या निखाऱ्यामधे थोडीशी चमक दिसल्यासारखी झाली. ओठ बिलगले. त्याबरोबर हाडाच्या कवटीने विचकलेले दात दिसावेत, तशी त्याची दातांची कवळी उघडी पडली. दात विचकत तो म्हणाला, "या. आत या. आलात, हे फार चांगलं झालं. मला मदत हवीच आहे."

नाथा चक्रावून गेला. अर्ध्या रात्री हा माणूस आपल्याला दार उघडून घरात घेतोय. पाहुणा कुठला, कोण, याची काही चौकशी न करता वर म्हणतो, 'मदत हवी आहे.' मदत कसली? कशासाठी?

पण अधिक काही विचारणे शक्यच नव्हते. तो माणूस पाठ फिरवून आत चालू लागला होता. नाथा निमूटपणे त्याच्यामागून आत गेला.

आत काळोख होता. एक केरोसीनचा दिवा अगदी मंदपणे जळत होता. पण त्यामुळे उजेड पडण्याऐवजी खोलीतल्या अंधाराची खोलीच अधिक वाढली होती.

मात्र त्या अंधारातही, समोर जे काही दिसले, त्यामुळे नाथा गारठून गेला.

वरच्या तुळईला एक फास टांगलेला होता. नाथा हतबुद्ध होऊन त्या फासाकडे पाहातच राहिला. वाऱ्याच्या झुळकीबरोबर तो फास किंचित पुढे होई - किंचित मागे जाई. नाथा पाहत राहिला. डोळे फाडफाडून त्या झुलणाऱ्या फासाकडे पाहत राहिला...

आणि मग काय झाले कुणास ठाऊक! त्या फासाकडे पाहतापाहता नाथाची तंद्री लागली - आपण कुठे आहोत, काय आहोत याचा विचार हळूहळू नाहीसाच होऊ लागला. उंची मद्य पिताना एक प्रकारची ग्लानी अंगभर पसरत जावी, तसे काहीतरी होऊन गेले आणि समोर अवघ्या दोनच गोष्टी उरल्या. मळकट उदासवाण्या उजेडाने आकारलेला काळोख - आणि - आणि तो हिंदकळणारा फास - मागे-पुढे... पुढे-मागे...

त्या फासाच्या जवळ तो अस्थिपंजर माणूस जाऊन उभा राहिला, आणि नाथा दचकला.

"मी फास लावून घेऊन मरायचं ठरवलंय." तो म्हणाला. एखाद्या खोल विहिरीतून यावा तसा आवाज येत होता. त्याच्या त्या अस्थिपंजर शरीराला खरे तर तो खोल गंभीर आवाज शोभतच नव्हता. "- पण हा फास गळ्याभोवती घट्ट आवळायला ताकद हवी. एकदा का तो आवळला, की मग माझ्या पायाखालचं हे स्टूल ढकलायला हवं - मग हा फास - हा माझ्या गळ्याभोवती आवळला जाईल - मला होणाऱ्या मरणप्राय

यातनांमधून मी सुटेन - कायमचा मोकळा होईन. पण हे - हे सारं करायलादेखील ताकद हवी - ताकद हवी... तेवढीदेखील माझ्यात नाही, म्हणून मला मदत हवी - तुमची मदत हवी -''

खोल-गूढ-गंभीर आवाजात-निसटत्या शब्दांत तो हे सारे बोलून गेला आणि नाथाच्या मनावर जणू त्या शब्दाचे घण बसले - 'मला मदत हवी - हा फास आवळायला मला मदत हवी -'

नाथा एखाद्या जडमूढ बाहुल्यासारखा उभा होता. मधुनमधून आपल्या गिड्डुया मानेवरचा घाम खसखसा पुसत होता; पण त्याची ही हालचालदेखील एखाद्या यंत्रासारखी होत होती. आपण ती करीत आहोत, याचेदेखील भान त्याला राहिले नव्हते.

आणि समोर तो फास - झुलणारा... हिंदकळणारा...

कशीबशी त्याला आपली वाचा सापडली - ''कां म्हणून तुम्ही आत्महत्त्या करायला निघालाय?'' त्याने विचारले.

''हा रोग-'' तो अस्थिपंजर म्हणाला-''हाडीमाशी खिळलेला हा रोग-हा बरा होत नाही-मरणही येत नाही-रात्रंदिवस जाळतो हा रोग-एखाद्या मढ्याचं जिणं जगायला लावतो-कसला आनंद नाही-सुख नाही-चैन नाही-वेदना-नुसत्या वेदनांचा एक भयंकर वणवा-त्यात जीव सापडलाय-त्यातून सुटका नाही-सुटका आता मरणामधूनच-आनंद आता हाच-सुटकेचा. निदान वेदनांमधून वाचल्याचा.''

नाथाला त्याची कीव आली. मृत्यू हीच ज्या माणसाची एकमेव आशा होती, अशा त्या रोगजर्जर शरीराच्या धन्याकडे पाहताना त्याचे मन कणवेने भरून गेले. त्या माणसाकडे आपोआपच ओढले गेले. किंबहुना आपण त्या परक्या माणसाच्या इतके निकट पोहोचलो आहे, हेदेखील त्याला कळले नाही. एखाद्या कळसूत्री बाहुल्याप्रमाणे स्वत:च्या इच्छेविरुद्ध तो त्या माणसाच्या जवळ जाऊन पोहोचला.

मघापासून ज्या हिंदकळणाऱ्या फासाची त्याला एक प्रकारची धास्ती वाटत होती, तोच लटकणारा फास त्याने हातात धरला. अस्थिपंजर गृहस्थ दात विचकीतच त्या फासाच्या जवळ आला, तसा नाथाने त्याच्या गळ्यात तो फास अडकवला. त्याचा गळा इतका अरुंद आणि उभट होता, की एखाद्या माणसाच्या गळ्यात आपण हा फास अडकवीत आहोत, असे नाथाला वाटतच नव्हते. एका कृश, अरुंद, हाडांच्या सांगाड्याला आपण दोरात अडकवून टाकले, असेच त्याला वाटले.

''थँक्यू.'' तो माणूस ओठातल्या ओठात पुटपुटला. नाथाने फास आवळला. गच्च आवळला. आणखी गच्च. एका विलक्षण तंद्रीत त्याने त्या माणसाची अपेक्षा क्षण-दोन क्षणांत पूर्ण केली.

आता तो माणूस त्या दोराला लटकू लागला होता. मधेच स्टुलावरून पाय सोडून देई आणि दोराबरोबर इकडे-तिकडे फिरे.

नाथाने लक्षात ठेवून त्याच्या पायाखालचे स्टूल ढकलून दिले. तो अस्थिपंजर वर हवेतल्या हवेत तरंगू लागला. आता त्याचे पाय कुठेच टेकू शकत नव्हते.

दोरीची गाठ सरकली - आणि मानेवर पक्की बसली.

दुसऱ्याच क्षणी तो माणूस हवेत चार बोटे खेचला गेला आणि दोरीचा फास त्याच्या मानेभोवती अगदी घट्ट रुतून बसला. भारून गेल्यासारखा नाथा त्या दृश्याकडे पाहत होता. आजवर त्याने फाशी जाणारा माणूस कधीच पाहिला नव्हता. त्यातून स्वत:च्या हाताने फाशी दिलेला तर -

सुटला बिचारा! सगळ्या जगाच्या दु:खातून - स्वत:च्या रोगजर्जर अवस्थेमधून -

त्या पिचलेल्या अस्थिपंजरामधून एक जीव मोकळा झाला!

- आपणच त्याला मोकळे केले! एका झोक्यासरशी दोरीची माळ गळ्यात टाकून.

नाथानं स्वत:चा गळा चाचपला. मान चाचपली. ही माझी मान! ती त्याची! मी ती मान दोरीने आवळली...

मी! मी स्वत:! मी असे कसे केले? मी एका माणसाला फाशी जायला मदत केली - मी त्याला फासावर लटकवले. कुठला कोण माणूस? त्याचा-माझा काय संबंध? पण मी त्याचे मरण - माझ्या हातांनी - माझ्या स्वत:च्या हातांनी -

नाथाला भीती मुळीच वाटत नव्हती. फक्त एक विलक्षण जाणीव! अपराधाची? स्वत:च्या हातून दृष्कृत्य घडल्याची? - कसली कोण जाणे! नाथा गोंधळून गेला. डोळे फाडफाडून समोर पाहत तसाच वेड्यासारखा उभा राहिला.

आणि समोर ते प्रेत तसेच हिंदकळत राहिले. हलकेच हालत राहिले. मागे-पुढे झुलत राहिले.

अपुऱ्या प्रकाशात, त्याच्या निस्तेज डोळ्यांच्या गारगोट्या आणि बाहेर आलेली जीभ बघवत नव्हती...

आणि तरीही नाथा पाहत उभा होता. भारल्यासारखा समोर एकटक पाहत उभा होता. त्याचा एक हात

मानेवरून एकसारखा फिरत होता...

वर्तकला नाथा सापडला तो त्याच अवस्थेत. तारवटलेल्या डोळ्यांनी समोर पाहत. त्याला आजुबाजूची कसलीही शुद्ध नव्हती. शरीरही जवळजवळ निश्चल होते. ते रात्रभर तोलणे पायांना अशक्य झाल्यामुळेच की काय, नाथा जमिनीवर कोसळला होता. नजर मात्र समोर होती आणि सारे शरीर निश्चल असताना, एक हातच तेवढा गिड्ड्या मानेवरून वारंवार फिरत होता...

समोर काहीही नव्हते. बॅग धुळीत पडली होती. वर्तक रात्री स्टेशनवर जाऊन आला होता. पुन्हा सकाळच्या गाडीला जाऊन आला होता. नाथा आलेला नाही, अशी त्याची खात्री झाली होती आणि सहज आपले दुसऱ्या एका कामासाठी वाट वाकडी करून 'फाशी बखळी'वरून जातो, तर तिथे झपाटलेला नाथा...

''नाथा, अरे नाथा -'' वर्तकने चार हाका मारेपर्यंत नाथाच्या कानावर काही गेलेच नाही. वर्तक घाबरला. त्याने नाथाला जोरजोरात हलवले.

अखेरीस नाथा हलला. 'अं-ऊं' करू लागला.

''ऊठ. इथं काय करतोयस? या उघड्या बखळीत. चल - ही घे बॅग.'' त्याने नाथाला जाग आणण्याचा प्रयत्न केला.

नाथाला नीटसे काही समजत नव्हते; पण आता त्याची नजर थोडीफार आजुबाजूला फिरू लागली होती. त्याने पाहिले तर चांगले फटफटीत उजाडले होते. अवतीभोवती सारे काही मोकळे होते आणि मोकळ्यावरचे गार गार वारे कानशिलांना झोंबत होते.

त्याला काही कळेनासे झाले. ''मी... त्याला... तो...'' हात मानेवरून फिरवून तो वर्तकला सांगत राहिला.

त्याच्या खुणेचा अर्थ वर्तकला चांगला कळला. ''समजलं समजलं. घरी चल.'' लहान मुलाची समजूत काढावी, तसे तो नाथाला समजावू लागला. ''आल्याआल्या हात दाखवलेला दिसतोय त्यानं तुला. बरोबर, काल अमावास्या. दर अवसेला दिसतो तो. आजाराला कंटाळून आत्महत्त्या केलीन्. पण मोह काही सुटला नाही जगण्याचा. इतकी वर्षं झाली. त्याच्या घराचा दगडदेखील आज शिल्लक नाही. पण अजून हा दर अवसेला फास लावून घेताना दिसतो. जवळ येईल त्याची मदत मागतो. त्याला भारून टाकतो. अरे बाबा, म्हणून तर या जागेला 'फाशी बखळ' म्हणतात.''

वर्तक परोपरीने नाथाला सांगत होता. पण त्यातले कितपत नाथाला समजत होते कुणास ठाऊक! तो आपला ''हं हं'' करीत होता, आणि नेहमी वाद घालणारा आपला तो मित्र हाच का, या आश्चर्यात वर्तक बुडून गेला होता.

''वर्तकचं बोलणं मला समजत नव्हतं, असं नाही.'' प्राध्यापक शाळिग्राम ऊर्फ नाथा टेबलावर हात आपटीत शांतारामला म्हणाला, ''पण मी घेतलेला अनुभव इतका ताजा होता, आणि इतका अस्सल होता की, तो खोटा मानायला माझं मन तयार नव्हतं. एखादं अगदी खरं वाटणारं स्वप्न पडावं, आपण त्यातून जागं व्हावं आणि तरीही ते स्वप्न रेंगाळत राहावं, नीटशी जागच येऊ नये, तसं माझं झालं होतं. घेतलेला अनुभव आणि रोजचा व्यवहार हा सुपरइम्पोज् केलेल्या छायाचित्रासारखा एकावर एक उमटला होता -''

''त्यातून मनाची टोचणी चालूच होती -''

''आपण एका माणसाला मरू दिला, फासावर लटकावला, हे मनाला खातच होतं. वर्तक परोपरीनं सांगायचा की, तो माणूस नव्हता, ते भूत होतं. मलाही ते पटू लागलेलं होतं. पण तरीही खरं काय, खोटं काय, काही कळेनासं झालं होतं. दोरी दिसली की ते सारं आठवायचं. मग हाताचा चाळा सुरू व्हायचा. सहज दोरीची गाठ मारली जायची. वर्तकच्या घरात, मुलीची खेळातली उड्या मारायची दोरी होती. तिच्याशीच चाळा सुरू व्हायचा. वर्तक रागवायचा - 'तुला काय वेड लागलंय का' म्हणून खेकसायचा. मी त्याच्यावर चिडत नसे. माझं वागणंदेखील शहाणपणाचं नव्हतं, हे माझं मलाच कळत असे. पण दोरी पाहिली की ती रात्र डोक्यात फिरायची. आणि गंमत बघ - घरात सगळीकडे दोऱ्या. चिकाच्या पडद्याला दोरी, ताक घुसळायला दोरी! आंघोळ करायला घरामागच्या विहिरीवर जावं, तर चांगला जाडजूड दोरखंडाचा गच्च फास कळशीभोवती आवळताना, ती रात्र डोळ्यांसमोर यायची. जीव गलबलायचा, मी रहाट गडगडत सोडून द्यायचा आणि तळापासून थोड्या अंतरावर कळशी तशीच लोंबकळत ठेवायचो. अधांतरी... फाशी गेलेल्या माणसासारखी.''

एकाएकी दारावरची बेल वाजली. भर मध्यरात्रीची शांतता कापत गेली.

शांताराम दचकला. 'एवढ्या रात्री कोण?'

दोघेही उठून दाराशी गेले, शांतारामने दार उघडले.

दारात तारेचा शिपाई उभा होता. सही करून शांतारामने तार घेतली. तो गेला.

तारेखाली वर्तकची सही होती. वरचा मजकूर वाचून शांताराम ओरडला. ''खोटं आहे, हे साफ खोटं आहे!''

''खरं आहे, शांताराम.'' प्राध्यापक शाळिग्राम ऊर्फ नाथा म्हणाला.

''पुरावा हवा.''

त्याने आपल्या गिड्ड्या मानेवरचा मफलर बाजूला केला.

तिथे रहाटाच्या दोरखंडाची जाडजूड लालसर खूण होती.

■

शेवटची बस

अगदी शांत, रात्रीची वेळ असते.

हवेत गारठा असतो.

कुठेही कसलीही हालचाल नसते. माणूस तर राहोच, पण कुत्रेदेखील रस्त्यात नसते. रस्ता अगदी मोकळा - भयंकर मोकळा असतो.

कितीही दूरवर पाहिले, तरी कसलीच हालचाल दिसत नाही. रस्त्यात अजस्र इमारती राक्षसी पहारेकऱ्यांसारख्या उभ्या असतात. पण त्यादेखील आपले दिव्यांचे डोळे बंद करून झोपलेल्या असतात.

बारकाईने पाहिले, तर दूर एका इमारतीत एक दिवा लागलेला दिसतो; पण पाहता पाहता तोदेखील बंद होतो आणि अधिकच एकटे एकटे वाटू लागते.

अशा अपरात्री माझ्यासारखा एखादाच माणूस वेड्यासारखा बसस्टॉपवर उभा असतो. शेवटच्या बसची वाट बघत.

काय म्हटले मी? वेड्यासारखा! हो हो! वेड्यासारखाच. कारण अशा वेळी खरोखरच आपण शहाणे आहोत की वेडे, असा भ्रम पडतो.

तुम्हीच पाहा - बाहेर अशी चावरी थंडी पडली आहे. कोटाची बटणे लावूनदेखील थंडी आत शिरते आहे. कपड्यांच्या आत, अगदी हाडांपर्यंत, सगळे नुसते गार गार होऊन गेले आहे. थंडगार ओल्या मातीचा एक काला तयार करून आपल्याला कुणी त्यात मध्यभागी अगदी खोलवर खुपसून ठेवावे, आणि सगळ्या बाजूंनी गार गार ओली माती आपल्यावर रचून ठेवावी, फटीफटींमधून अगदी लिंपून टाकावी, तशी थंडी आतपर्यंत भिनते आहे. अशा वेळेस सगळे गरम दुलया पांघरून उबदार बिछान्यात शहाण्यासारखे झोपी गेले आहेत. आणि एखादा माणूस मात्र रस्त्यात एकटा - तारवटलेल्या डोळ्यांनी बसच्या दिशेकडे पाहत उभा आहे, हा वेडेपणाच नाही तर काय?

निदान, असे एकटेच वाट पाहत उभे राहणाऱ्याला तरी ते तसे वाटते, एवढे खरे.

जग असे स्थिर - स्तब्ध असले, कुठेही कसलाच आवाज नसला आणि थंडगार काळी कुळकुळीत रात्र नि:शब्दपणे पुढे सरकताना जाणवत असली, की त्या विचित्र वेळी स्वत:च्या शहाणपणावरचा विश्वासच उडतो. आपण कुठे आहोत, काय करीत आहोत, करीत आहोत हे बरोबर की चूक, हेच अधुनमधून समजेनासे होते.

निदान माझे तरी असे होते.

कितीतरी वेळ मी या स्टॉपवर उभा आहे. बसेस जवळजवळ बंदच झाल्या आहेत आणि आता तिथे येणारी बस बहुधा आजच्या दिवसातली शेवटचीच बस असणार आहे. ती मिळणे मात्र भागच असते. न मिळाल्यास, या विलक्षण थंडीत रात्र कुठे काढायची, हा प्रश्न असतो.

मी इतक्या उशिरा रस्त्यावर काय करीत आहे, असा विचार तुमच्या मनात येईल; पण त्याविषयी बोलण्यात फारसे हशील नाही. मी जिथून आलो, ते ठिकाण तुमच्या माहितीचे नाही. तुम्ही तिथे कधी जाणार नाही, तेव्हा मी कुठून आलो आणि कुठे जाणार, हा प्रश्न तुमच्या कामाचा नाही. एवढेच खरे, की मी तिथे त्या चावऱ्या थंडीत खिशात हात घालून शेवटच्या बसची वाट पाहत एकटाच उभा असतो.

एवढ्यात चंद्रोदय होतो.

या घटनेत विशेष काय आहे, ते कदाचित तुमच्या ध्यानात येणार नाही. तुम्ही आरामात घरात बसून दिव्याच्या उजेडात जर हा वृत्तान्त वाचीत असाल, तर चंद्रोदयाचे तुम्हाला विशेष ते काय वाटणार? पण थंडीत कुडकुडत निर्मनुष्य रस्त्यात एकट्याने उभ्या असलेल्या माझ्यासारख्या माणसाला, चंद्र उगवल्याबरोबर काहीतरी वेगळेच वाटू लागते. म्हणजे चंद्राची सोबत वगैरे वाटते, असे नव्हे. ते सगळे

काव्यात शोभून दिसते. अशा एकट्याच उभ्या असलेल्या माणसाला तर उलट चंद्रप्रकाशाची भीतीच वाटते. मी तर असे ऐकले आहे की, काही माणसांच्या डोक्यावर चंद्रप्रकाशाचा परिणाम होतो. ती भ्रमात असल्यासारखी वागतात, त्यांना निरनिराळे भास होऊ लागतात. ती मुळी स्वत:ची राहातच नाहीत.

आताच पाहा ना, चंद्रप्रकाश पडल्याबरोबर अंधारातून कित्येक सावल्या उभ्या राहत आहेत. वाऱ्याबरोबर सरकत आहेत. नीट पाहिले तर त्यांच्यातून वेगवेगळे आकार नजरेला पडताहेत. इमारतींच्या बाहेर कुंपणावर जी झुडपे आहेत, त्या झुडपांच्या सावल्या इमारतींच्या भिंतीवर पडल्या आहेत. वाऱ्याबरोबर सरकताहेत. तो उंट, तो ससा, तो कुत्रा जबडा वासून भुंकणारा - त्याच्या शेजारची ती पोस्टाच्या पेटीची सावली - ती एखाद्या बुटक्या रखवालदारासारखी दिसते आहे - आणि कुंपणाच्या सळ्या लांब होऊन तुरुंगाच्या गजासारख्या दिसताहेत! तुरुंगाचा देखावा अगदी पूर्ण! तुरुंग - किंवा वेड्यांचे इस्पितळ! हो, वेड्यांच्या इस्पितळाला रखवालदार हवाच! - इतर कुठल्याही इस्पितळातले रोगी पळून जाण्याचा प्रश्नच नसतो, नाही? पण वेड्यांचे इस्पितळ म्हणजे - तिथे कुणाला राहावेसे वाटणार आहे?

तुमचे काय मत आहे हो? वेडा असा डांबून ठेवलेला चांगला, की त्याला बाहेर फिरू दिलेला चांगला?

मला वाटते बाहेर फिरू दिलेला चांगला. म्हणजे तो डांबणुकीमुळे गांजून निदान अधिक वेडा तरी होणार नाही.

अर्थात माझा हा विचार वेड्यांच्या दृष्टीतून झाला.

पण तो तुम्हाला पटेलसे वाटत नाही; कारण सगळेच काही वेड्याच्या दृष्टिकोनातून विचार करणार नाहीत. ते आपल्या स्वत:च्या संरक्षणाच्या हेतूने वेड्याला डांबूनच ठेवायला पाहणार, नाही का?

जाऊ दे. हा सगळा विचारच वेडेपणाचा आहे.

पण एकट्याने निर्जन रस्त्यावर बसची वाट पाहत उभे राहिले की, कसले कसले विचार सुचतील, सांगणे कठीण!

नशिबाने एवढ्यातच एक डबल डेकर बस येते.

कशी तरी, रेंगाळत, मुळूमुळू चालत ती येते. ड्रायव्हरला घाई म्हणून नसावी. खरे तर शेवटची बस तुफान वेगात असायची - टिण् टिण् बेल वाजवून पुढे जायची - पण ही नुसती रांगत रांगत येत आहे. की आज मलाच सगळे उलटे भासते आहे, कुणास ठाऊक! खरे तर ती बस धड थांबतदेखील नाही. पण आज तिचा वेगच इतका मंद आहे, की चटकन् उडी मारून आत चढणे मला फारसे कठीण जात नाही.

बस चांगली भरलेली असते.

दारातच कंडक्टर उभा असतो. माझ्याकडे तो न्याहाळून पाहतो. त्याचे ते पाहणे मला मोठे विचित्र वाटते. तो बोलत मात्र काहीच नाही. माझ्यात एवढे वेगळे त्याला काय वाटते कुणास ठाऊक? बहुधा स्टॉपवर पॅसेंजर्स नसतील अशीच त्याची कल्पना असावी; त्यातून मी आगाऊपणा करून उडी मारून बसमधे चढलो, हे अर्थातच त्याला पसंत नसावे. नसेना, आपले काय जाते?

मी खांदे उडवून बसच्या अंतर्भागात जाऊ लागतो.

बऱ्याच पुढे एक जागा मोकळी असते.

मी तिकडे जाऊ लागतो. बस थोडीफार हालत असते. माझ्या झोकांड्या जातात.

सीट्सच्या कडांवर हात ठेवीत जात असताना एक गोष्ट माझ्या लक्षात येते.

बसमधले सगळे उतारू माझ्याकडे वळून पाहत असतात.

त्यांनी असे वळून कां पाहावे, तेच मला कळत नाही. एखाद्या अगदी परक्या विचित्र माणसाकडे पाहावे, तशी त्यांची ती नजर असते. टक लावून, रोखून ते पाहत राहतात. त्यांच्या नजरेची मला थोडी भीतीच वाटते. वाटते की, हे सगळे आपल्याला पकडणार आहेत, कुठेतरी नेऊन डांबणार आहेत. वाटते, या बसमधून उडी टाकून भन्नाट पळत सुटावे.

पण मी तसे काही करीत नाही.

कंडक्टर माझ्याजवळ येऊन उभा राहतो.

त्याच्या त्या जवळ येऊन उभे राहण्याचीसुद्धा मला भीती वाटते. वाटते की, हा माझ्यासारखा नाही. माझ्यात आणि याच्यात काहीतरी वेगळेपणा आहे...

कंडक्टर विचारतो, ''किधरसे आया?''

मला सगळ्या उतारूंची नजर माझ्यावर असल्याचे जाणवते.

कंडक्टर पुन्हा विचारतो, ''किधरसे आया?''

मी ज्या स्टॉपवर चढलो, त्याचे नाव सांगतो. कंडक्टर बाकीच्या उतारूंकडे पाहतो. हास्याची एक मंद लकेर सगळ्या लोकांमधून उठते.

आता मी सांगितलेल्या स्टॉपच्या नावात हसण्यासारखे काय असते? वेडे कुठले!

"किधर जानेका?" कंडक्टर खरखरीत आवाजात विचारतो.

मी त्याला उतरण्याचे ठिकाण सांगतो.

"बीचमें नहीं ना उतरोगे?" तो कुचेष्टेने विचारतो. सगळे उतारू जोरात हसतात.

त्याच्या त्या कुचेष्टेचा मला अतिशय संताप येतो. पण मी काहीच बोलत नाही. कारण बाकीचे सगळे लोक उघडच त्याच्या बाजूचे दिसत असतात.

बसचा वेग एव्हाना थोडासा वाढलेला असतो. निदान ती मघासारखी रेंगाळत तरी नाही.

अचानक माझे लक्ष शेजारच्या माणसाकडे जाते. तो माझ्याकडे डोक्यापासून पायापर्यंत न्याहाळून पाहत बसलेला असतो.

मी त्याच्याकडे पाहताच तो थोडासा वरमतो. कदाचित थोडा घाबरतोच. पण माझ्यात घाबरण्यासारखे काय असते, कुणास ठाऊक?

तरीदेखील मी त्याच्याकडे पाहातच राहतो. आमच्यात एक विचित्र ताण निर्माण होतो. तो सैल करण्यासाठी बोलावे, तसेच काहीसे हसून तो मला म्हणतो - "काय, कसं काय?"

माझा स्वभाव काहीसा माणूसघाणा आहे; म्हणजे आपण बरे, की आपले काम बरे, अशी माझी वृत्ती. विशेषत: अशा परक्या ठिकाणी उगाच कुणाशी तरी ओळख वाढवून काहीतरी बोलत बसायचे, हे नाही मला आवडत. अर्थात कोणी आपणहून बोलल्यानंतर त्याच्याशी मुद्दाम तुटकपणे वागण्याचाही माझा स्वभाव नाही. म्हणून मीदेखील किंचित हसतो व 'ठीक' म्हणून गप्प बसतो.

थोड्या वेळाने तोच आपणहून म्हणतो, "आज थंडी चिक्कार आहे, नाही?"

"हो ना," मी म्हणतो. "खूपच आहे." आणि हात बगलांमधे दाबून त्यांच्यात ऊब आणायचा प्रयत्न करू लागतो.

माझे हे उत्तर त्याला तुटकपणाचे वाटते, की काय, कुणास ठाऊक! पण तो एकदम गप्प बसतो, एवढे खरे.

आता थंडी अधिकच जाणवू लागते. कारण बसचा वेग फारच वाढलेला असतो आणि खिडक्यांमधून थंड वारे घुसू लागलेले असते. खिडकीशी बसलेला माझा शेजारी खिडकीची काच खाली करतो. त्या कामात मीदेखील त्याला मदत करतो. खिडकी बंद होते, तशी थंडी बरीचशी आटोक्यात येते.

आजुबाजूला पाहतो, तर सगळ्या खिडक्या पटापट बंद होतात. सगळे उतारू जसे काही एकाने खिडकी बंद करण्याचीच वाट पाहत असतात. बस आता एखाद्या काचेच्या बंद पेटीसारखी होते.

हळूहळू माझा शेजारी पुन्हा माझ्याशी गप्पा मारायला सुरुवात करतो. मला हलकेच म्हणतो - "आजची विशेष बातमी समजली?"

मी विचारतो, "कसली?"

तो म्हणतो, "वेड्यांच्या इस्पितळामधून आज म्हणे काही वेडे पळाले."

ही कसली बातमी? मला तर या बातमीचे विशेष काहीच वाटत नाही.

तो जरा वेळ या बातमीचा माझ्यावर काय परिणाम होत आहे हे न्याहाळतो आणि मग म्हणतो - "तुम्हाला नाही काही वाटलं?"

"वाटलं ना. वाटलं तर." मी त्याच्या कलाने घेत म्हणतो. खरे तर मला आता त्याच्याच डोक्याचा संशय येऊ लागलेला असतो.

"अहो आणि भयंकरच होते म्हणे हे वेडे. त्यांच्यातला प्रत्येकजण वरून अगदी साधासुधा वाटणारा आहे - पण आतून -"

"कसा काय आहे?" मी अगदी शांतपणे विचारतो.

"अहो, खुनी - तामसी! वाटेत येईल त्याला आडवा करील असा! पिसाळलेला वेडा!"

आणखीही तो खूप बोलत राहतो. वेडे कसे हुषारीने निसटले - निसटल्यावर त्यांनी कसा पहिल्याने रखवालदाराचाच गळा दाबून प्राण घेतला, नंतर त्याच्याच जवळचा चाकू घेऊन ते बाहेर पडले; त्यांच्यातला एकजण तर कसा फारच हुषार आहे, चाकूने तो गळा कसा या कानापासून त्या कानापर्यंत सफाईने कापू शकतो, वगैरे वगैरे सगळे तो सांगतो. मी आपला नुसता 'हं हं' करीत राहतो. मला त्यात काही विशेष वाटत

नाही - असल्या बातम्या आपण दररोज पेपरात कितीतरी वाचतो - म्हणे वेडे हुषारीने पळाले - त्यात एवढे रंगवून सांगण्यासारखे काय आहे? डांबून ठेवलेल्या प्रत्येकाला पळून जावेसे वाटतेच!

बस आता फारच वेगात असते. काचा बंद आणि बाहेर काळोख यामुळे बाहेरचे काहीच दिसणे शक्य नसते; पण बसला नुसते पंख फुटल्यासारखी ती उडत असते.

''नाही - आपल्याला वाटतं की वेडे म्हणजे वेडेच ते - त्यांना काय येणार? पण असं काही नसतं बरं का - वेड्यांना बऱ्याच गोष्टी येतात. फक्त त्यांचं माथं काही एका विषयात फिरलेलं असतं.''

''हो - म्हणजे तेसुद्धा शहाणे म्हणतात म्हणून. नाहीतर वेड्यांना स्वत:ला ते बरोबरच वाटतं.''

''म्हणजे?'' माझ्या शेजारच्या माणसाचे डोळे लकाकतात. का कोण जाणे, पण त्याला थोडे हसू फुटते.

मी वैतागतो. माझ्या शेजारी बसून वेड्या माणसांवर चर्चा करणाऱ्या त्या माणसाचा मला उगाचच संताप येतो. कधी एकदा माझा स्टॉप येईल, असे मला होऊन जाते. ही बस आलीय तरी कुठवर? मी बाहेर पाहण्याचा प्रयत्न करतो. काळोखात काही पत्ता लागत नाही.

''अगदी सराईतासारखा गळा कापला म्हणे! एक सोडून दोन माणसांचा - चाकूनं! म्हणजे काय चेष्टा आहे?''

आता मात्र माझी सहनशक्ती संपते. मी आजुबाजूला पाहतो. कुठेच जागा शिल्लक नसते.

तरीही मी उठतो. वरच्या डेककडे जाऊ लागतो.

पुन्हा सगळ्यांच्या नजरा माझ्यावर रोखतात. त्याच, हसू दाबणाऱ्या कुचेष्टेच्या नजरा.

''किधर जाता है? स्टॉप अभी तक आया नही, बैठो जगापर।'' कंडक्टर गुरकावतो.

''अपर डेक जाता है।'' मी विनवणीच्या सुरात सांगतो.

''अच्छा - जाओ - जाओ'' तो हात हलवीत म्हणतो. ''अपर डेक जाओ -'' आणि मी पायऱ्या चढत असताना हसत हसत इतरांना म्हणतो - ''उपर बैठने दो - बाहर कुद पडके भागनेवाला तो नहीं है?''

त्याच्या त्या शब्दांचा अर्थ मला कळत नाही. पण त्या शब्दापाठोपाठ सगळ्यांचा हशा मात्र माझ्या कानावर येतो.

मी ओठ चावतो.

आश्चर्य म्हणजे वरचा डेक एकदम रिकामा असतो. फक्त दोनच उतारू दोन खिडक्यांमधे बसलेले असतात.

मला शांत वाटते. इथे तरी तो हशा नाही. त्या रोखलेल्या नजरा नाहीत, तो वटवट करणारा शेजारी नाही - तो उर्मट कंडक्टर नाही -

मी एका खिडकीत बसतो. बाहेर पाहतो.

आकाशातला पूर्ण चंद्र अचानकपणे माझ्या नजरेला पडतो.

मी समोर पाहतो. दोघेही उतारू आरामात खिडक्यांमध्ये बसलेले असतात.

आता बसचा वेग इतका वाढलेला असतो की, ती अपघात केल्याशिवाय राहणार नाही असे वाटते.

समोरचा उतारू बहुधा झोपी गेला असावा. त्याची मान डुगूडुगू हलत आहे.

मी अस्वस्थपणे बाहेर पाहतो. चंद्र बसबरोबर धावत आहे, विलक्षण वेगाने.

मी समोर पाहत बसून राहतो. डुगूडुगू हलणाऱ्या डोक्याच्या त्या माणसाकडे, म्हणजे त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे.

एका परीने या शांततेचीदेखील मला भीती वाटू लागते.

आणि एकाएकी एक विलक्षण प्रकार घडतो.

समोरच्या माणसाचे डुगूडुगू हलणारे मुंडके एकदम गळून पडते.

मी किंचाळतो.

धावतच दुसऱ्या माणसाकडे जातो. त्याचा खांदा धरून हलवीत त्याला म्हणतो, ''ते पाहा - ते पाहा!''

- आणि माझ्या धक्क्याने त्याचेही मुंडके गळून पडते.

मी विलक्षण भयाने किंचाळत सुटतो... दोन मुडदे... गळे कापून... पुन्हा मुंडकी धडावर ठेवलेले दोन मुडदे... लाल लाल रक्त... ओली प्रेते... माझी किंचाळी थांबतच नाही...

धाडधाड जिना उतरून मी खाली येतो. कंडक्टर आत उभा असतो त्याच्यापर्यंत. किंचाळतच जातो. त्याला विचारतो - ''याचा अर्थ काय? ते - ते दोघे कोण?''

''ते - ते या बसचे मूळचे ड्रायव्हर-कंडक्टर.'' कंडक्टर कुचेष्टेने हसत म्हणतो, त्याचे डोळे चकाकतात.

‘‘पण - पण त्यांचा खून झालाय - काहीतरी चाललंय - हा-हा भयंकर वेडेपणा आहे -’’

‘‘आम्ही वेडे आहोत. आम्ही सगळे.’’ चामडी बॅगेतून रामपुरी चाकू बाहेर काढीत, तो सराईतपणे उघडीत कंडक्टर म्हणतो. ‘‘ते दोघे शहाणे होते आणि तू - तू तिसरा.’’

रामपुरीचे पाते पुढे होते.

सगळे खदखदा हसत माझ्याभोवती जमतात.

- आणि बस भन्नाट वेगाने, कुठे कोण जाणे, चाललेली असते.

▪

फॅन्टॅस्टिक

यार, आपण एक थर्ड-क्लास स्क्रीन-प्लेराइट आहोत.

तुमच्या भाषेत 'पटकथा-लेखक!' फिल्लमवाल्यांच्या भाषेत - 'रायटर!' 'सस्पेन्स'वालं पिक्चर लिहिणं म्हणजे आपला एकदम बाये हाथ का खेल!

त्यात काय आहे, मुळात आपलं डोकं वाईट नाही. सवयीनं काहीतरी सुचतंच. शिवाय इंग्लिश कादंबऱ्यांचं वाचन जबरदस्त! कधी त्यातलीच एखादी गोष्ट इकडून-तिकडून बदलून खपवायची. बदलदेखील स्वत:चे करायला नकोत. त्यासाठी प्रोड्यूसरपासून सेकंड हिरॉईनपर्यंत प्रत्येकजण आपापले वार करून मूळ स्टोरीचा 'खिमा' करायला टपलेलाच असतो. आणि काय सांगू दोस्त, एखादे वेळेस हा खिमा ज्युबिलीदेखील करून जातो. पिक्चर हिट गेलं की, 'रायटर'चा भाव वधारतो, नवी कॉन्ट्रॅक्टस मिळतात, पैसा मिळून जातो. तकदीर की बात है!

तर असे आपण थर्ड-क्लास 'रायटर!' थर्ड-क्लास आहोत, म्हणून आज इंडस्ट्रीत टिकून आहोत. फर्स्ट क्लास कलावंत असतो, तर फूटपाथवर पडलो असतो. मस्करी नाही! माझ्या ओळखीचे आहेत असले चार-दोन मस्त कलंदर! आर्टिस्ट ग्रेट आहेत. आपण त्यांना मानतो, पण साला इंडस्ट्री भिकार X X आहे! या कलंदर कलावंतांना आपण पावउसळीला पैसा दिलाय! *(*आणि त्यांनी सांगितलेल्या आयडियाज स्वत:च्या म्हणून खपवल्या आहेत. इसको कहते है दुनिया*!)*

कधीकधी वाटतं की पावउसळीला महाग व्हावं, पण तसं दर्द लावून लिहिता यावं. मगर ही तर भय्या, एकेकाच्या किस्मत की बात आहे. चलता है! आपल्या नशिबात बंगला-गाडी होती - दर्द नव्हती! असं म्हणतो, आणि सोडून देतो झालं. आपण काहीच मनाला लावून घेत नाही!

भाई, मनाला काही लावून घेऊन कोणी फिल्म इंडस्ट्रीत टिकलाय?

पण राणीला एवढी अक्कल नाही.

हजार वेळा समजावून पाहिलं - पण मानत नाही.

वेडी माझ्यावर आशिक आहे. जीव तोडून मोहोब्बत करते. मलाही ती आवडते, नाही असं नाही. अबे, जिच्या खुबसुरतीवर आणि लाजवाब 'ॲक्टिंग'वर लाखो पब्लिक फिदा आहे, ती काय आपल्याला नको असेल? पण 'दिल की बात' करायची तीदेखील भेजा सांभाळून! येता-जाता जमेल तेवढा चान्स आपण घेतो - पण पागलपणा करीत नाही!

कारण राणीच्या बाबतीतला पागलपणा भलताच महाग पडेल!

कां म्हणून काय विचारता? अहो, गोष्ट जगजाहीर आहे! राणीच्या बाबतीत खुद्द आमचे प्रोड्यूसर नंदलालजी पागल आहेत!

नंदलालजी - आम्ही त्यांना नुसतं 'लालजी' म्हणतो - म्हणजे राजा माणूस. त्यानंच मला इंडस्ट्रीत आणलं, टिकवलं, मोठं केलं. वेळप्रसंगी पैशांची मदत केली. माणूस इंडस्ट्रीत पक्का पाय रोवून. दोन स्टुडिओ मालकीचे - डिस्ट्रिब्युशन स्वत:चं! सस्पेन्स पिक्चर्सचा राजा समजला जातो! आणि असला हा मजबूत धंदेवाला मरतो कुणासाठी? तर त्या दीडदमडीच्या राणीसाठी! साला इष्काचं लफडं अजब आहे! हां, आता तिला पण इंडस्ट्रीत काही कमी भाव नाही! पण आला तो कुणामुळे? तिला पुढं आणलं ते कोणी? काय राव कमाल करताय? लालजीनं आणि कोणी?

आता तुम्हीच बघा - लालजीला पोरींची काही कमी आहे का? त्यानं नुसती चुटकी वाजवली, तर राणीसारख्या शंभर पोरी धावत येतील - पण हा माणूस? राणीशिवाय कोणाकडे बघणार नाही - बाय स्वेअर! आणि ती म्हणजे, जरा त्याची नजर इकडची तिकडे झाली की, धावत येऊन पडलीच माझ्या गळ्यात!

क्या बोलेगा? दिलका मामला हा असाच आढाटेढा!

आता आपण काहीच मनावर घेत नाही; पण लालजीसारख्या माणसाच्या बाबतीत अशी फांदेबाजी करायची म्हणजे कसंसंच वाटतं. मी त्याचा पगारी नोकर - पण माझ्यावर त्याचा इतका जीव! माझी कंपनी असल्याशिवाय पिणार नाही म्हणतो. ***(पितो चिकारदा एकटाच, पण निदान असं म्हणतो.)*** माणूस बाकी दिलवाला. शिवाय डोकेबाज. धंदा बरोबर कळणारा. तुमचं ते आर्टबिर्टचं लफडं त्याला कळत नाही. पण त्याचं सस्पेन्स पिक्चर 'हिट' गेल्याशिवाय राहत नाही! रूपानं ओबडधोबड, जिभेचा सैल, अंगानं जिथंतिथं सुटलेला, असा हा माणूस कुठल्याच बाबतीत हळवा नाही. सेंटिमेंटल नाही. फक्त एक मजबुरी सोडून -

- राणी!

आणि तिनं तरी त्याच्यापेक्षा माझ्यात असं काय जास्त पाहिलं? खुबसुरती! जवानी! चिकन्या हिरोंना इंडस्ट्रीत वाण नाही. आणि जवानी? साला, आपली जवानी राणी म्हणेल तेव्हा तिच्या सेवेला रुजू आहेच! आपलं एवढंच म्हणणं की, तिनं फक्त जरा अक्कलहुषारीनं वागावं. लालजीची तब्येत सांभाळावी -

नाहीतर उद्या मी फूटपाथवर आणि ती - तिचं काय होईल ते सांगवत नाही!

हेच - हेच मी तिला सांगत होतो त्या दिवशी. आम्ही दोघं 'हॉटेल सन्सेट'च्या गच्चीवर बसलो होतो. माझ्या हातात व्हिस्कीचा ग्लास होता आणि राणी लाडात येऊन माझ्या मांडीवर बोटानं डिझाइन काढत होती!

''लालजी-लालजी! मला बिलकुल आवडत नाही तो माणूस! आय सिम्प्ली कान्ट स्टँड हिम.''

चौथीतून शाळा सोडून राणी सिनेमात आली, पण बोलताना मधेच इंग्लिश! जशी काही एकदम फॉरेन-रिटर्न्ड!

''मी एकदा त्याला सांगून टाकणारेय. तुझा-माझा संबंध संपला. तुझा म्हणजे, त्याचा.''

''असला मूर्खपणा करू नकोस. एकदा तुझं-त्याचं वाजलं, की दुसरा कोणी प्रोड्यूसर तुला उभी करणार नाही. अजून पुरं आयुष्य जायचंय.''

''मग काय, मी मनाविरुद्ध त्याचे सगळे प्रेमाचे चाळे खपवून घेऊ? आणि तुझ्यासाठी माझा जीव तडफडत असताना?''

''उगाच मी लिहितो तसले डायलॉग्ज मारू नकोस.''

''खोटं वाटतं तुला? डार्लिंग, तुला माझी काहीच का किंमत नाही?''

राणी खोटं खोटं रडू लागली. रडताना राणी फार सुंदर दिसते. विशेषत: खोटं रडताना. मी तिला थोडा वेळ तसंच स्फुंदू दिलं, आणि शांतपणे पीत राहिलो. आपल्या रडण्याचा माझ्यावर काहीच परिणाम होत नाही, असं पाहून ती रडायची थांबली, आणि आपल्या लो कट ब्लाउझवरून पदर सावरीत म्हणाली, ''काय बघतोस? चावट कुठला!''

तिचं लाजणं पाहिलं आणि ठरवलं, भाई, एकदा सोक्षमोक्ष लावून टाकायचा! - आपण की लालजी?

''आपण लगन्च करू टाकू, डार्लिंग. मग भानगड नको.''

''लगन्? आपण? अग, असलं काही केलं तर लालजी जीव घेईल माझा किंवा तुझा! एखाद्वेळी दोघांचाही!''

''आयडिया! मग डार्लिंग, आपणच त्याचा जीव घेतला तर?''

''क-क-काय?''

- माझ्या हातातला ग्लास पडता पडता सावरला.

''व्हाय डोन्ट वुई गेट रिड ऑफ हिम?'' परदेशी भाषेत कुठलाही विचार भयंकर वाटत नाही.

मी आजुबाजूला पाहिलं. सबंध टेरेसवर कोणीच नव्हतं. कोणी ऐकलं असण्याचा संभव नव्हता.

''सांग ना, डार्लिंग - आपण लालजीचा मर्डर केला तर -''

एव्हाना व्हिस्की डोक्यात फिरू लागली होती. जे विचार सुचायला एरवी धैर्य झालं नसतं, ते आता एकदम स्वच्छ दिसायला लागले.

लालजीचा खून -

आपल्या अन्नदात्याला मारून टाकायचं! सोन्याची अंडी देणाऱ्या कोंबडीची मान मुरगळायची?

अर्थात आता मी काय, किंवा राणी काय, लालजीवर तसे अवलंबून नव्हतो. दोघांनाही बाहेरच्या चिक्कार ऑफर्स येत होत्या. किंबहुना, लालजीमुळेच आम्हाला त्या घेता येत नव्हत्या. एका परीनं आम्ही त्याच्याकडे अडकून पडलो होतो. आम्हाला लालजीनं वर आणलं, म्हणून उपकाराच्या भावनेनं आजवर मी असा विचार कधी केलाच नव्हता; पण या इंडस्ट्रीत माणसानं जादा लॉयल असणं चांगलं नाही. उद्या चार पिक्चर्स फ्लॉप गेली की व्हेअर विल लालजी बी?

शिवाय हे राणीचं लफडं - आज ना उद्या लालजीला संशय आल्याशिवाय राहणार नाही - राणीचं वागणंच तसलं बेलगाम आहे. आणि मग जी बदनामी होईल त्याला लिमिट राहणार नाही - इंडस्ट्रीतला प्रत्येकजण छी: थू करील - धंदा मंदावेल. अहो, धंदा बसायला इथं कुठलंही कारण पुरतं!

बाब तशी डेअरिंगची आहे - पण या डेअरिंगचं बक्षीसदेखील तेवढंच मोठं आहे!

राणीसारखं लुसलुशीत बक्षीस - फुलटाईम आपल्या हातात - म्हणजे ते तीन लाखांची लॉटरी लागणंच की! आणि असं बघा राव, मर्दासारख्या मर्दानं, लालजीला घाबरून किती दिवस मन मारायचं?

तेव्हा लालजीचा खून करायचं असं आम्ही दोघांनी ताबडतोब ठरवून टाकलं. करारावर सही म्हणून राणीनं मला तिथल्या तिथं रोख एक चुंबन दिलं.

बट हाउ? खून कसा करायचा?

माझ्यासारख्या 'सस्पेन्स स्टोरीज' लिहिणाऱ्यानं 'सस्पेन्स किंग' लालजीचा खून करायचा, तर असातसा फालतू चालणार नाही. दोघांच्याही स्टँडर्डला शोभेलसा हवा, काय? तेव्हा आयडिया एकदम ग्रेट असायला हवी.

शिवाय एक गोष्ट निश्चित. काय वाट्टेल ते झालं तरी खुनाचा आळ आपल्यावर येता कामा नये. हो, कारण दुसऱ्या दिवशी आपण फाशी गेलो, तर कुठली राणी आणि कुठली चैन? अहो, मग खून करायचाच कशाला? तेव्हा खून तर झालाच पाहिजे आणि आपले हातही एकदम स्वच्छ राहिले पाहिजेत. अगदी साबणानं धुतल्यासारखे. कुणाला काहीच सिद्ध करता आलं नाय पायजेल! अगदी - उद्या राणी उलटली, तर तिलादेखील!

म्हणजे खून करूनही आपण निर्दोष राहिलं पाहिजे!

थोडक्यात, खून करायचा - आणि करायचा नाहीही!

हे कसं जमायचं?

अहो, यालाच तर डोकं लागतं!

आणि आमच्या खांद्यावर ते आहे हे तुम्हाला कबूल करायलाच हवं.

तेव्हा मी त्या क्षणीच 'खून मोहिमे'ला लागलो. डोक्यात व्हिस्की तेज असतानाच लालजीची कसून माहिती काढली राणीकडून. औरत की जात! बोलायला सुरुवात केली की थांबते थोडीच? मला माहीत असलेल्या, नसलेल्या - अगणित गोष्टी तिनं सांगितल्या.

त्यातली मला माहीत असलेली, पण आत्ता लक्षात नसलेली एक गोष्ट -

लालजीला 'हार्ट ट्रबल' आहे. दोन वर्षांपूर्वी एकदा एक अॅटॅकदेखील येऊन गेलेला आहे!

- क ऽ ट्!

आमच्या स्क्रीन-प्लेच्या टेक्निकप्रमाणे 'होटेल सन्सेट'मधला, मी आणि राणी यांच्यातला प्रसंग इथेच कट!

त्यानंतर एकदम राणीच्या फ्लॅटवरचा प्रसंग :

आम्ही तिथेच पीत बसलो होतो. मी, लालजी आणि राणी.

वेळ संध्याकाळची होती. हॉलमधली दोन झुंबरं नुकतीच लावलेली होती.

दुसऱ्या दिवशी ख्रिसमस होता, म्हणून राणीकडचे सगळे ख्रिश्चन नोकरचाकर संध्याकाळपासून रजेवर गेले होते. एक गुजराथी 'मेड' होती, ती रात्री घरी परत जायची. तेव्हा घरात आम्ही तिघेच होतो. राणीला एकटं राहण्याची सवय होती. कधीकधी तर मी किंवा लालजी आलो असताना, ती कुछ न कुछ सबब सांगून नोकरमंडळींना स्वत:च घराबाहेर काढत असे.

बराच वेळ आम्ही मजेत पीत बसलो होतो. राणी नखरे करीत पीत होती. नको नको म्हणायची, पण अस्सल बेवडेबाज औरत! माझ्या खालोखाल तिचं लिकरवर प्रेम! लालजी तर काय, त्याला कोणी स्कॉचचा हौद बांधून दिला असता, तर तो त्यात रात्रंदिवस माशासारखा पोहत राहिला असता. मी म्हणजे काय राव - आपल्याला तशी घ्यायला आवडते, पण तमाशा होणार नाही इतपत! शिवाय राणी बरोबर असताना कमी पितो. कारण दोन नशा एकत्र वाईट! नेव्हर मिक्स युअर ड्रिंक्स!

तेव्हा एकूण प्रोग्रॅम मजेत चालला होता. लालजी मोठमोठ्यानं बडबडत पीत होता. मधेच राणीच्या कमरेला विळखा घालीत होता आणि ती अंग चोरून घेत होती.

"साला, अपना लेटेस्ट पिक्चर एकदम सेन्सेशन हो जायेगा!" लालजी उत्साहानं सांगत होता - "असला सस्पेन्स - असला सस्पेन्स! एकदम ब्रेथ टेकिंग! आपण खूष आहोत साला रायटर तुझ्या स्टोरीवर!"

मी लवून 'आदाब अर्ज' केला ***(असले सगळे नखरे आता मला जमायला लागलेत.)*** आणि म्हटलं, "पण

लालजी, या पिक्चरची प्री-पब्लिसिटी पण तशीच सेन्सेशनल पाहिजे!''

''राइट!'' लालजी किंचाळून माझ्या मांडीवर थाप मारीत म्हणाला - ''यू आर पर्फेक्टली राइट! पब्लिसिटी सेन्सेशनल पाहिजे! काय करूया?''

''काय करणार? नेहमीसारखे माझे नुसत्या ब्रा-मधले प्रोमोज देणार असाल!'' राणी मुद्दामच त्याला चिडवल्यासारखं बोलली. राणीची एक वाईट सवय आहे. एक पेग घेतला की ती एकदम उर्मटपणा करायला लागते.

''वेळ पडली तर ब्राशिवायदेखील देऊ.'' थोडा दुखावून लालजी म्हणाला. ''पण तेवढ्यानं पुरेसं सेन्सेशन होणार नाही. काही तरी स्टंट करायला हवा - सस्पेन्स पिक्चर आहे - सो सम् प्रॅक्टिकल स्टंट - अजून कोणी केला नसेल असा!''

''व्हॉट डू यू मीन?''

''आय मीन व्हॉट आय से.'' लालजी ओरडला - नव्या कल्पनेनं आणि पोटात गेलेल्या व्हिस्कीनं त्याचा चेहरा एकदम उजळला होता. ''अरे, नुसती पब्लिसिटी तर काय कोणीही करील. आपण प्रॅक्टिकल स्टंट करून दाखवायला पाहिजे. टू प्रमोट द फिल्म - सम् ॲक्चुअल क्राइम!''

''ॲक्चुअल क्राइम?'' मी राणीकडे चमकून पाहिलं. ती मजेत हसत होती.

''म्हणजे रिअल क्राइम नाय. पण क्राइमचा इफेक्ट. सम् स्टंट! सम् फन्! नॉट एक्झॅक्टली अ क्राइम! पण डेथ, ॲक्सिडेंट - एनी थिंग विल डू! ओनली इट शुड बी सेन्सेशनल!''

- आणि याच वेळी एक वाईट गोष्ट झाली. राणी माझ्याकडे पाहून डोळे मिचकावताना लालजीला दिसली.

आणि कसा कुणास ठाऊक, त्याचा एकदम तोल गेला. कदाचित पूर्वीपासून जो संशय त्याच्या मनात धुमसत होता, तोच आता थोडीफार नशा चढल्यामुळे त्याच्या तोंडून बाहेर पडला असावा. तो राणीविषयी आणि माझ्याविषयी काय वाट्टेल ते बोलू लागला. मी त्याचं बोलणं थट्टेवारी नेण्याचा प्रयत्न केला; पण राणी मात्र त्याला चिडवतच राहिली.

झालं - दोघांची शब्दाशब्दी वाढतच गेली. मी दोघांनाही आवरण्याचा प्रयत्न करू लागलो. पण दोघांनाही पूर्ण नशा चढली होती. घरात कुणी नव्हतं म्हणून बरं, नाहीतर लालजीच्या त्या आरडाओरड्यानं सगळे जमा झाले असते. यार, मी तरी लालजीला कधीच इतका चिडलेला पाहिला नव्हता. असं वाटत होतं की कुठल्याही क्षणी राग असह्य होऊन याचं काळीज फुटून जाईल...

पण राणी थांबायला तयार नव्हती. त्याच्याविषयीचा तिचा सारा तिरस्कार आज उफाळून आला होता... इतके दिवस मोठ्या प्रयत्नानं लपवलेलं सारं विष ती आज ओकून टाकीत होती. तिचा नेहमीचा सुंदर चेहरा, संतापानं विद्रूप दिसायला लागला होता.

''मग? म्हणायचंय काय तुला? आय लव्ह हिम् - आय लव्ह अवर रायटर बाबू.'' सिनेमातल्या खलनायिकेसारखं हसत ती म्हणाली. आणि एवढं बोलून न थांबता तिनं त्याच्यासमोरच माझ्या गळ्यात हात घातले आणि माझा एक सणसणीत किस घेतला.

धिस वॉज टू मच! आजवर लालजीला कुणीच इतकं हलकेपणानं वागवलं नव्हतं. त्याच्या तोंडावर त्याचा असा अपमान केला नव्हता. आणि आज तो कुणी करावा? राणीसारख्या त्याच्या जिवाच्या कलेजानं? मग जगात राहिलंच काय?... लालजी संतापानं थरथरायला लागला. आता कुठल्याही क्षणी त्याच्या हृदयात कळ येऊन ते थांबेल असं वाटायला लागलं...

''यू बिच! आजवर तुझ्यासाठी इतकं केलं - आणि तू मला हे ऐकवतेस?'' यानंतर त्यानं घाणेरड्या शिव्यांची एक लांबलचक लाखोली वाहिली.

राणी पुन्हा एकदा अंगात आल्यासारखे हसली.

- आणि मग ते घडलं!

मी ज्याची वाट पाहत होतो ते नव्हे, पण तितकंच, त्याहूनही भयंकर!

लालजीनं राणीच्या अंगावर झेप घेतली आणि तिचा गळा दाबला.

त्याला आवरायला मला वेळच मिळाला नाही.

राणीचं शरीर एखाद्या कपड्यांच्या ढिगाऱ्यासारखं खाली कोसळलं.

लालजीनं खुर्चीत अंग टाकलं. त्याचा आवेश, संताप सारं काही झपाट्यानं ओसरायला लागलं होतं.

मी पुढं होऊन राणीच्या अंगाला हात लावून पाहिला. ते थंडगार पडलं होतं.

मला काही बोलावंच लागलं नाही. माझ्या चेहऱ्यावरूनच लालजी समजायचं ते समजला.

''आय किल्ड हर!'' तो मुसमुसत म्हणाला - 'मैंने अपनी हाथोंसे -'

त्याची व्हिस्की पार उतरली होती.

मी त्याच्या पाठीवर थोपटल्यासारखं केलं. या संकटात मी त्याला एकटं सोडणार नव्हतो. साला, मग इन्सानियत ती काय राहिली? लालजी माझा जवळचा माणूस होता. राणीदेखील जवळचीच होती. पण आता ती जिवंत नव्हती. तेव्हा लालजीला मरू द्यायचं कारण नव्हतं. उलट वाचवायचा प्रयत्न करायला हवा होता.

प्लॅन कसा उलटासुलटा झाला होता! जी आज जिवंत राहायला हवी होती ती मेली होती! आणि जो मरायला हवा होता, तो जिवंत होता!

राणीच्या मरणाचं मला दु:ख झालं नाही, असं नाही. पण ती वेळ दु:ख करीत बसण्याची नव्हती.

लालजीच्या हातून मर्डर घडला होता. तो झाकता येईल तेवढा झाकायला हवा होता. मी बाटल्या कपाटात टाकल्या, ग्लासेस सिंकमधे ठेवून नळ चालू केला. निदान आमच्या पार्टीचा तरी या मर्डरशी संबंध जोडला जायला नको होता. आता राणीच्या गळ्यावर उठलेले लालजीच्या बोटांचे ते वळ - त्यांचं काहीच करता येण्यासारखं नव्हतं.

राणीच्या शरीराला हातही न लावता मी तिला तसेच कार्पेटवर राहू दिले. लालजीला उठवले. एखाद्या लहान मुलासारखा तो मला बिलगला. मी स्विच ऑफ केला. झुंबर विझले.

बिलकूल आवाज न करता आम्ही दोघे खाली आलो आणि गाडी चालू केली.

''मी तुझ्याबरोबर येतो. एकटं घरी झोपायची मला भीती वाटते.'' लालजी असहायपणे म्हणाला.

''वेलकम्. पण पहाटे मात्र घरी जा. काहीही नेहमीपेक्षा वेगळं झालं, तर लोकांना संशय येईल.'' मी त्याला समजावलं.

- आणि घरी घेऊन आलो.

उद्या पोलीस इन्क्वायरी सुरू झाली, तर काय काय सांगायचं, याची आम्ही दोघांनी बारकाईनं उजळणी केली. अगदी लहानसहान डिटेलपर्यंत - म्हणजे आम्ही निघालो तेव्हा घड्याळात किती वाजले होते वगैरे, इथपर्यंत. भय्या, आपला सस्पेन्स रायटरचा भेजा इथं कामी आला! लालजीच्या त्या अवस्थेत त्याच्या डोक्यात कितपत शिरत होतं, कुणास ठाऊक! पण ठरवून ठेवणं आवश्यक होतं. पोलीस कधीही उठवायला आले असते.

सारं बोलून झाल्यावर मी लालजीला त्याचा बेड दाखवला, आणि झोपी गेलो.

पहाटे मला लवकर जाग आली. मी लालजीला उठवलं. तो रात्रभर नीटसा झोपलाच नसावा. कसंबसं सगळं आवरलं आणि आम्ही बाहेर पडलो. फार गाजावाजा होऊ न देता, लालजीला त्याच्या घरी पोहोचवायला हवं होतं.

लालजीचा एक नोकर आऊटहाऊसमध्ये झोपत असे. इतर नोकर रात्रीचे घरी जात. आम्ही आऊटहाऊसमधल्या नोकराला उठवलं नाही. बंगल्याचा मुख्य दरवाजा लालजीकडच्या चावीनं उघडला. मी त्याला बेडरूमपर्यंत पोहोचवलं.

दार उघडून लालजीनं बेडरूममध्ये पाऊल टाकलं मात्र -

दोन्ही हात पसरून राणी हसत हसत समोर आली.

एक दबलेली किंकाळी फोडून लालजी खाली कोसळला.

- इथं या हकीगतीचं मध्यंतर झालं.

मी खाली वाकलो आणि लालजी जिवंत नसल्याची खात्री करून घेतली. लगेच डॉक्टरला फोन केला.

अखेरीस आमचा प्लॅन यशस्वी ठरला होता.

मेलेली राणी जिवंत झालेली पाहताच, त्या धक्क्यानं त्याचं हृदय बंद पडलं होतं.

मी राणीची पाठ थोपटली. आपण किती श्रेष्ठ दर्जाचा अभिनय करू शकतो हे तिनं दाखवून दिलं होतं.

अर्थात हे केवळ सिनेमातल्या मरणाच्या अभिनयासारखं नव्हतं. इथं तिला मी मिळवून दिलेल्या गोळ्यांचाही उपयोग झाला होता. निदान काही तास माणूस मेल्यासारखा राहू शकेल, अशा औषधाच्या त्या गोळ्या. माझ्या एका जवळच्या डॉक्टर मित्रानं त्या मला मिळवून दिल्या होत्या. दुसऱ्या महायुद्धात, शत्रूला चकवण्यासाठी हेर मंडळी त्या वापरत असत म्हणे!

पण पार्टीमधे त्या जवळ बाळगून लालजीच्या नकळत गिळण्याचे कौशल्य तर राणीचे स्वत:चे होते? ...आणि नंतर लालजीच्या बंगल्याची स्वत:कडची चावी वापरून त्याच्या बेडरूममध्ये जाऊन बसण्याची आयडिया -

एक प्लॅन मोठ्या हुषारीनं पार पडला होता. एकमेकांचं कौतुक करीत आम्ही एकमेकांना बऱ्याच वेळा मिठ्या मारल्या. आता राणीची मिठी नेहमी माझ्यासाठी - एकट्या माझ्यासाठीच असणार होती, या कल्पनेनं मला धन्यता वाटली.

पण हे सगळं फार थोडा वेळ चाललं.

मग डॉक्टर आले, पोलीस आले, इंडस्ट्रीतले लोक जमा झाले - एकच गोंधळ उडाला. लोकांसमोर राणीनं अभिनयाची कमाल केली. पुन्हा पुन्हा लालजीच्या देहावर पडली काय, डोकं आपटून घेतलं काय! चारचार लोकांना न जुमानता अनावर झाली काय, हमने तो साला मान लिया!

तीन-चार तासांत लालजीची प्रेतयात्रा निघाली.

इंडस्ट्रीतले लहानथोर सारे प्रेतयात्रेला जॉइन झाले होते. अगदी टॉप स्टारपासून ते एक्स्ट्रापर्यंत. शिवाय प्रेस रिपोर्टर्स - स्टुडिओतले मजदूरसुद्धा. लालजीचं इंडस्ट्रीत किती वजन होतं आणि किती लोकांना त्याच्याविषयी मोहोब्बत होती, हे मला त्या वेळेस आणखी एकदा जाणवलं.

अशा माणसाचा आपण केवळ बाईच्या लफड्यात सापडून खून करावा, यासाठी मला थोडं शरमल्यासारखं झालं. पण काय सांगू यार, झाला तो खून थोडाच होता? ॲक्सिडेंट्स ऑलवेज हॅपन. त्यातून त्याला एकदा हार्ट ॲटॅक येऊन गेलेलाच होता. ओव्हरस्ट्रेन, पिणं होतंच. आता या वयात सोसत नाही. बाकी असा माणूस पुन्हा होणार नाही. हार्ट ऑफ गोल्ड... मला तो मोठ्या भावाच्या ठिकाणी होता... वगैरे झक्क मुलाखती मी रिपोर्टर्सना दिल्या.

हळूहळू चंदनी लाकडाची चिता उभारली गेली.

सगळे स्तब्ध झाले.

लालजीचा मानलेला भाऊ म्हणून चितेला काडी लावायचं काम माझ्याकडे होतं.

मी काडी पेटवली आणि आता ती सरणाला लावणार, एवढ्यात -

- एवढ्यात लालजी सरणावर उठून बसला.

डोळे चोळीत चोळीत त्यानं आपल्या भरदार आवाजात घोषणा करायला सुरुवात केली - ''भाईयो और बहनो, अपनी आनेवाली सस्पेन्स फिल्म इसी सबजेक्टपर है| एक आदमी जो मर जाता हे, वो मरनेके बाद भी जिंदा होकर -''

पण त्याची घोषणा ऐकायला कुणीच जागेवर नव्हतं. जो तो मिळेल त्या दिशेला पळत सुटला होता. जमावाची क्षणात पांगापांग झाली. मीदेखील कसंबसं राणीला खेचलं आणि तिचा दंड धरून गाडीत बसलो. राणी भयंकर घाबरली होती. मी कार शक्य तेवढी फास्ट चालवीत होतो.

आम्ही दोघंही एकमेकांशी बोलण्याच्या मन:स्थितीत नव्हतो.

पण डोकं चालतच होतं - शेवटी मी राणीला म्हटलं, ''आपण थांबायला हवं होतं त्याच्यासाठी.''

''कुणासाठी?'' राणीनं भीतीनंच विचारलं.

''लालजीसाठी.''

राणीनं शहारल्यासारखं केलं.

''बिचाऱ्याला कुणीच लिफ्ट दिली नसेल.''

''आर यू सिरियस?''

''अग असं काय करतेस? आपल्यासारखीच लालजीलाही त्या गोळ्यांची माहिती असणार, हे उघड आहे. त्या गोळ्या घेऊन तो तीन-चार तास मेल्यासारखा राहिला असणार. नंतर शुद्धीवर आला असेल - पण आपल्या पिक्चरची अनाउन्समेंट करायला नाट्यपूर्ण क्षणाची वाट पाहत राहिला असेल! मी काडी पेटवताच उठून बसला. असला काहीतरी स्टंट करायचं त्याच्या डोक्यात होतंच!''

राणीची भीती कमी झाली. तरीही ती एकटी घरी जायला तयार होईना. मी तिला घरी घेऊन गेलो. आज आम्हा दोघांनाही मनावरचा ताण घालविण्यासाठी बिछान्यावर आरामशीर पडून राहण्याची जरूर होती.

मी बेडरूमचा दरवाजा लावून घेतला, खिडक्यांचे तलम फुलाफुलांचे पडदेसुद्धा खाली सोडले. ब्रँडीचा एक छोटा पेग राणीला पाजला, अंगात गरमी खेळायला लागेपर्यंत स्वत:ही ढोसली.

राणीनं मला गच्च मिठी मारली. कालपासूनच्या सगळ्या विचित्र प्रकारांनी आम्ही दोघंही थकून गेलो होतो. काही क्षण आम्ही अक्षरही न बोलता एकमेकांच्या मिठीत तसेच निश्चल बसून राहिलो.

मग राणीला हलकेच बिछान्यात ठेवलं आणि शर्टची बटनं सोडू लागणार -

इतक्यात राणी किंचाळून उठून बसली.

बिछान्यात आणखी कुणीतरी होतं...

जे काय होतं, त्याच्या डोक्यापर्यंत पांढरी शुभ्र चादर होती. आत्ताच पाहिलेल्या प्रेतासारखी.

हळूहळू ती चादर खाली होत होती... आणि तिच्या खालचा लालजीचा ओबडधोबड चेहरा दिसू लागला होता -

"तुला वाटतं तसा मी जिवंत नाही, रायटर -" लालजीचा आवाज दूरवरून आल्यासारखा येत होता - "पण मी परत आलो. दोन गोष्टींत माझा जीव अडकलाय. आपले पिक्चर आणि राणी. पिक्चरची अनाउन्समेंट मी मघाशी केली - आता या असल्या फॅन्टॅस्टिक पब्लिसिटीनं ते हिट गेल्याशिवाय राहत नाही... आणि राणी - मी यानंतर नेहमीच तिच्याबरोबर असेन, रायटर; आणि तुझ्याबरोबरही. तुम्ही दोघांनी माझा खून केलात. आता मी तुम्हा दोघांना सोडणार नाही... सोडणार नाही...

पांढऱ्या चादरीत गुंडाळलेला तो काळाकभिन्न चेहरा आम्हा दोघांच्या दिशेनं येऊ लागला.

मी राणीची किंकाळी ऐकली... मग माझ्या डोळ्यांपुढं काळोख पसरला...

काय राव, आहे की नाही स्टोरी फॅन्टॅस्टिक? कोण म्हणतं आम्हा सिनेमावाल्यांना ओरिजिनल स्टोरीज् सुचत नाहीत म्हणून? आता उद्याच ही गोष्ट लालजीच्या कानावर घालतो. तिचा 'खिमा' कसा करायचा हे त्याला चांगलं ठाऊक आहे!

■

हडळ

कात्रीने जागोजाग भोकसे पाडावेत तसे आभाळ उसवले होते. मोठ्या छिद्रांच्या झारीतून गळावे तसे पाणी नुसते झराझर गळत होते. धारा कसल्या नि थेंब कसले, पाणी जसे काही आभाळात मावत नव्हते आणि जमिनीवर हजार वाटांनी कोसळण्यासाठी पुन्हा पुन्हा उचंबळून येत होते. दिवस अंधारले होते आणि रात्री ओल्याचिंब झाल्या होत्या. मधुनमधून वारे भरारा फिरत असे. असले जोराचे वारे त्या पावसातून भरकटू लागले, म्हणजे एखादे बुळबुळीत ओले हिंस्र नखाळ जनावर फिस्कारते, तसे भासू लागे. पिसाळल्यासारखा मग पाऊस अंगावर येई आणि दारे, खिडक्या दणाणून झोडी. झोपड्यांची झडपे फडाफड मुस्कटात मारावे तशी कडकडत. एखादुदसरे हलके खोपटे ढासळून टाकी, झाडझुडूप उपटून फेकून देई. वाऱ्यापावसाच्या त्या माथेफिरू जोडगोळीच्या थैमानाला भिऊन चिटपाखरू घराबाहेर पडत नव्हते. धारेत सापडलेल्या काटकीसारखे माणूस त्या धुवाधारांत गरगरून जायचे. आधीच रानातल्या त्या वेड्या वाटा, एरवीसुद्धा चक्रावून टाकणाऱ्या; त्यात पावसाने तर हातावरचेसुद्धा दिसत नव्हते. गावात सगळीकडे ढोपरभर चिखल झाला होता. त्यात जनावरदेखील रुतून बसेल असे वाटायचे; वहाळ फुगून वाहत होते, त्यात माती ओरबाडून धावणारे रक्तासारखे लाल पाणी येई, पैलवानदेखील पायाखालचा धोंडा निसटून त्यात गडप होण्याचा संभव! सारी दारे बंद; गाव सुन्न झाला होता! ढोलीबाहेर पडलेल्या पक्ष्यांची ताठ झालेली, पाय वासलेली प्रेते ओल्या पाचोळ्यात पडली होती. भिंतीवर किरटी जिवाणू धावत होती. दिशा भिन्नाट झाल्या होत्या आणि माणसे हरवल्यागत झाली होती. नाही म्हणायला मधेच तास दोन तास थोडे उजाडायचे, पाऊस उघडायचा; एवढ्यात फिरून काळे ढग जमून यायचे आणि पाऊस गावाला झोडीत सुटायचा.

बाहेर चाललेले हे तांडव तिला समजत नव्हते असे नाही; पण तिच्या डोक्यात जो कालवा माजला होता, त्यापुढे ते काहीच नव्हते. विचार करून करून तिच्या डोक्याला मुंग्या आल्यासारख्या झाल्या होत्या, आणि तरी विचार काही सुटत नव्हता. पाणलोटाने एखाद्याचा जीव घ्यावा, आणि प्रेतालासुद्धा पाण्याचेच सपके बसत राहावेत, तसे विचार तिच्या डोक्याला डसत होते. गुडघ्यांत डोके खुपसून ती सुन्नपणे बसली होती खरी, पण तिच्याभोवती हजार विचारांची भुतावळ नाचत होती.

समोरच्या खाटेवर तिचा सतरा वर्षांचा पोर आडवा पडला होता. गेले आठ दिवस तो असाच पसरला होता. त्याची शुद्धच गेली होती. पहिले पहिले दिवस तिने त्याचे हातपाय चोळून पाहिले, त्याच्या तोंडात दूध-पाणी काही घालण्याचा प्रयत्न केला; पण त्याचा काही उपयोग झाला नव्हता. दिवसेंदिवस तो असाच निपचित पडून होता. त्याला काय झाले आहे हेसुद्धा तिला ठाऊक नव्हते. समजण्याचा मार्ग नव्हता. असल्या या आकांताच्या पावसात कुणी त्याला बघायला आले नसते की, औषध सांगून गेले नसते. बरे, त्याला वैद्याकडे घेऊनही जाता येत नव्हते. तिचे घर रानात, वस्तीपासून लांब. कुणा बाप्याला हाकारावे, तर तेही शक्य नाही. असल्या या पावसात ज्याला-त्याला आपला जीव कसा सांभाळावा याची फिकीर पडलेली, तर तिच्या पोराला उचलून कोण वैद्यबुवासमोर घालणार? ती पडली बाईमाणूस - मधल्या वयाची; ती कशी त्या पोराला उचलून नेणार?

तरी ती आपणहून उठून एकटीच वैद्याकडे जाऊन आली होती. दोन-चार वेळा. घरात दुसरे कोणीच नव्हते. शेजार नव्हताच, पोराकडे बघा, म्हणून तरी कुणाला सांगणार ती? बाहेर गेल्या वेळीच पोराचे बरेवाईट झाले असते तर समजलेसुद्धा नसते. तिला त्याला शेवटची हाकसुद्धा मारता आली नसती, पण ती ईश्वरावर हवाला ठेवून जायची. दवा घेऊन यायची आणि पहिल्यांदा खाटेकडे जाऊन बघायची, तर तिथे पडलेल्या शरीरात धुगधुगी असायची. ती त्या गळक्या आभाळातल्या देवाला हात जोडायची, आणि पुन्हा समोरच्या त्या शुद्ध हरपलेल्या पोटच्या गोळ्याची राखण करीत बसायची.

आजही मध्ये पाऊस उघडण्याची संधी साधून ती एकदा वैद्याकडे जाऊन आली होती. चार वेळा नेलेल्या

औषधाला कसा काहीही गुण आला नव्हता, हे तिने सांवेस्तर सांगितले होते. आज तरी एकदा पोराला बघून जा, असे डोळ्यांत पाणी आणून सत्रांदा विनवले होते, पण तिच्या खोपटात यायला वैद्याला वेळ नव्हता. खोताच्या म्हाताऱ्याला दम्याची धाप लागली होती आणि पावसापायी खोताचा वाडा गाठणे मुष्कील, म्हणून तो कुरकुरत बसला होता; त्यात ही पीडा कुठून आली, या विचाराने त्याने तोंड वाकडे केले. खोताचा सगळा कारभार रोखीचा, त्यात आणखी दामदुप्पट सांगता येत असे, शिवाय वर बक्षिसी मिळेल ती वेगळीच. याउलट, या दरिद्री विधवेला काही औषध आता द्यावे, तर पैसे पुढल्या वर्षापर्यंत मिळण्याची काही खात्री नाही. त्यातून दाम घटवण्याची भाषा आणि आग्रह मात्र पावसातून पोराला बघायला चलण्याचा! वैद्य काय असा वाटेवर पडलेला असतो?

या दरिद्री लोकांची पोरे अशीच मरायची! पावसाच्या सपाट्यात सापडून बेवारशी कुत्री काय कमी मरतात? मग यांनाच काय एवढी मस्ती? या भिकाऱ्यांना पोरांचा भारी लोभ! एवढी काय इस्टेट वाया जात असते कुणास ठाऊक? त्यातून आठ दिवस जो पोर औषधाला दाद देत नाही, तो मेल्यातच जमा! खोताचा म्हातारा मात्र जगलाच पाहिजे. त्याला वाचवल्याने गावातला मान तर वाढणारच होता. शिवाय म्हातारा वरचेवर आजारी पडायचा; म्हणजे महिन्याच्या महिन्याला त्याचे पाचपंचवीस रुपये उत्पन्न तरी ठेवलेलेच होते. तेव्हा तो जगायलाच हवा - काहीही करून!

पण तिची ती ओलीचिंब, थरथरणारी, कुडकुडणारी आकृती एखाद्या पिशाचासारखी त्याच्या ओट्यावर बसली होती. तिचे ते अपशकुनी ध्यान वाटेतून दूर केल्याशिवाय त्याला खोताकडे जाता आले नसते. तेव्हा तिची कटकट काढण्यासाठी त्यांनी एक जालीम मात्रा उगाळली. औषध तिच्यापुढे ठेवीत ते म्हणाले, "हे मोठ्ठं जालीम औषध आहे बरं. तू म्हणतेस दुसऱ्या औषधाचा गुण नाही, म्हणून देतोय हे. इतके दिवस देत नव्हतो, कारण यात धोका असतो. माणूस एकदम उठून तरी बसतो खाडकन्, 'नाहीतर -' " वैद्यबुवांनी नजर आकाशाकडे टाकली.

त्यांनी दिलेले औषध घेऊन ती खोपटात परत आली होती. नाकाजवळ हात धरून पाहिला होता. अजून धुगधुगी होती. औषध देताना तिचा हात क्षणभर अडला; पण दुसऱ्याच क्षणी तिने बेधडकपणे ते देऊन टाकले. नाही तरी आता आशा फारशी नव्हती. मग भीती तरी कसली?

पण त्याच्यात काहीच फरक नव्हता. अजून तो तसाच निपचित पडून होता. तिचे डोळे परत परत भरून येत होते. एवढा मोठा झालेला मुलगा; एवढासा पाळाएवढा होता, तो आता चांगला उंच वाढलेला! झाडाच्या मुळासारखे रुंद मनगट झाले होते त्याचे; आणि आता ते सारे चिमूटभर राख होऊन जाणार होते. आत्ताच कुठे त्याची हनुवटी काळी झाली होती. छाती भरू लागली होती. चाल पुरुषासारखी झाली होती. आवाज घोगरा झाला होता. जुळलेल्या भुवयांखालचे बदामी डोळे तिच्यावर लावून तो घोगऱ्या आवाजात बोलू लागला की, तिला आठवण व्हायची ती नेमकी त्याच्या वडिलांची. नुकतेच लगन् झाल्या वेळची -

तिच्या डोळ्यांना पुन्हा धारा लागल्या. ते गेले आणि आता हादेखील - मी मात्र एकटी थांबले आहे सगळ्यांची मरणे बघत दळभद्र्यासारखी - बाहेर गडगडले, आणि पुन्हा एकदा मुसळधार सुरू झाली. एक पाल खिडकीच्या कडेकडेने चालत बाहेरून आत आली आणि तिथेच बसून चुकचुकू लागली.

तसे पाहिले तर डोळे आपले सवयीने गळत होते एवढेच. पण आता आशा ओसरत चालली होती. आठ दिवसांपूर्वी पहिल्यांदा तो आडवा झाला, तेव्हाच त्याचा प्राण गेला असता, तर त्या धक्क्याने कदाचित तिला वेडसुद्धा लागले असते. पण आता तो परत उठणार नाही हे तिला कळून चुकले होते. ती रडत होती, पण रडतानाही तिचे परिस्थितीचे भान कायम होते. किंबहुना आता तिची तीच एक सोबत होती. जगाचा विचार विसरून चालले नसते. कुठल्याही क्षणी ती एकटी - अगदी एकटी झाली असती. नव्हे, आताही ती एकटीच होती. समोर पसरलेल्या देहाचे तिच्याशी असलेले नाते हळूहळू तुटत चालले होते. ते पुरते तुटेपर्यंत ती फक्त हाडाची काडे करून औषधपाणी करणार होती. त्याचे सारे काही करणार होती. पण तेही तिला फार वेळ करावे लागणार नव्हते.

विचारांच्या मुंग्यांनी डोके पोखरले. तिला ग्लानी आल्यासारखी झाली. डोके एका बाजूला कलंडले.

- आणि एकाएकी दारावर बसलेल्या थापेने ती दचकून जागी झाली.

क्षणभर तिला वाटले की, आपल्याला भासच होत असावा. गेले आठ दिवस अधुनमधून जी काय थोडीथोडकी झोप लागत असे, त्यात नाना अक्राळविक्राळ भास तिला होत असत. त्यातलेच काहीतरी असावे, असे तिला क्षणभर वाटले.

पण नाही, खरेच कुणी तरी दार ठोठावीत होते. एवढ्या पावसात कोण आले असेल, अशा भीतीने

काळोज लक्कन् हालले, पण सोबतीच्या आशेने धीरहो आला.

तिने कोयंडा काढून दार उघडले.

दारात सावकाराचा गडी उभा होता.

''झील आसां मा गे तुजो?'' त्याने घाईगर्दीने विचारले. तिला तो प्रश्न मोठा अभद्र वाटला.

''आसां. कित्याक तां?''

''त्येका पाठवून दी बेगिन् मसणवटीवर.''

तिच्या छातीत धस्स झाले. ''शिरां पडो रे मेल्या तुज्यावर'' ती तळतळून म्हणाली.

''अगे, असां काय करतंस? खोताचो म्हातारो खलास झालो हां, तेका जाळूचा आसां. पटकी इली या पावसावर, कोणा घराभायर पडूंकच मागणांहा नाय. चार बाप्ये तरी नुकोत?'' गडी खेदाने म्हणाला. ''एवडो मोठो खोत, पण भलत्या टायमाक मेलो. नायतर सगळो गाव लोटतलो होतो तेकां जाळूंक. पण तुया येवडां कर माजे बाये. तुज्या झिलाक धाड. न्हान आसात तरी चालात, पण बापयो मानूस जायो.''

तिला हसावे की रडावे कळेना. केसांची चांदी झालेला, कमरेत वाकलेला म्हातारा गडी खोताची मरणाची वेळ चुकल्याबद्दल खंतावला होता. खरे तर त्याचे स्वत:चेच दिवस भरत आलेले दिसत होते. मग तो लोकांची गैरसोय होऊ नये म्हणून योग्य वेळेची वाट पाहत थांबला होता की काय कुणास ठाऊक? गावातले झिलगे गोळा करीत तो हिंडत होता. बरा असता तर माझा मुलगाही गेला असता. पण आज -

''बाबा रे, वेळ काळ सगळ्यांका असता. पण माजो झील नाय आज येऊंचो!'' ती त्या गड्याला घरात घेऊन गेली. खाटेवर पडलेला आपला मुलगा दाखवीत ती कडवटपणे म्हणाली, ''नेतंस ह्याका तुज्यावांगडा मसणवटीत?''

म्हातारा अवाक् झाला.

दुसऱ्या पावली तो निघालाच. ''माक ठाऊक नव्हता गे, आईच्यान. जातंय मी थंयसर खोळंबून रवतील. लाकडा गेली कधीची. ओली गे लाकडा - शिरा मार ह्या पावसावर - मुद्दाम पेशल लाकडा मागवल्यानी वाड़िसून. कोरडी लाकड़ा चंदनाची - गाडी गेली कधीची. झिलगे गोळा होईसर अजून तासभर मोडतलो. जातो बाये. येईन सांजचो झिलाक बघूंक. काय करतंलस? कर्माचो भोग आसा एकेक...'' बडबडतच तो चालता झाला.

त्याची डोक्यावर इरलं घेतलेली आकृती पाणंदीतून नाहीशी होईपर्यंत ती बघत राहिली. थोडासा वेळ तरी ती माणसात आल्यासारखी झाली होती. हालत्या-चालत्या-बोलत्या माणसाची सोबत थोडा वेळ तरी मिळाली होती. परत घरात जायला तिचे मन घेईना.

धीर करून ती आत आली. कोयंडा लावून घेतला. पुन्हा एकदा ती खाटेशी गेली. नाकाजवळ हात धरून पाहिला. छातीवर ठेवून पाहिला. अजून धुगधुगी होती. अजून...

- आणि एकदम एका विचाराने तिच्या छातीत धस्स झाले. हा आज मेला तर? खोताला पोचवायला माणसं जमवणं इतकं मुष्कील झालंय. मी कुठं जाऊ? कुणाकडे - माणसं कशी जमवू?

या एकाच विचाराने तिला त्याचे मरण अधिक भयंकर वाटू लागले. आता त्यात दु:खाचा लवलेश नव्हता. नुसता होता तो अवघडपणा. बाहेर पावसाची धार वाजत होती. मधेच सूंऽकन वाऱ्याचा आवाज येई. बाकी सारे चिडीचिप होते. खोताच्या म्हाताऱ्यासारखीच तिच्या झिलानेही मरणासाठी चुकीची वेळ शोधून काढली होती. खोतासारख्या मातब्बराला ते परवडले असते; पण गरिबाने मरतानादेखील दुसऱ्याचीच सोय नको का बघायला?

तिला एकदम आपल्या नवऱ्याची मरणवेळ आठवली. ती अंधाऱ्या खोलीत एका कणगीमागे डोके खुपसून आवाज बाहेर येऊ न देता आक्रोश करीत होती. मोठ्या आवाजात रडारड चालली होती ती त्याच्या आईची. बायका समजूत घालीत होत्या, तीदेखील त्याच्या आईचीच. तिचे सांत्वन करणे कुणाच्या हिशेबी नव्हते. रडतारडता तिच्या कानावर शब्द आले; खिडकीखालीच कोणीतरी बोलत होते. ''फार वेळ लागला हो जळायला. ओली लाकडं ती - पेटेचनात...''

ओली लाकडे - जळायची वाट पाहत चितेवर शांतपणे पडून राहिलेला तो मुडदा - त्याला जाळायला अधीर झालेले लोक - त्यांची अस्वस्थता... ओली लाकडे - पेटायला तयार नसलेली लाकडे...

आजही तशीच परिस्थिती होती. मुलगा मेला असता, तर त्याला जाळायला कोरडी लाकडे सबंध गावात नव्हती. तिला खोताच्या गड्याचे शब्द आठवले. 'पेशल लाकडां मागवली वाडीसून - कोरडी लाकडा, चंदनाची.'

तिच्या अंगात कुठून बळ आले कुणास ठाऊक?

ती उठली, दाराचा कोयंडा काढला.

एकवार तिने खाटेवरच्या देहाकडे पाहिले आणि ती पदर खोचून घराबाहेर पडली...

बाहेर पावसाचे थैमान थोडे कमी झाले होते, तरी अधूनमधून पाऊस झिमझिमत होता. वाट चिखलाने बुरबुरली होती. कधी कुठे ठेवताच, पाय निसरेल याचा नेम नव्हता.

मसणवटीशी पोहोचल्यावर तिचे अंग शहारले. आजवर बाईमाणूस कधी त्या तिथे आलेले नसेल! तिने आजुबाजूला पाहिले. कुणी नव्हते. कुणी तिला पाहिले असण्याचा संभव नव्हता. दूरवरचे कातळ खाली आलेल्या ढगात बुडून गेलेले होते.

ती आत शिरली. आजुबाजूला पाहतापाहता तिच्या अंगातून एक भीतीची शिरशिरी गेली. त्या भयाण वैराण माळावर जे पांढरे करडे डाग पडले होते, त्यातून जर एकेक पांढरी करडी आकृती उठून उभी राहिली, तर आपला तिथल्या तिथे भयाने प्राण जाईल असे तिला वाटले. इतक्यात तिला पाठीमागून कुणी सुस्कारा सोडल्यासारखे झाले. तिच्या अंगावर काटा आला. कसाबसा धीर एकवटून तिने मागे पाहिले. एक उपाशी मांजर 'फिस्' करून तिच्या अंगावर आले होते. ती वळताच त्याने अंगाची कमान केली व ते कुठेसे चालते झाले.

पलीकडे एक मांगर बांधला होता. चंदनी लाकडांची रास तिथेच रिकामी केलेली दिसत होती. ती त्या मांगराभोवती भिरीभिरी फिरली. एका भिंतीपलीकडेच आणखी थोडा आडोसा होता.

ती मग झपाझप कामाला लागली.

धीर करून तिने एक लहानसे लाकूड उचलले आणि सांभाळून त्या आडोशाशी नेऊन ठेवले.

अंदाज येताच तिने आणखी मोठे लाकूड उचलले.

घाई करून चालण्यासारखे नव्हते. तिच्या कृश शरीराला लाकडाचे वजन पेलणे कठीणच होते; पण घाई करण्याची गरजच काय होती? आणखी तास अर्धा तास तरी मंडळी येऊन पोहोचली नसती.

आता तिचे सारे लक्ष आडोशाला लाकडाची रास वाढवण्याकडे लागले होते. तशा वाऱ्यातदेखील तिच्या कपाळावरून घाम गळू लागला होता. केस सुटले होते; पण ती भराभर लाकडे गोळा करीत होती. तिचे दु:ख बधीर होऊन गेले होते. मुलाला जर भडागन्ी नीट मिळायला हवा, तर तिने सारे दु:ख बाजूला ठेवून कोरडी लाकडे भरणे भाग होते. आजवर त्याचे अंथरूण ती नीट घालून देत असे. आजही त्याचे शेवटचे अंथरूण चांगले व्हावे, यासाठीच तिची सारी धडपड होती.

आजवरच्या आयुष्यात तिने कधीच चोरी केलेली नव्हती. कुणाच्या उघड्यावर पडलेल्या पैशालासुद्धा तिने कधी हात लावला नव्हता. आज ती आयुष्यातली पहिली चोरी करीत होती. लाकडांची! - मुलाच्या सरणासाठी! तिला मौज वाटली. खोताच्या म्हाताऱ्यासारखीच तिच्या मुलालादेखील 'पेशल चंदनी लाकडे' मिळत होती. चैनीत लोळणारा तो पिकलेला म्हातारा आणि जन्मापासून हालअपेष्टा काढणारा तिचा तरुण मुलगा - पण आज दोघेहीजण सारख्याच लाकडावर झोपणार! चंदनी लाकडावर!

ती वैराण मसणवट एकटकपणे तिचे ते साहस पाहत बसली होती, कुणाची लाकडे कोण भरीत होते? जिथे आजवर रडाय-ओरडायला, ऊर पिटायलादेखील बाईमाणूस आले नव्हते, तिथे एक बाई येऊन असले धाडस करीत होती. आजवर त्या मसणवटीने अनेक विचित्र गोष्टी पाहिल्या होत्या. बापाची कवटी फुटायचा आवाज ऐकू येण्याआधीच वाटणीवरून एकमेकांची डोकी फोडायला निघालेल्या मुलांपासून ते प्रेताच्या अंगावरचा मणी मिळवण्यासाठी जाळात हात घालणाऱ्या भटापर्यंत सारे काही तिथे होऊन गेले होते, पण असले आक्रीत अजून घडले नव्हते. जिवंत मुलाच्या सरणाची लाकडे दुसऱ्याच्या लाकडातून चोरून बाजूला काढणारी आई अजून त्या मसणवटीनेदेखील पाहिली नव्हती.

आणि एकाएकी तिचा लाकूड उचलणारा हात थांबला. कुणाची तरी चाहूल तिला लागली. मंडळींचा गलबला ऐकू येऊ लागला, तत्क्षणी ती लाकडे भरायची थांबली. मंडळी कल्पनेपेक्षा लवकरच आलेली दिसत होती. कदाचित आणखी कुणाची वाट न बघता, पाऊस उघडला होता, तोवर काम आटपून घ्यायचे त्यांनी ठरविले असावे.

मडके धरलेला खोत दिसला आणि तिच्या जिवाचे पाणीपाणी झाले. कुणी तिला पाहून चालले नसते; पण आता पळूनही जाता आले नसते, कारण दाराची बाजूच साऱ्या मंडळींनी अडवली होती.

अधिक विचार करायला वेळ नव्हता. ती लाकडांच्या राशीजवळून पळाली, आणि आतल्या बाजूच्या स्वत: जमवलेल्या लाकडांशी उभी राहिली. लाकडांच्या त्या छोट्याशा ढिगाकडे पाहता पाहता तिला रड्याचा

नवीन उमाळा आला. तो सुकलेला म्हातारा, तो लाकडांचा डोंगर अंगाखाली घेणार आणि माझ्या पाथरीसारख्या रुंद पोरासाठी मात्र एवढीशी लाकडे? - मेले आणखी थोड्या वेळाने येते, तर मला पुरेशी लाकडे तरी मिळती. आता काय उपयोग? आता सारी लाकडे बघताबघता अगन्च्याी स्वाधीन होणार होती. सारी मसलत धुळीला मिळाली होती. त्यातून कुणी पाहिले असते, तर जिवानिशी सुटकाच नव्हती.

तिथे फार वेळ तसे उभे राहणेदेखील धोक्याचे होते. त्या चोरलेल्या लाकडांपाशीच जर कुणी तिला पाहिले असते, तर तिची धडगत नव्हती. मुद्देमालासकट ती पकडली गेली असती. जमलेल्या झिलग्यांनीच तिला दगडांनी ठेचून काढले असते.

ती त्या आडोशाच्या पलीकडे गेली. तिथे काटेरी झुडपांचे एक कुंपणच तयार केलेले होते. मसणवटीला कुंपण कशाला होते, कुणास ठाऊक! बाहेरचे कुणी आत यायला उत्सुक असणार नव्हते की, आतले कुणी बाहेर जाऊ शकणार नव्हते! कसेही असले तरी ते कुंपण या क्षणी तिच्या मदतीला आले, एवढे खरे. ती कशीबशी काटे चुकवीत त्या कुंपणामधल्या झुडपात दडून बसली.

बसल्या जागेवरूनच तिला पलीकडे चाललेले सगळे विधी सविस्तर दिसत होते. आजवर कधीच ती ते पाहू शकली नव्हती. लाकडे सावकाश रचली गेली. 'थोडी शिल्लक ठेवा, थोडी शिल्लक ठेवा!' तिचे मन आक्रोश करीत राहिले. पण त्यांनी सारी लाकडे सुबकपणे रचून ठेवली. सुदैवाने तिने बाजूला काढून ठेवलेल्या लाकडांचा कुणाला पत्ता लागलेला दिसत नव्हता.

पाऊस केव्हा कोसळू लागेल, त्याची खात्री देता येत नव्हती. मंडळींनी भराभर प्रेत चितेवर चढवले. आणि पाहता पाहता ते प्रेत खोताच्या म्हाताऱ्याचे असल्याचे ती विसरून गेली. डोळे पाण्याने भरून गेले आणि अंधुकल्या नजरेला आपलाच मुलगा तिथे झोपलेला दिसू लागला-गेले आठ दिवस खाटेवर पडून होता तसा. ताठच्या ताठ! त्याच्यावर लाकडे रचली गेली... दुसरे कुणी मग तिथे राहिले नाही. तो आणि ती! त्याच्यावर फुलेसुद्धा तिनेच घातली, आणि त्याच्याभोवती मडके धरूनही तिचाच जीव फिरला. पुन्हापुन्हा - पुन्हापुन्हा ... मडके फुटेपर्यंत...

वातावरणात चंदनाचा दर्प भप्पदिशी उसळला आणि ती एकदम शुद्धीवर आली. 'मेल्यांनी लाकडे पेटवली!' तिच्या मनानं पुन्हा एकदा आक्रोश केला!

पावसाच्या भीतीने मंडळी लगोलग पांगली. क्षणात ती जागा निर्मनुष्य झाली. हळूहळू त्यांचा गलबला विरत जाऊ लागला...

अजून सबंध चिता पेटली नव्हती.

अजून काही लाकडे वाचवता येतील!

- बाळाला पुरतील इतकी लाकडे!

- तो आरामात पाय पसरू शकेल इतकी लाकडे!

ती जीव गोळा करून उठली. झुडपाबाहेर पडली.

घाईघाईत निघताना ठिकठिकाणी काट्यांनी ओरबाडले. त्यातून जागोजागी रक्त फुटू लागले...

पण त्याचे तिला भान नव्हते. पदराचे भान नव्हते, सुटलेल्या केसांचे भान नव्हते. कपाळावर मळवट भरल्यासारखे रक्त पसरू लागले होते, त्याचे भान नव्हते.

तिला दिसत होती ती, अजून न जळालेली चार-दोन लाकडे! कुठल्याही क्षणी त्यांनी पेट घेतला असता. ती धावतच चितेपाशी पोहोचली आणि तिने चितेत हात घातला.

दुसऱ्याच क्षणी एक रक्त गोठवून टाकणारी किंकाळी वातावरणात घुमली.

तिचा हात सर्रकन मागे आला.

मघांच्या मंडळींपैकी एकजण, विसरलेले काहीतरी परत न्यायला आला होता. तो तिच्याकडे बघत उभा होता. त्याच्याच ओठातून किंकाळी बाहेर पडली होती. बुबुळे बाहेर पडतील, असे वाटण्याइतके त्याचे डोळे भयाने विस्फारले होते. त्याची किंकाळी ऐकून आणखी एकदोघे आत आले. त्यांना दाखवण्यासाठी त्याने हात उचलला. त्यांनी एकवार तिच्या दिशेने नजर टाकली आणि मग ते तिघेही बोंब ठोकीत धूम पळत सुटले -'हड्डुळ! हडळ इलीऽ ... हडळ इलीऽऽ...'

तशाही परिस्थितीत तिला किंचित हसू आल्यावाचून राहिले नाही. हडळ -? मी हडळ?

पण एक बरे झाले. आता कुणी इकडे फिरकायची शक्यता राहिली नाही. ती पुढे झाली आणि तिने आपल्या कामाला सुरुवात केली.

ती परत घराची वाट चालू लागली, तेव्हा तिला विलक्षण थकवा आला होता. एक एक पाऊल ती मोठ्या

मुष्कीलीने टाकत होती. पण मन समाधानाने भरले होते. तिने ठरवलेला बेत झक्क पार पडला होता. मधे अडथळा येऊनदेखील! आता लाकडासाठी पैसे कुठून आणायचे याची फिकीर राहिली नव्हती. लाकडे ओली मिळण्याची काळजी नव्हती.

समोरूनच महारीण येत होती. एकमेकींना पाहून दोघीही थबकल्या. बोज्याचा हात बदलीत महारीण म्हणाली, 'खय गे गेल्लंलस पावसापाण्यात? उगाच फिरा नुको हां -' आणि मग आवाज खाली आणून पुढे म्हणाली, ''गावात म्हणे हडळ इलीहा. खोताच्या म्हाताऱ्याचा प्रेत ओढान नेला तिनां. खोटा न्हुई. झिलगे म्हणा होते. परत्यक्ष डोळ्यानं बघितली एकदोघानी. एकाची तर वाचाच बसलीहा.''

''खऱ्यानी?'' ती आपले काहीतरी म्हणायचे म्हणून म्हणाली, खोटेच आश्चर्य दाखवून.

''देवाच्यान. वशाड पडलो हो गाव. कोप आसा देवाचो. आमच्या न्हानपणी एकदा हडळ इली होती -''

पण महारणीच्या लहानपणीच्या गोष्टी ऐकत बसण्याइतका तिला वेळ नव्हता. पुढच्या तयारीला झपाझप लागणे आवश्यक होते. महारणीच्या बडबडीकडे लक्ष न देता ती तशीच पुढे निघाली... तरी जाताजाता महारीण सांगत होतीच, ''गे, घरी बसान रव. गावभर बोंब आसा - हडळीच्या भयान कोण बाहेर पडाणाहा नाय गेऽ''

ती मागे वळून, ओरडून म्हणाली, ''हडळ प्रेता खाता मा गेऽ? जित्या मानसान् कित्याक भिऊचा तेका?''

पण महारणीला ते पटलेले दिसले नाही. ती मान उडवून चालती झाली. आणि तिच्याप्रमाणेच इतरांनाही ते पटणार नाही, हे उघड होते. एक नवी अडचण अकस्मात तिच्यासमोर येऊन ठाकली होती. लाकडाचा प्रश्न सुटला होता, पण माणसांचा अधिकच कठीण झाला होता. आधीच या पावसात कुणी घराबाहेर पडायला तयार नव्हते. त्यात हडळीची बातमी एव्हाना गावभर झाली असणार! जो तो घराची दारे गच्च लावून घेऊन बसला असेल. मग प्रत्यक्ष मसणवटीत जायला कोण तयार होणार?

एकाएकी गडगडले, वीज चमकली आणि मुसळधार पाऊस सुरू झाला. ती उभ्या जागी भिजून चिंब झाली. इतका वेळ वाटले नव्हते असे असहाय, निराधार, एकाकी तिला वाटू लागले. तिचे हातपाय कापू लागले. नवरा नाही, आता मुलगा नाही. असल्या भयाण प्रसंगालादेखील गावातले कुणी येणार नाही; आपल्याला झोडणाऱ्या या पावसाखेरीज कुणाकुणाला आपण दिसतसुद्धा नाही. तिला एकदम कुडकुडल्यासारखे झाले. दातखीळ बसली. कपाळावरती काट्यांनी केलेल्या जखमा चुरचुरू लागल्या. तिला पाऊलही टाकवेना. वाटले, इथेच या पावसात वाहून जाणाऱ्या मातीच्या ढेकळासारखे वाहून जावे...

कशीबशी ती घरी आली. विलक्षण थकून पायरीवर बसली - आणि एकदम तिच्या कानावर हाक आली - 'आयेऽ'

आगीचा चटका बसावा, तशी ती हाक ऐकून ती उठली. परत हाका ऐकू आल्या - 'आये, आयेऽ -'

भारल्यासारखी ती खाटेशी गेली.

तिचा मुलगा उठून बसला होता.

आठ दिवसांनी, पहिल्यांदाच आपणहून उठून बसला होता. नुसता हुंकारसुद्धा ज्याला भरता येत नव्हता, तो तिला हाका मारीत होता.

म्हणजे, हा आता मरणार नाही?... चमत्कार झाला की काय? की वैद्याचे ते जालीम औषध लागू पडले?

मग मेल्या, इतका वेळ मी कशाला तडफडतेय? तिच्या मनाने आकांत केला - बाईमाणूस असून मसणवटीत जाऊन आले ती कशासाठी? जन्मात पहिल्यांदा चोरी केली ती कशासाठी? जिवावरचा धोका पत्करला तो कशासाठी? पेटल्या चितेत हात घातला, तो कशासाठी? मेल्या मुर्दाडा, तेव्हा पडून राह्यलास नाक वर करून आणि आता हाक मारतोयस 'आये, आये' म्हणून. मरणार नव्हतास, तर मला इतकं नाचवलंस कशासाठी?... आणि सगळी धडपड करून झाल्यानंतर मग दगा दिलास कशासाठी?'

एका क्षणात हे सारे तिच्या मनात येऊन गेले. दुसऱ्या क्षणी मात्र तिच्या मनाचा दगड वितळला. तिची सारी हुषारी, सारा धीटपणा, सारा खंबीरपणा पळून गेला आणि तिचे माणूसपण परत आले. ओक्साबोक्सी रडत तिने आपल्या मुलाला गच्च मिठीत घेतले. त्याचे पटापट मुके घेत ती म्हणू लागली - ''माज्या राजा, शिरां पडोरे माज्यार, मियां तुज्या जितेपणी तुका जाळूक लाकडां जमवली! जललां मढां तां माजा, तुका मरवडो घातलो मिया! हडळ आसंय रे मी - तुजी आये न्हुई - हडळ आसंय, हडळ!''

बोलताबोलता ती रडू लागली - रडतारडता हसू लागली... आणि तिचा नुकताच शुद्धीवर आलेला तो झील तिच्या प्रेमाच्या वर्षावात गुदमरू लागला....

■

सोडवणूक

सातवा महिना लागला आणि सिंधूच्या यातना सुरू झाल्या.

तोवर सिंधू अतिशय आनंदात होती. पहिलटकरणीला वाटते, तशी थोडीफार भीती तिलाही वाटायची, नाही असे नाही. परंतु एका नव्या लाभाच्या आनंदापुढे ती काहीच नव्हती.

सिंधूची प्रकृती चांगली मजबूत होती, आणि बाळंतपण कसे निभेल, याची तिला किंवा जनार्दनला - कुणालाच फारशी काळजी नव्हती. पहिलीच वेळ, तेव्हा मुलगा-मुलगी काहीही झाले असते तरी आनंदच होता. मनोमन सुखावून दोघेही सिंधूचे दिवस भरण्याची वाट पाहत होती.

जनार्दन तिला अतिशय जपायचा. तिच्या लहानसान हालचालींकडेदेखील डोळ्यात तेल घालून नजर ठेवायचा. शारीरिक कष्टाचे कसलेही काम तिने काढले, तरी धोक्याच्या सूचना द्यायचा. ‘‘सांभाळून - असल्या या दिवसांत हे चांगलं नाही.’’

त्यावर सिंधू हसून म्हणायची, ‘‘तुम्हाला किनई, भारीच कौतुक बायकोचं. आजवर कधी कुणाला मुलं झालीच नाहीत, की काय?’’

जनार्दन यावर काहीच बोलत नसे. पण तो मनातल्या मनात सुखावून जाई. बायकोविषयीच्या कर्तव्यात आपण कुठे म्हणून कमी पडत नाही, या कल्पनेने त्याला धन्यता वाटे.

जनार्दनला घरचे कुणीच नव्हते. कौटुंबिक जिव्हाळा असा फारसा त्याच्या वाट्याला आलाच नाही. त्याचा जन्म वडिलांच्या उतारवयातला. आई त्याच्या लहानपणीच गेली. काही वर्षांतच थोरली बहीण आक्का गेली. आक्कानंतर वडीलही गेले. लहानपणीच जवळची माणसे अशी अंतरल्यानंतर जनार्दनने बरीच वर्षे या ना त्या नातेवाईकाकडे राहून काढली. शिक्षण स्वत:च्या हुषारीवर केले. चांगली नोकरीदेखील शोधली. सगळे ठाकठीक केले.

तरीदेखील घराची माया लहानपणीच दुरावल्याची बोच त्याच्या मनात कुठेतरी राहून गेलीच. लगन् करण्याआधीपासूनच त्याने एक गोष्ट मनात ठरवून ठेवली होती. चांगला संसार करायचा. बायकोमुलांना सुख द्यायचे. आपली झाली तशी मुलांची आबाळ होऊ द्यायची नाही...

नशिबाने त्याला बायकोही चांगली मिळाली. त्याच्यावर जीव लावणारी, घर टापटीप ठेवणारी, काटकसरीने संसार करणारी. सुखी संसाराचे जनार्दनचे चित्र असे हळूहळू साकार होऊ लागले.

आणि आता त्या चित्रातल्या अपुऱ्या भागातही रंग भरत चालले होते. घरात मूल येणार होते. सगळे मनात आणल्यासारखे होत होते. दैवाने पाठीवरून हात फिरवला होता, मनात नवी उमेद आली होती.

सिंधूला सातवा महिना लागला, आणि जनार्दनला, तिला किती जपू आणि किती नको, असे होऊन गेले. पहिल्या खेपेला तिला माहेरी पाठवायलाही त्याने नकार दिला. माहेर आडगावी होते. डॉक्टरची सोय आयत्या वेळी होण्यासारखी नव्हती. सासरे त्याच्या हेकटपणाला हसले. म्हणाले, ‘‘अहो, एवढी कसली काळजी? आमच्या घरात बाळंतपणे झाल्याशिवाय का राहिली?’’

पण जनार्दनने आपला हेका सोडला नाही.

ऑफिस सुटले की, हल्ली तो सरळ घरी यायचा. बाहेरची सगळी कामे त्याने बेमुदत लांबणीवर टाकली. ऑफिसात जायचा तो नाईलाजाने. उरलेला सगळा वेळ तो घरीच राहायचा. न जाणो कधी काय होईल - सांभाळले पाहिजे, अशा विचाराने तिच्या अवतीभवती करायचा.

त्या दिवशी मात्र तो अजून ऑफिसमधून परतला नव्हता.

सिंधू त्याचीच वाट पाहत होती.

थंडीचे दिवस, त्यामुळे उन्हे लवकर उतरली होती. अजून अंधारले नव्हते. परंतु तिन्हीसांज झाल्यासारखी वाटत होती.

बाहेरच्या सावटामुळे सिंधूला अगदीच उदास वाटू लागले होते.

एवढ्यात कुणीतरी दार खटखटावले.

जनार्दन आला असेल, या विचाराने ती आनंदित झाली. पण जनार्दनने घंटी न वाजवता दार कां खटखटावे?

पोस्टमन वगैरे कुणी असेल, अशा विचारात तिने दार उघडले.

बाहेर कुणीच दिसले नाही.

भास झाला असेल, म्हणून ती दार लावून वळणार, एवढ्यात तिचे लक्ष उंबरठ्याशी गेले.

तिकडे कुणीतरी बसले होते.

वाढत्या काळोखात तिला ती आकृती नीटशी दिसली नाही, पण तिच्या छातीत धस्स झाले.

परत पाहिल्यावर तिच्या लक्षात आले की, ती आकृती एखाद्या लहान मुलासारखी दिसत होती.

कुणाचे लहान मूल, आणि ते असे आवाज न करता इथे का येऊन बसावे, असा विचार ती करीत आहे, तोवर ते हळूहळू उठून उभे राहण्याचा प्रयत्न करू लागले.

भीतीने गोठल्यासारखी ती त्याच्याकडे पाहत राहिली, कारण त्याचे उठून उभे राहणे, फारच विचित्र होते. एखाद्या मुलासारखे, एखाद्या माकडासारखे, आणि एवढेच नाही; तर काहीतरी फारच-फारच जगावेगळे.

ते वेगळेपण नेमके काय, हे लक्षात येताच तिने भीतीने किंकाळी फोडली आणि ती बेशुद्ध पडली.

- तो एक लहान बाळाच्या हाडांचा सांगाडा होता.

जनार्दन घरी आला, तेव्हा सिंधू नुकतीच शुद्धीवर आली होती. आपल्या आजुबाजूला काय आहे, याचा तिने पडल्यापडल्याच अंदाज घेतला, आणि तशीच धडधडत्या छातीने ती उठून बसली.

उघडा दरवाजा तिने लावून घेतला, बेडरूममधले दोन्ही दिवे लावले आणि बेडवर अंग टाकले.

मघाचा प्रसंग आठवून तिच्या छातीत पुन्हा धडधडू लागले.

मधेच चमकून उठून तिने मागे पाहिले. कुठे काही नव्हते. आपल्याला काहीतरी भयंकर भास झाला, अशी तिची खात्री झाली.

- आणि एवढ्यात दरवाजाची घंटी वाजली.

सिंधू उगाचच दचकली.

पण तिला दरवाजाशी जाण्याचा धीर होईना.

दोनदा घंटी वाजवूनही सिंधू दार उघडत नाही, याचे जनार्दनला आश्चर्य वाटले. निदान तिचे नेहमीचे 'आलेऽ' तरी ऐकू यावे!

त्याने पुन्हा घंटी वाजवली.

सिंधू उठली. पण पुन्हा दरवाजा उघडायचा, या कल्पनेने जणू तिच्या पायातले त्राणच नाहीसे झाले होते.

"अग सिंधू, दार उघड. मी आहे!" जनार्दन बाहेरूनच ओरडला.

कसेतरी लटपटत सिंधूने दार उघडले आणि जनार्दन दिसताच तिने स्वत:ला त्याच्या अंगावर लोटून दिले.

"सिंधू - काय झालं, सिंधू?" दार लोटून तिला आत घेऊन येत जनार्दनने पुन्हा पुन्हा विचारले.

पण सिंधूच्याने काही बोलवतच नव्हते.

बऱ्याच वेळाने, तिची कशीबशी समजूत घालीत, जनार्दनने तिच्याकडून सारा प्रकार काढून घेतला.

ऐकल्याबरोबर तो मनातून हादरला. म्हणजे सिंधूच्या सांगण्याप्रमाणे काही गंभीर प्रकार झाला असेल, असे त्याला वाटले नाही, पण तसा तो थोडा धर्मभोळा होता. तिच्या या अवस्थेत असला काही भास होणे, हे चांगल्या शकुनाचे नव्हते.

तरीदेखील तिची भीती दूर करण्याचा त्याने खूप प्रयत्न केला. तो खोटेखोटे हसला आणि तिची समजूत काढीत म्हणाला - "चल, वेडी कुठली! तुला स्वप्न पडलं असेल, स्वप्न! नाहीतर काय होतं, की या असल्या दिवसांत खूप अशक्तपणा येतो, त्यामुळे डोक्याला निरनिराळे, नको ते भास होतात..."

सिंधूने सगळे ऐकून घेतले. मात्र तिला त्या रात्री झोप कशी ती लागलीच नाही. रात्रभर तिने दिवा लावून ठेवला. तरीही भीतीच्या धसक्याने ती बिछान्यावर तळमळतच राहिली आणि शेवटी सरळ उठून बसली.

जनार्दनही जागाच होता. तो थोडासा रागावला. म्हणाला, "इथं तसलं काही नाही म्हणून सांगितलं ना? ही बिल्डिंग अगदी चांगल्या जागेवर बांधलेली आहे - खूपजणांना विचारलंय मी. आता झोप पाहू - जागरणाचा त्रास होईल तुला."

पण त्या रात्री तर नाहीच, नंतरही चार रात्री सिंधू नीट झोपू शकली नाही. जरा डोळा लागला रे लागला,

को तिला निरांनेराळे चमत्कारिक भास व्हायचे. झोपेतच घाबरून तो जनार्दनला मिठी मारायचा.

जसजसे दिवस लोटले, तसतशी तिची भीती कमी झाली. मात्र झाल्या प्रकाराविषयी कुणीच काही बोलत नसे. मध्यंतरी खालावलेली तिची तब्येतही सुधारू लागली. रोजच्याप्रमाणे गॅलरीत उभी राहून ती जनार्दनची वाट पाहू लागली.

त्या दिवशीही ती अशीच गॅलरीत उभी होती. बाहेर अंधारू लागले होते. तरीही जनार्दनची भरभर चालणारी उत्साही आकृती तिला दिसली.

धावतच जाऊन तिने दरवाजा उघडला.

तो जिन्याच्या पायऱ्या चढत होता.

- तोच!

एक एक पाऊल सांभाळून टाकीत जिन्याच्या कठड्याला धरून एखाद्या नुकत्याच चालायला शिकलेल्या बाळाप्रमाणे लटपटत, अगदी सावकाश, तो चिमुकला हाडांचा सापळा जिना चढून वर येत होता.

- सिंधूची किंकाळी जनार्दनला खालच्या मजल्यावरच ऐकू आली. दोन दोन पायऱ्या ओलांडीत तो दाराशी येऊन पोचला.

सिंधू दारातच पडली होती.

तोंडावर पाणी मारून त्याने तिला शुद्धीवर आणले. ''तो-तो परत आला-'' एवढेच म्हणून तिने पुन्हा त्याच्या खांद्यावर मान टाकली.

तिला बिछान्यावर झोपवून तो वारा घालीत बसला.

थोड्या वेळाने तिने डोळे उघडले. पण त्यातली भीतीची लकेर काही गेली नव्हती.

''उगाच घाबरलीस तू.'' जनार्दन तिला धीर देत म्हणाला. ''कोणी आलं नव्हतं, की गेलं नव्हतं.''

''तो - आला होता! तुमच्या पुढेच जिना चढत होता.''

''मग मला दिसल्याशिवाय राहिला असता का? मला तर काहीच दिसलं नाही.'' जनार्दन म्हणाला.

सिंधू काहीच बोलली नाही. पण तिचे मुळीच समाधान झालेले दिसले नाही.

जनार्दन दुसऱ्या दिवशी डॉक्टरकडे गेला. तो थोडा भेदरला होता. त्याला काही समजेनासे झाले होते. आपल्याला न दिसलेली गोष्ट सिंधूला कशी दिसू शकेल? आणि खरोखरच दिसते, की तिला तसा भास होतो? भास असला तर तो अपशकून म्हणून, काहीतरी अभद्र सुचवण्यासाठी होतो की, केवळ अशक्तपणाने होतो? सर्व बाजूंनी विचार करण्याइतका जनार्दन हुषार होता. पण उलटसुलट विचारांनी तोही चक्रावून गेला होता.

डॉक्टरांनी मात्र त्याचे सारे बोलणे शांतपणे ऐकून घेतले. ते म्हणाले, ''काळजीचं कारण नाही. हे तिचं नर्व्हस टेन्शन आहे. पहिलीच वेळ. मुलाचा जन्म नीट होईल ना, या विचाराचं टेन्शन सतत तिच्या डोक्यावर आहे. त्यामुळं ही विचित्र आकृती दिसते. सांगाडा लहान मुलाचाच कां दिसतो? जस्ट थिंक. इट इज नथिंग एल्स बट हर ओन इमॅजिनेशन.''

डॉक्टरचे स्पष्टीकरण जनार्दनला पटले. त्यांनी लिहून दिलेली अशक्तपणावरची औषधे घेऊन तो घरी गेला.

तो आला, तेव्हा सिंधू शून्यात पाहत बसली होती.

''सिंधू - सिंधू -'' तिचे खांदे हलवीत तो म्हणाला, ''काय झालं? अशी काय बघतेयस?''

बऱ्याच वेळाने, ती झोपेतून जागी व्हावी, तशी जागी झाली. समोर जनार्दन आहे, हे तिच्या लक्षात यायलासुद्धा काही क्षण लागले. लक्षात येताच तिने त्याला मिठी मारली आणि ती स्फुंदून स्फुंदून रडू लागली.

''मला एकटीला ठेवून नका हो जाऊ - मला भीती वाटते -'' रडतारडता ती बोलत होती - ''एकटीला भीती वाटते - तो येतो - तो -''

''काही नाही, सिंधू - डॉक्टर म्हणाले, तुझ्या कल्पनेचे हे सगळे चाळे आहेत.''

''नाही हो - आज मी त्याला रडतानासुद्धा ऐकलं - तो - असा हसतहसत आला - मी घाबरले - बोळकं विचकून तो हसत होता - छोटी - हाडांची पावलं टाकीत दुडुदुडु चालत माझ्याकडे येत होता - मी किंचाळले - इथं बेडरूममध्ये आले - माझ्यामागून तो येऊ लागला... झटकन मी दार लावून घेतलं - तशी एकदम त्याचं भेसूर रडणं मला ऐकू आलं. बाईऽ ऽ ग - त्याचा हात दारात सापडला होता बहुतेक - मी दार उघडलं - पण तिथं कुणीच नव्हतं.''

''भास - निव्वळ भास! - डॉक्टर म्हणाले -''

पण सिंधूने जनार्दनला पुढे बोलूच दिले नाही... ''भास? मग ते बघा-'' दाराकडे बोट दाखवून ती म्हणाली,

''ते बघा, अजून तिथं काय पडलंय -''

''काय?'' तिच्या बोटाच्या दिशेने पाहत जनार्दनने विचारले.

''त्याच्या बोटाच्या हाडाचा तुकडा पाहिलात?''

तिला तो दिसत असावा, यात शंका नव्हती.

जनार्दनला मात्र तिथे काहीही दिसले नाही.

दुसऱ्या दिवशी सिंधूला घेऊन तो पुन्हा डॉक्टरांकडे गेला.

''डॉक्टर, ही अशी घाबरतच राहिली तर एखाद्दिवशी भीतीनंच हिचं काहीतरी वेडंवाकडं होईल - त्यासाठी तरी - निदान तिचे हे भास म्हणा, काहीही म्हणा, पण जे काय आहे, ते थांबायला हवं.''

डॉक्टरांनी पुन्हा औषधे लिहून दिली.

जनार्दनने रजा घेतली आणि तो सिंधूच्या सोबतीला घरी राहू लागला.

सिंधू भुतासारखी दिसू लागली होती. आता तिचा आठवा महिनाही संपत आला होता. खोल गेलेल्या डोळ्यांभोवती काळी वर्तुळे पडली होती. हातापायांच्या काड्या झाल्या होत्या आणि पोटाच्या तुलनेने ते अगदी बघवेनासे झाले होते. सगळ्या चेहऱ्यावरच आजाराची कळा आली होती.

जनार्दन बिचारा सुचतील ते उपाय करीत होता. त्याचे स्वप्न पुरे होण्याच्या इतके जवळ आले असताना मधेच सारे काही डळमळू लागले होते. सिंधू सुखरूप प्रसूत होईल, याचा काहीच नेम नव्हता. मुळात ती धडधाकट असल्यामुळे तिने अजूनपर्यंत तग धरला होता, एवढेच. पण तिची भीतीच कधीतरी तिचा काळ ठरणार होती... तो तिची परोपरीने समजूत काढायचा. पण जे त्याला दिसतच नव्हते, आणि तिच्या एकटीच्या मात्र जिवाचा थरकाप करून टाकीत होते, त्याच्याविरुद्ध तो तरी काय समजूत घालणार?

रात्री सिंधू किंचाळत उठली. एकदम अंथरुणातून उठून उभी राहिली. पळू लागली.

जनार्दनने पटकन उठून तिला गच्च धरून ठेवले म्हणून बरे. नाहीतर ती बिछान्यावरून पडलीच असती.

''सिंधू, जागी हो - झालीस जागी?'' तिला गदगदा हलवीत तो म्हणाला.

''मी जागीच होते.'' डोळे तारवटून बिछान्याकडे पाहत ती म्हणाली - ''पण तो माझ्या कुशीत येत होता -''

जनार्दनला काहीच बोलवेना. त्याने तिची समजूतदेखील घातली नाही. सिंधू बोलली ते भयंकर होते. तो लहान बालकाचा सांगाडा तिच्या कुशीत येऊ का, म्हणत होता याचा अर्थ काय? दैवाला काय सुचवायचं आहे? तिच्या ओटीतले हे मूल - ते मूल - हा सांगाडा - जिवंत मूल - मरण पावलेल्या बाळाचा सापळा म्हणजे तिला - होणारे मूल जिवंत तरी निपजेल ना?

काय होणार आहे? नशिबात काय वाढून ठेवले आहे?

काळजी करताकरताच त्याचा डोळा लागला.

एकाएकी स्वप्नात त्याला आपले लहानपणचे घर दिसले...

कोकणातले ते बैठे घर... मातीच्या भिंती. शेणाने सारवलेली जमीन... पण घर तसे लांबरुंद...

मग आक्का दिसली. ती गुडघ्यांत डोके खुपसून रडत होती.

जनार्दन तिच्याजवळ गेला.

''आक्का, रडतेस कशाला?'' त्याने आक्काचे डोळे पुसले.

आक्का फिकेफिकेसे हसली. ''तू कधीच घरी येत नाहीस, जनार्दन. अरे, मला तुला किती भेटावंसं वाटतं!''

खरे तर हा सगळा प्रकार घरातच चालला होता. पण तरीही आक्का असे म्हणाली. अर्थात स्वप्न म्हणजे असे चालायचेच!

''येशील ना आता?'' आक्का पुढे म्हणाली, ''तू काही काळजी करू नकोस. वहिनीला इथंच घेऊन ये बाळंतपणाला. सगळं ठीक होईल. मी आहे ना?''

क्षणभर जनार्दनच्या मनावरचा ताण हलका झाला. स्वप्नातच. आणि एकाएकी स्वप्न संपले. पण तरीही तो नीटसा जागा झालाच नाही. स्वप्नाच्या तंद्रीतच राहिला. त्याला शांतशांत, निवल्यासारखे वाटत होते. काळजी संपल्यासारखे वाटत होते. ते काही नाही. एकदा आक्काला भेटायलाच हवे. एकुलती एक बहीण, आणि आपली - तिची इतक्या वर्षांत भेट नाही, म्हणजे काय? ते काही नाही, आपण जाऊन तिला भेटायचेच! त्याने ठरवून टाकले.

- आणि एकदम त्याला आठवले, की आक्का बऱ्याच वर्षांपूर्वी वारली.

हो जाणीव होताक्षणीच तो खडबडून जागा झाला.

पण दुसऱ्या दिवशी तो विचार करू लागला. तेव्हा त्याला त्या स्वप्नात काही तथ्य आहे, असे अधिकाधिक वाटू लागले.

आक्काच्या आणि त्याच्या वयात बरेच अंतर होते. आक्का वयात आली, तेव्हा मुळी तो जन्माला आला. आक्काचा त्याला फार लळा होता. तीदेखील त्याचे भारी लाड करायची. आईने मुलाचे करावेत, तसे. बरोबरीची भावंडे भांडतात, तसे त्यांच्या बाबतीत होण्याचा प्रश्नच नव्हता.

त्याच्या बालपणीच आई गेली. तेव्हा तर तिची जागा आक्कानेच घेतली. त्याचे खाणेपिणे, वागणे-सवरणे साऱ्यावर आक्का लक्ष ठेवायची. वडिलांचा स्वभाव जमदग्नी. त्यांची आठवण म्हणजे फक्त भरघोस मिशा, कपाळावरच्या आठ्या आणि त्यांच्या हातचा मार. त्यामुळे सगळी गाऱ्हाणी सांगायची, ती आक्काला. तीदेखील शक्य असेल तेव्हा त्याचा वडिलांच्या हातचा मार चुकवण्याचा प्रयत्न करी.

उंच, गोरीपान, गोड हसणारी आक्का जनार्दनच्या नजरेसमोर दिसू लागली. इतक्या वर्षांत - वारल्यानंतर आजवर कधीच ती त्याच्या स्वप्नात आली नव्हती. असे का? आणि कालच येण्याचे कारण?

आक्काचे शेवटचे दिवस जनार्दनला आठवले. तशी ती आजारी नव्हती. पण नुसती गप्प बसून असे. जनार्दनशीदेखील पहिल्यासारखी हसत नसे, बोलत नसे. कधीतरी त्याला जवळ घेई आणि टिपे गाळत बसून राही. तो कावराबावरा झाला, की त्याला बाजूला करी.

आणि एके दिवशी ती गेली. जनार्दन वयाने इतका लहान होता की, ती वारली याचा अर्थही फार उशिराने त्याच्या ध्यानात आला.

आक्काच्या मदतीला म्हणून एका लांबच्या नात्यातल्या बाईला घरात आणून ठेवले होते वडिलांनी. काय बरे तिचे नाव? रंगू - हो, रंगूच!

पण पुढे वडीलही गेले आणि जनार्दन घराबाहेर पडला. अजूनपर्यंत त्या घराकडे तो फिरकलादेखील नव्हता.

आणि काल स्वप्नामध्ये आपले ते घर आले - नुसते तेवढेच नाही, तर आक्काने आश्वासनही दिले... 'तू घरी ये. सगळे काही ठीक होईल...'

एकदम त्याला वाटले, खरेच, काय हरकत आहे सिंधूला गावी घेऊन जायला?

तशी आता कुठलीच गावे मागासलेली नाहीत. निदान जिल्ह्याच्या गावी तरी हॉस्पिटल असेलच.

गाडीची व्यवस्था आधी करून ठेवली म्हणजे झाले!

पण एकदा वाटू लागले, चांगले शहरात राहत असताना या अशा परिस्थितीत मुद्दाम खेडेगावी जायचे?

उलटसुलट विचारांचा मेळ बसेना. शेवटी त्याने सिंधूलाच हा विचार सांगितला.

आश्चर्य म्हणजे ती एकदम खुषीने तयार झाली. ''या घरातून दुसरीकडे कुठंही यायला तयार आहे मी. हे घर सोडल्याशिवाय तो माझा पिच्छा सोडणार नाही.'' ती म्हणाली.

तरीही जनार्दनचा विचार ठरेना, कारण तसे म्हटले तर अशा अवस्थेत तिला गावी नेणे अव्यवहार्यच होते.

पण त्या रात्री पुन्हा त्याला स्वप्नात घर दिसले. आक्का दिसली. म्हणाली - ''येतोस ना घरी?''

दुसऱ्या दिवशीच ती दोघे कोकणात जायला निघाली.

ती गावातल्या घरी पोचली, तेव्हा संध्याकाळ व्हायला आली होती. सिंधूला प्रवासाचा त्रास, वाटला होता तेवढा, झाला नाही. घरातून निघाल्यापासूनच तिच्यात एक नवीन उत्साह संचारला होता. घर पाहून तर ती फारच उल्हसित झाली. तिचा प्रवासाचा सारा थकवा कुठल्या कुठे गेला...

वास्तविक, उल्हसित होण्यासारखे काहीही त्या घरात नव्हते. जनार्दनच्या आठवणीतल्यासारखेच ते आजही दिसत होते! तितकेच पडझड झालेले, तितकेच जुनाट! वास्तविक इतक्या वर्षांत त्याच्यात काहीतरी फरक व्हायला हवा होता. पण म्हणण्यासारखा काहीच फरक पडलेला दिसत नव्हता.

अंगण ओलांडून ती दोघे ओटा चढून गेली. माजघराचे दार लावलेले होते.

जनार्दन ते लोटणार, एवढ्यात ते आपणहूनच उघडले.

दारात एक जख्ख पिकलेल्या केसांची म्हातारी उभी होती.

''मी जनार्दन. घरी आलोय. ही माझी बायको.''

सिंधूने म्हातारीला वाकून नमस्कार केला.

म्हातारी डोळे बारीक करून त्याचा चेहरा निरखीत होती. अखेरीस ओळख पटल्यासारखे एकाएकी ओरडली, ''जनू, अरे केवढा झालास!''

आणि याच वेळी जनार्दनाच्या डोक्यात प्रकाश पडला की, ही रंगूताई!

बाहेर आता चांगलाच काळोख पडला होता. रंगूताईने लगबग करून चिमण्या पेटवल्या. त्यांच्यामुळे थोडासा प्रकाश पडला, पण भिंतीवर अक्राळविक्राळ सावल्याही पसरल्या.

रंगूताईने चूल पेटवली, आणि भात टाकला. भाजी चिरायला घेतली. या वयातदेखील बाई तशी टकटकीत होती.

ती चुलीशी वावरत असताना, जनार्दन स्वयंपाकघरात तिच्याभोवतीच रेंगाळत राहिला.

"असा मधेचसा आलास?" रंगूताईने विचारले.

हळूहळू जनार्दनने सारी हकीगत तिला सांगितली.

"यावर काही उपाय आहे का?" त्याने तिला आशेने विचारले.

"रात्री ती झोपल्यावर मग ये माझ्याबरोबर." रंगूताई गूढपणे म्हणाली. "तुला उपाय सांगते."

रात्रीचे बारा वाजत आले होते. दिवसभराच्या श्रमांनी थकून सिंधू गाढ झोपी गेली होती. नव्या जागेत खरे म्हणजे लगेच गाढ झोप येणे कठीण, परंतु सिंधूला जसे काही स्वत:च्याच घरी असल्यासारखी शांत झोप लागली होती.

जनार्दन मात्र जागाच होता. पडल्यापडल्या तो रंगूताईच्या शब्दांचाच विचार करीत होता.

त्याने सांगितलेला प्रकार ऐकून रंगूताईला फारसे आश्चर्य वाटलेले दिसत नव्हते.

जनार्दनला नेमके याच गोष्टीचे आश्चर्य वाटत होते.

इतक्यात पलीकडच्या भिंतीवर उजेड दिसला. मग उजेड दाराशी आला.

रंगूताई हातात दिव्याची चिमणी घेऊन दारात आली.

"जनार्दन, जागा आहेस का?" तिने विचारले.

जनार्दन तात्काळ उठून उभा राहिला.

"चल माझ्याबरोबर." ती म्हणाली.

तो निघाला. त्याला सगळाच प्रकार विचित्र वाटत होता. पण तो काही विचारणार, एवढ्यात तिने तोंडावर उभे बोट धरून त्याला गप्प केले.

निघताना तिने दाराशेजारी उभी करून ठेवलेली कुदळ घेतली, चिमणी तिथेच ठेवली, एक धुरकटलेला कंदील घेतला आणि दरवाजाचा कोयंडा काढला.

- बाहेर मिट्ट काळोख होता. जागा अनोळखी, त्यात काळोख असा दाट; जनार्दनला काही सुचेनासे झाले.

जवळपास दाट झाडी असावी. रातकिडे एका तालात किरकिरत होते.

रंगूताईने कुदळ जनार्दनच्या हातात दिली.

चालताना तिच्या हातातल्या कंदिलाला हेलकावे मिळत होते. काळोखात मधेच प्रकाशाचा झोत पडत होता. झाडाझुडपावर तो पडला की चित्रविचित्र आकार तयार होत होते. दोघांच्या लांब लांब सावल्या वेड्यावाकड्या पसरत होत्या.

या वाटेने जनार्दन मघाशी आलेला नव्हता. मग त्याच्या लक्षात आले की, हा रस्ता मागीलदारचा आहे. आपण बाहेर पडलो ते घराच्या पाठीमागील दाराने -!

पण कशासाठी हे मात्र त्याच्या अजूनही ध्यानात येत नव्हते.

रंगूताई नेईल तिकडे तो मुकाट्याने चालला होता.

शेवटी रंगूताई थांबली. तिने त्याला एक जागा दाखवली. "हं - खण तिथं." ती म्हणाली.

जनार्दनने अस्वस्थपणे आजुबाजूला पाहिले. सगळीकडे शुकशुकाट होता. एखाद्या उघड्या माळासारखी ती जागा होती. जनार्दनचे डोळे आता काळोखाला काहीसे सरावले होते.

त्याने वर पाहिले. एक प्रचंड पिंपळाचे झाड खाली वाकून पाहत होते.

कां कोण जाणे, पण जनार्दनच्या अंगावर शहारा आला -

एकदम त्याला दोघाचौघांनी दिलेला सिंधूच्या आजारावरचा सल्ला आठवला, "डॉक्टरची औषधं कसली करताय? कसली तरी बाहेरची बाधा आहे!"

बाहेरची बाधा! म्हणजे रंगूताईदेखील असलाच काहीतरी इलाज -

"विचार करीत नको उभा राहूस. खण तिथं." रंगूताई हुकमी स्वरात म्हणाली.

जनार्दनने खणायला सुरुवात केली.

कितीतरी वेळ तो खणतच होता.

रंगूताई कंदील धरून उभी होती.
आणि एकाएकी जनार्दन खणायचा थांबला -
- समोर दिसले त्याने त्याचे काळीज फाटायची वेळ आली होती...
खड्ड्यामध्ये, एका लहानशा सापव्ह्याची राहिलेली हाडे पडली होती.
...छातीत धडकी भरून सिंधू जागी झाली.
कुणीतरी उंबरठ्यावर उभे होते.
जनार्दनाला उठवण्यासाठी सिंधूने हात पुढे केला.
पण जनार्दन अंथरुणात नव्हता.
त्या अंधारलेल्या खोलीत आपण एकटेच आहो, या जाणिवेनेच तिच्या भीतीला सीमा राहिली नाही.
उंबरठ्यावर जे कोणी होते, ते उतरून आत आले.
सिंधू भीतीने थिजून त्या दिशेला पाहातच राहिली.
तो सांगाडा काळोखात पांढुरका चकाकत होता. स्वत:च्या अंगचाच प्रकाश असल्यासारखा.
एकेक पाऊल मोठ्या प्रयासानं उचलून टाकल्यासारखा तो पुढे पुढे येत होता...
हाडांचा कट् कट् कट् आवाज येत होता.
सिंधूच्या तोंडून भीतीने किंकाळीही फुटेना. ती वाचा बसल्यासारखी, लुळा पडल्यासारखा वाटणारा हात हलवीत, मागे मागे सरकण्याचा, किंचाळण्याचा प्रयत्न करीत राहिली.
आणि ते भयानक मूल तर आईकडे झेप घ्यावी, तसे शक्य तितके भराभर पुढे येतच होते.
त्याचा जबडा वासला होता. हसल्यासारखा हलत होता. तोंडातून कसलातरी विचित्र आवाज निघत होता.
सिंधू भिंतीजवळ जाऊन पोहोचली. आणखी मागे जाणे शक्यच नव्हते.
सांगाडा खाली बसला आणि तिच्या पायांवरून रांगत रांगत येऊ लागला. तिने उचलण्याची वाट पाहू लागला. एखादे आईवेगळे मूल जसे आईकडे धावत येईल, तिला कवटाळू पाहील, तसे करू लागला.
आपले इवल्याइवल्या नाजूक हाडांचे हात पसरून तो तिच्या अंगाला झोंबू लागला -
त्याचा तो लिबलिबीत, मातीच्या वासाचा स्पर्श...
अतर्क्य भयाने सिंधूने डोळे गच्च मिटून घेतले...
- आई सापडल्याच्या आनंदात खदखदा हसत सांगाड्याने तिला गच्च मिठी मारली -
सिंधूची बंद झालेली वाचा एकदम परत आली. ती किंकाळ्या फोडू लागली -
त्या सांगाड्याला अंगावेगळा करण्यासाठी धडपडत, वळवळत ती किंकाळ्या फोडीतच राहिली -
- याच वेळी तिच्या पोटातून असह्य कळा उठू लागल्या...
आगीचा डोंब पेटल्यासारख्या त्या कळांनी जिवघेण्या वेदना तिच्या अंगभर पसरल्या.
तिची शुद्ध हरपली.
- खड्ड्यामध्ये हाडांच्या सापव्ह्याचा आकार असा फारसा दिसतच नव्हता. आधी ती लहान बाळाची हाडे, त्यातून त्यांना मुंग्यांनी खाऊन ती बरीचशी मातीशी एकजीव झाली होती. तरी नीट पाहिले तर साधारण लक्षात येत होते, की ते अवशेष एका अर्भकाच्या सापव्ह्याचे होते...
रंगूताईने कडोसरीची पिशवी जनार्दनाच्या हवाली केली. ''यात भर तो चुरा. नीट भर. काही मागे ठेवू नकोस.''
जनार्दनने म्हटल्याप्रमाणे केले.
''आता हात जोड, आणि म्हण - 'बाळा, मी तुला सद्गती देईन. तू आमचाच आहेस, असे समजेन.' ''
जनार्दनने तसे म्हटले. ते शब्द बोलताना कां कोण जाणे, त्याचा कंठ दाटून आला...
त्याने ती पिशवी हातात सांभाळून धरली आणि रंगूताईबरोबर तो परत निघाला.
''हे मूल आक्कीचं.'' परतताना रंगूताई म्हणाल्या.
''- म्हणजे तुमच्या घरातलंच. पण आक्कीचं लगन् झालेलं नव्हतं. गावातच कुठं भानगड करून बसली. तीसुद्धा लगन् झालेल्या माणसाबरोबर. बाप संतापी. त्यानं तिला कोंडून घातली - आणि मूल झाल्याबरोबर सरळ उचलून नेऊन मातीखाली गाडलं.''
''मूल?- बाबांनी गाडलं?''
''हो, गाडेपर्यंत ते जिवंत होतं. बिचाऱ्या निष्पाप अर्भकाचा काय दोष? पण तुझ्या बापाला तेवढा विचार नव्हता. तो जपत होता अब्रूला. पोर बिचारं आईची कूस शोधत असतानाच मातीखाली गेलं. नंतर आक्कीला

नेहमी दिसायचं. तिला तर म्हणे त्यानं 'आइ' म्हटलेलंसुद्धा ऐकू यायचं. आता जन्मलेलं पोर का 'आइ' म्हणतं, की चालायला लागतं? पण हा सगळाच प्रकार अघटित! याला कसला नियम? मनाचे खेळ म्हणावेत, नाहीतर आणखी काही म्हणावं - पण तुझ्या बापानं पाप केलं, एवढं खरं. आक्की हाय खाऊन मेली. तरी तुझा बाप कठोर! पोर कुठं गाडलं ते दाखवलं होतंन् मला - पण त्याला सद्गती दे म्हटलं, नीट अग्निसंस्कार कर म्हटलं, तर ते काही त्याला पटलं नाही. तुला पटो अगर न पटो जनार्दन - पण पोर आईवेगळं - किती शोधलं असेल त्यानं आईला - आक्कीनंतर तुमच्या घरात तुझ्या बायकोलाच दिवस गेले. ते आईला शोधत तिथवर आलं. सिंधूला म्हणावं, घाबरू नकोस. ते मातीतलं पोर तुझ्याकडे मायेनं येतं. मेलं तरी पोराचं पोरकेपण सुटत नाही. त्याला आई हवी! पण आता - तू बोलल्याप्रमाणे कर. या अस्थींचं नीट विसर्जन कर. मग ते पुन्हा दिसायचं नाही.''

बोलताबोलता दोघे घरापर्यंत आली होती.

अचानक त्यांच्या कानावर जन्मलेल्या मुलाच्या रडण्याचा स्वर आला.

दोघांनी धावतच घर गाठले...

सिंधू अजूनही निश्चेष्ट पडली होती - तिच्या शेजारी, नुकताच जन्मलेला मुलगा रडत होता.

त्याची नाळ कापून त्याला नीट निजवलेले दिसत होते.

कोणी कुणास ठाऊक! कारण आजुबाजूला चिटपाखरूही नव्हते.

पण त्या दोघांनाही नवल वाटले नाही.

या घरात, आपल्या वहिनीचे बाळंतपण कोणी केले असावे, ते एकाच क्षणी दोघांनाही समजून चुकले.

▪

प्रिया

हिल् स्टेशनवरची संध्याकाळ.

मी डोंगरमाथ्यावर उभा होतो.

संध्याकाळ गहिरी होती. पश्चिमेला जांभळट लालसर, किरमिजी ढग तयार होत होते. एकेक लुसलुशीत, गुलाबी ढग. म्हातारीच्या केसासारखा. हलकेच त्यावर किरमिजी रंगाची शिंपडण होत होती. मनात आलेल्या पुसटशा कल्पनेचा पक्का विचार व्हावा; तसा त्या ढगाला ठाशीव आकार येत होता. गडदपणा येत होता. पाहता पाहता तो ढग तसल्याच दुसऱ्या ढगांच्या राशीत फेकला जात होता. त्याचा आकार हळूहळू इतर ढगांत मिसळून जात होता; आणि मावळतीकडे किरमिजी रंगाचा शांत समुद्र तयार होत होता.

मी कितीतरी वेळ ढगांच्या हालचाली पाहत राहिलो. उंचावर उभा होतो; वाटले कधी पाय जमिनीवरून सुटतील, आणि खाली ओठंगलेल्या आभाळात पोहोचू, सांगता येणार नाही.

या विचारासरशी मी किंचित घाबरून गेलो. त्या घाबरण्यातही मौज होती.

मी खाली वाकून पाहिले.

अफाट हिरवा रंग डोंगराच्या उतारावर पसरला होता. गर्द झाडी. दाट काळसर रहस्यमय हिरव्या रंगाची नजर उतारावरून गडगडत गेली. हिरव्या शेतांचे पट्टे. हिरव्या रंगात किती छटा असतात? निरनिराळ्या छटांचे नुसते तुकडे एकापुढे एक ठेवलेले. आणि पुन्हा सगळ्यांचा मिळून एक हिरवागार रंग. मऊमऊ, उबदार, जन्मलेल्या बाळाच्या जावळासारखा मऊ. मध्येच वारा त्या जावळामधून फुंकर घालत होता. शेतांच्या अंगावरून हिरवा शहारा सरसरत जात होता.

त्या हिरव्या रंगात माझे मन किती वेळ डुंबत होते, कुणास ठाऊक? पण मी सहज वळून पाहिले, तर प्रिया माझ्याकडे पाहत हसत उभी होती.

"केव्हा आलीस?" मी विचारले.

"पुष्कळ वेळ झाला." ती हसून म्हणाली. "पण तुझी तंद्री लागली होती, म्हणून डिस्टर्ब केलं नाही. कसला एवढा विचार करीत होतास?"

"विचार? खरंच - कसला बरं करीत होतो? कसला असं नाही -" मी आठवून पाहिले - खरेच अमुक एका गोष्टीचा विचार मी करीत नव्हतो. एकातून एक, नवनवीनच आकार घेत विचार मनात तरंगत होते. माथ्यावरच्या गुलाबी ढगांसारखे.

"मी ओळखू तू कसला विचार करीत होतास?" केसांचा पिसारा या खांद्यावरून त्या खांद्यावर फेकीत ती म्हणाली, "माझा." आणि हसू लागली. हसताना तिच्या गालाला मोहक खळी पडली. वाटलं त्या खळीत एक छोटीशी गुलाबाची पाकळी बसवून टाकावी.

"चूक." मी वय विसरून ओरडत म्हणालो, "तुझा विचार नव्हतोच करीत मी! विचार करीत होतो ढगांचा, शेतांचा, हिरव्या रंगाचा."

"खरंच?" डोळ्यांत अकारण गंभीरपणा आणून ती म्हणाली, "कोण असतात हे सगळे? हे ढग? शेते? हिरवा रंग?"

"हे ना- " मी स्वत: खाली बसून तिला खाली ओढत म्हटले - "हे सगळे अनुभव असतात. बिनशब्दांच्या भाषेत शिकवलेले. आता हा हिरवा रंगच घे -"

"घेतला -" ती मिष्कील हसून म्हणाली.

"दोन वर्षांपूर्वी मी जहांगीर आर्ट गॅलरीत एक प्रदर्शन पाहिलं. तिथं एका चौकटीत असाच वेगवेगळ्या छटांच्या तुकड्यांतुकड्यांनी हिरवागार रंग साकार केलेला होता. मला त्याचा अर्थ कळेना. वाटले असा हिरवा रंग काय, कुणीही फासून ठेवील; पण आज खाली पसरलेली ती हिरवी नदी पाहिली, आणि त्या चित्राचा अर्थ

एकदम ध्यानात आला. वाटलं, याच अनुभवानं तो चित्रकार वेडावून गेला असणार!''

''बरं का व्याख्याते, नीट पाहा खाली. तुमचा तो हिरवा रंग आता काळा पडलाय.''

मी खाली पाहिले. खरोखरच अंधारू लागले होते.

''बाकी तू बोलायला लागलास की ऐकत राहावंसं वाटतं. एका विषयावरून दुसऱ्यावर, अशा पटापट उड्या मारीत तुम्ही लोक जे बोलता ना -''

''आम्ही लोक! म्हणजे -!''

''म्हणजे तू आणि कॅप्टन **(प्रियाचे वडील रिटायर्ड कॅप्टन होते. ती त्यांना कॅप्टनच म्हणायची.)** कुठून सुरुवात करून कुठं पोहोचाल याचा नेम नाही. कॅप्टनना तर विषयांतर केल्याशिवाय कुठल्याच विषयावर बोलता येत नाही.''

''खरंच - मला तुझ्या कॅप्टनना कधीपासून भेटायचंय.''

''अनुभव म्हणे!'' प्रिया स्वत:च विषयांतर करीत म्हणाली, ''कधीतरी अनुभव येतो - त्याचा अर्थ नंतर कधी कळतो! एखादा अनुभव दुसऱ्याला येतो - त्याचा अर्थ आपल्याला काही काळानं कळतो.'' आणि ती उगाचच गंभीर झाली.

पण मी तिचा गंभीरपणा फार काळ टिकू दिला नाही. बसल्याबसल्याच एक हात तिच्याभोवती टाकून, मी तिला जवळ ओढले.

पण तिचे शरीर ताठरले. जवळ येण्याऐवजी दूर जात ती म्हणाली - ''नको नको. ही जागा चांगली नाही.''

तिची भीती काढून टाकण्यासाठी मी मुद्दामच मोठमोठ्याने हसलो, आणि म्हणालो, ''मला ठाऊक आहे, ही जागा चांगली नाही. हे स्मशान आहे.''

आता थंडी चांगलीच पडू लागली होती. मी मफलर गळ्याभोवती गच्च लपेटून घेतला. वारा शीळ घातल्यासारखा इकडून तिकडे भणाणा वाहत होता.

''मग? ठाऊक असूनही तू मुद्दाम कशाला रे असं वागतोस? इथं या अशा ठिकाणी असले चाळे करायचे नसतात. समजलं?'' प्रिया म्हणाली.

मी हसलो. ''अशा ठिकाणी असले चाळे करायचे नसतात, म्हणजे काय?''

असले चाळे कुठे करावेत याचे काही नियम थोडेच आहेत? खरे म्हणजे हे चाळे कुठल्याही सार्वजनिक ठिकाणी करायचे नसतात. फक्त आपापल्या घरी करायचे असतात. पण मग स्मशान थोडीच सार्वजनिक जागा आहे? जिथे कुणीही अगदी क्वचितच जाते, ते काय सार्वजनिक ठिकाण? तसे म्हटले तर ते घरच - काहीजणांचे घर - काहीजणांचे घर -

मी विचारांत बुडून गेलो!

''सांग ना.'' प्रिया माझे खांदे घुसळीत म्हणाली - ''कां म्हणून तुला अशा ठिकाणी चावटपणा करावासा वाटतो?''

''मला चावटपणा कुठेही करावासा वाटतो.'' मी शब्दांना कृतीची जोड देत म्हटले.

''बघ, मला भीती वाटते -''

''अग - असल्या गोष्टींना स्मशान अगदी आदर्श जागा -'' मी तिला जवळ घेत म्हटले, ''कुणी चिटपाखरू फिरकणार नाही इथं. पाहिलंस सगळं कसं शांत आहे ते -?''

खरोखर सारे शांत होते. इतके की, वरून एखादी टिटवी ओरडत गेली, तरी दचकायला व्हावे! जळून गेलेल्या चितांचे भुरकट पांढरे डाग सोडले, तर तो जमिनीचा पट्टा अगदी काळाकुट्ट होता. काळी बारीक कणांची माती सर्वत्र पसरली होती. छोट्याशा गावाचे स्मशान ते. ते काही फारसे मोठे नव्हते, अगर तिथे दगडाविटांनी बांधून काढलेला भागही फारसा नव्हता. छोटासा चौकोनी मैदानवजा पट्टा होता तो - पण आजुबाजूला पाहावे, तर खाली ओठंगून राहिलेल्या आकाशाखेरीज काही दिसत नसे. आणि आता कातरवेळेच्या या वाढत्या अंधारात तर मैदानाच्या सीमा आकाशात मिसळून गेल्या होत्या, आणि भास होत होता, आम्ही दोघे काळ्याशार समुद्राच्या एका पांढुरक्या लाटेवर निश्चल पहुडल्याचा...

- काहीही असले तरी या गावात आल्यापासून स्मशान मला स्वत:चे घर असल्यासारखे आवडू लागले होते. तिथल्या नि:शब्द शांततेमुळे असेल, की वातावरणाच्या गूढपणामुळे असेल, परंतु पहिल्यापासूनच मी स्मशानात रमलो, बराचसा वेळ तिकडेच काढू लागलो. प्रियाशी माझी पहिली भेट झाली तीदेखील तिथेच. शांत वातावरण आवडत असल्यामुळेच तीही तिथे फिरायला आली होती. पुढेपुढे आम्ही ठरवून तिथेच भेटू लागलो होतो. ते स्मशान असल्याचे माझ्या बोलण्यात कधीतरी आले; पण त्यावर काहीच न बोलता ती फक्त

भयचकितपणे मला बिलगली होती...

आम्ही दोघे एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडून गेलो होतो. पण नुसत्या ओळखीपासून ते एकमेकांच्या गहन ओढीपर्यंतचा हा प्रवास आम्ही इतक्या थोड्या वेळात केला होता, की आमचाच त्यावर विश्वास बसत नव्हता. पहिल्या भेटीतच आम्ही मनोमन समजलो होतो की, आपण एकमेकांसाठी आहोत. शब्दांवाचूनच एकमेकांना हे नाते जाणवले, हरकती न घेता पटले, त्याचे बंधन एकमेकांनी मान्य केले आणि मग एक सुंदर स्वप्न सुरू झाले. त्या स्वप्नात आम्हाला वेगळी अस्तित्वे नव्हती. वागण्याच्या इतर जागा नव्हत्या. नाते एकच होते - एकमेकात मिसळून गेलेल्या युगानुयुगाच्या प्रणयी युग्माचे, आणि जागा एकच होती - ते संकेतस्थळ - ते नि:शब्द गूढ मैदान - ते स्मशान...

काळ पुढे जातच नव्हता - जणू एकच एक लांबलचक भेट घडत होती - तिच्यात काल-आज-उद्याचे तुकडे पडतच नव्हते. दिवसांचे पदर एकमेकांत मिसळून गेले होते.

आणि हे दिवसही फार नव्हते. उणेपुरे आठ-दहा दिवस.

मला हे स्वप्न असेच चालू राहायला हवे होते - मात्र अधिक गहिरे होऊन.

म्हणून आज मी तिच्या वडिलांना भेटून आमच्याविषयी सांगणार होतो. लगनचे पक्के करून टाकणार होतो.

तिच्या वडिलांना मी प्रत्यक्षात पाहिलेले नव्हते. पण तिच्या तोंडून त्यांची वर्णने मात्र पुष्कळ ऐकली होती. ते शिस्तीचे भोक्ते आहेत, रागीट आहेत, जितके मायाळू तितकेच करडे आहेत, वगैरे.

मी आज त्यांना भेटणार असल्याचे तिला माहीत नव्हते.

कारणे दोन : पहिले, अगदी उघड - तिला मिळणार असलेला आनंद, आश्चर्याचा धक्का. आमचे गुपित तिच्या वडिलांकडे फोडल्यानंतर त्यांनी उत्साहाने तिला बोलावले असते, 'खरं का ग मी ऐकतोय ते?' असे विचारले असते, आणि दाराच्या पडद्याशी खेळत तिने लाजून जे 'चला - काहीतरीच' म्हटले असते, आणि चोरून तिरप्या नजरेने माझ्याकडे पाहत मान खाली झुकवली असती, ते-ते गोड दृश्य मला चुकवायचे नव्हते. त्या वेळी तिच्या गालांवर पडणारी खळी माझ्या मनात कायम घर करून राहणार होती.

दुसऱ्या कारणाचा संबंध माझ्या स्वाभिमानी स्वभावाशी होता. माझा इरादा तसा दोन-चार वेळा मी प्रियाच्या कानावर घातला होता. तेव्हा ती हसून म्हणाली होती, "कॅप्टनना मी फार चांगली ओळखते. तू त्यांना एकदम विचारलंस, तर ते फाडकन् नाही म्हणतील. आणि मग जन्मात आपलं मत बदलणार नाहीत. त्यापेक्षा मीच हळूहळू त्यांच्या मनाची तयारी करते. मग ते नक्कीच परवानगी देतील."

पण मला स्वत:ला असली पळवाट नको होती. कुठल्याही कामात मला असला बोटचेपेपणा चालत नसे. मी सरळ जाऊन त्यांच्यासमोर उभा राहणार होतो; आणि त्यांना 'सॅल्यूट' करून म्हणणार होतो - "कॅप्टन - माझं तुमच्या मुलीवर प्रेम आहे. मी तिच्याशी लगन् करणार आहे. गुडनाइट."

पण यातले काहीच मी प्रियाला सांगितले नाही. कारण क्रियेवीण वाचाळता व्यर्थ होती. शिवाय या क्षणी वाचाळतेपेक्षा कितीतरी अधिक मजेच्या क्रिया करण्याजोग्या होत्या.

मी जमिनीवर आरामात पहुडलो होतो. बेडरूममध्ये ऐसपैस बिछान्यावर लोळावे, तितक्या मजेत प्रिया माझ्या कुशीत किलबिलत होती.

"बघ - सांगितलं तरी ऐकलं नाहीस. स्मशानात झोपू नये -"

"कारणाशिवाय कुणी झोपतं वाटतं?" मी खट्याळपणे हसत म्हणालो, "आणि आता तर फार सुंदर कारण आहे माझ्याजवळ." मी तिच्या-माझ्यातले अंतर नाहीसे करण्याच्या उद्योगात होतो.

"तुला सगळ्यांची थट्टा वाटते." ती गंभीरपणे म्हणाली - "मला भीती वाटते - स्मशान ही गोष्ट थट्टा करण्यासारखी आहे का?"

"वेडाबाई, उगाच घाबरून जाऊ नका. घाबरून सोडायचे तर मलासुद्धा पुष्कळ गोष्टी सांगता येतील. याच स्मशानातल्या."

"या स्मशानातल्या? तुला काय माहीत?" माझ्या ओठापासून आपले ओठ दूर करीत ती म्हणाली.

"मी ऐकल्या आहेत." मी म्हणालो, "सांगतो हव्या तर..."

"मग?"

"इथं एका जोडप्याला एकत्र जाळलंय. दोघांचं म्हणे फार प्रेम होतं एकमेकांवर. घरचा विरोध होता, म्हणून दोघांनीही आत्महत्त्या केली. त्यानंतर त्यांना एकत्र जाळण्यात आलं."

"पुढे?"

''त्यानंतर त्याच जागी आपल्यासारखं एक जोडपं येऊन झोपलं.''

''मग - त्यांचं काय झालं?''

''त्यांना त्या प्रेमिकांच्या पिशाचांनी झपाटलं. मुलाला मुलीच्या पिशाचानं, मुलीला मुलाच्या. रात्री झोपलेल्या मुलाला भास व्हायला लागला की आपल्या अंगावर मुलीचे केस पसरले आहेत. मुलगी अंथरुणात जाऊन पडली तर, काही तरी बोचायला लागलं. पाहते तर हाडांचा तुकडा. झटकून टाकला, तर आणखी थोडा हाडांचा चुरा. बिछाना जितका साफ करावा, तितकी त्यावर अधिकच हाडं जमा व्हायची. पाहता पाहता मुलीची शुद्ध गेली. तो मुलगा आणि ती मुलगी दोघांनाही वेड्यांच्या इस्पितळात ठेवलं होतं. तिथंच ती मेली. दोघंही.''

काळोख फार पडला होता. हवेतला गारठादेखील शहारे आणणारा होता.

ती मला म्हणाली - ''हे सगळं माहीत असूनही तू इथं झोपलास - स्मशानात -''

मी हसलो, म्हणालो, ''असल्या गोष्टींचा माझ्यावर परिणाम होईल असं मला नाही वाटत.''

''कां?'' तिने विचारले.

उत्तर न देताच मी चालू लागलो. तीदेखील काही बोलली नाही.

मुकाट्याने आम्ही डोंगर उतरू लागलो.

डोंगराच्या पायथ्याशी झाडीतच तिचा बंगला होता. पांढराशुभ्र बंगला. कितीदा तरी तिने मला तो लांबून दाखवला होता.

आज मी तो जवळून-आतून पाहणार होतो.

अर्थात माझ्या बेताचा सुगावा तिला लागलेला नव्हता. बंगला दिसू लागताच ती माझा हात सोडून 'मी गेलेऽ' म्हणत पळालीसुद्धा.

मी थोडा वेळ इकडेतिकडे रेंगाळलो.

मग सावकाश बंगल्याच्या दिशेने निघालो.

छोटा कॉटेजवजा बंगला होता तो. आजुबाजूला गर्द झाडी. बंगल्याला लागून काही झाडे हौसेने लावलेली.

बाहेरच छोटा पोर्च होता.

देखणा, रेखीव. त्याच्या आधाराने वाढलेल्या वेली.

दोन स्फटिकाच्या पायऱ्या चढून मी वर गेलो.

छोटासा दरवाजा, लालचुटुक रंगाचा. त्यावरची बेल वाजवली. आत सुरेल नाद घुमला. एखाद्या नादमधुर वाद्यातून यावा, तसा.

''मला भेटायला आलात? मी इथेच आहे.'' माझ्या पाठीमागून अवचित शब्द आले. मी दचकलो.

''आपणच कॅप्टन का?'' माझ्यासमोर उभ्या असलेल्या उंचापुऱ्या, दणकट, मध्यमवयीन माणसाला मी विचारायचे काहीतरी, म्हणून विचारले.

''हो - या ना. इथंच बसलो तर हरकत नाही ना?'' पोर्चच्या एका बाजूला दोन गार्डन चेअर्स होत्या, तिथं मला नेत कॅप्टन म्हणाले.

त्या दोन प्रशस्त वेताच्या खुर्च्यांमध्ये एक छोटे टेबल होते. टेबलावर एक व्हिस्कीची आणि एक सोड्याची अशा दोन बाटल्या होत्या. जवळच एका बशीत काजू होते. उजेड अगदी मंद, जवळजवळ अंधारातच जमा होणारा होता. मघा तिथे बसलेले कॅप्टन माझ्या ध्यानात आले नव्हते, ते बहुधा त्या अंधारामुळेच.

''तुम्हाला चालते ना?'' ग्लासमध्ये व्हिस्की ओतत कॅप्टन म्हणाले. ''प्लीज, गिव्ह मी कंपनी.'' आणि त्यांनी ग्लास माझ्यापुढे ठेवला. सोड्याची बाटली सरकवली.

माझ्या मूळ बेताला हादराच बसला होता. इथले सगळे वातावरण वेगळेच होते. माझ्या कल्पनेपेक्षा खूप वेगळे. मी मनातल्या मनात शब्द जुळवत पीत राहिलो.

आणि कसे कोण जाणे, माझ्या एकदम ध्यानात आले की शब्द जुळवून तरी काय उपयोग आहे? कॅप्टनसाहेब ते ऐकून घेण्याच्या नि त्यावर विचार करण्याच्या अवस्थेत नाहीत. पेगमागून पेग ते पोटात रिचवीत होते. काहीतरी बोलत होते; पण त्यांना मी कोण, कुठला, याचे फारसे सोयरसुतक नसावे.

''यू सी - इट इज टेरिबली लोनली हिअर.'' त्यांचा शब्द जड येत होता. ''बट् दॅट इज व्हॉट् आय् लाइक अबाउट् धिस् प्लेस - यू कॅनॉट इमॅजिन हाउ आय् हेट् लोनलीनेस.'' स्वत:शीच उलटसुलट वाद घातल्याप्रमाणे परस्परविरोधी विधाने करीत ते बरळत होते.

एक-दोन वेळा मी उठून आत जाण्याचा प्रयत्न केला; पण त्यांनी मला हाताला धरून खाली बसवले.

निदान प्रिया तरी आतून येईल, अशी मला आशा होती; पण तीही आली नाही. मी काहीसा काळजीत पडलो.

आणि हळूहळू माझीही तार लागली. मला काळजी वाटेनाशी झाली. जे काय सांगायचे, ते उद्यापरवा सावकाशीने येऊन सांगू, असे मी ठरवले आणि मजेत पीत बसलो.

थोड्याच वेळात तो पोर्च, आजुबाजूची झाडे आणि समोरचा तो दणकट माणूस ही स्पष्टपणे वेगवेगळी कळेनातशी झाली. डोके एका मधुर सुन्नपणाने भरून गेले.

तरीही मी अजून पूर्णपणे आउट झालो नव्हतो. मला समोर काय चालले आहे, याचे चांगले भान होते.

एकाएकी कॅप्टन उठून आत जाऊ लागले. दाराशी गेले आणि त्यांचा तोल गेला.

मला समजायच्या आत मी त्यांच्यापाशी धावत पोहोचलो होतो.

मी त्यांना उठवले. दार ढकलले. ते उघडेच होते.

कॅप्टन बेडरूमच्या दिशेने जात होते. मी त्यांना धरून त्यांच्याबरोबर चाललो होतो.

आत कुणाचीही चाहूल नव्हती. रात्रीची वेळ असल्यामुळे गडीमाणसे बहुधा निघून गेली असावीत. पण प्रिया -?

"प्रिया - प्रिया -" मी हाका मारल्या.

कॅप्टनने मला हात हलवून नकारार्थी खूण केली. मला नीटसा अर्थ कळला नाही. पण बहुधा ती झोपली असावी, आणि तिला उठवण्याची कॅप्टनसाहेबांची इच्छा नसावी.

खोलीत पोहोचताच कॅप्टन पलंगावर आडवे झाले.

मी परत फिरलो. जाण्यापूर्वी प्रियाला सांगून जावे, असे फार मनात आले. पण तिला उठवणे जिवावर आले.

एका विचाराने मी थबकलो - आज रात्री इथंच राहिलो तर?

व्हिस्कीची सुस्ती अंगभर पसरली होती. ताणून द्यावेसे वाटत होते. या अवस्थेत काळोखातून धडपडत घरी जायचे - घरी म्हणजे खोलीवर. खोलीवर वाट पाहणारे कोण होते?

मी तिथेच एका कोचावर हातपाय पसरले. एकाएकी अंगाखाली मऊमऊ, गुळगुळीत असे काहीतरी लागले, म्हणून परत उठून बसलो.

दचकण्यासारखे त्यात काही नव्हते. केसांना लावतात तसले ते एक गंगावन होते.

मी ते बाजूच्या खुर्चीवर टाकले, आणि परत कोचावर पसरलो.

क्षणार्धात मी झोपेच्या काळ्याशार लाटांवर तरंगू लागलो.

- अचानक एका विलक्षण भासाने मी जागा झालो.

मला वाटले प्रिया माझ्या कुशीत आली आहे. तिचे केस माझ्या कुशीवर घासत आहेत. अर्धवट झोपेत मी तिला थोपटू लागलो.

एकदम माझे डोळे खाडकन् उघडले.

माझ्या कुशीत कुणीही माणूस नव्हते.

पण केसांचा एक पिसारा मात्र माझ्या छातीवर फिरत होताच.

मी दिवा लावण्यासाठी धडपडत उठलो.

दिवा लावणे इतके सोपे मुळीच नव्हते. एकतर माझी गुंगी आणि झोपही अजून पुरती उतरलेली नव्हती. दिव्याच्या बटनाची जागाही शोधून काढायची होती. शिवाय त्या अनोळखी जागेतले फर्निचर एकसारखे वाटेत येत होते.

आणखी - आणखी ते मऊ, गुळगुळीत केस - ते माझ्या अंगभर हुळहुळत होते.

कसाबसा धडपडत मी दिवा लावला. खोलीत माझ्याखेरीज दुसरे कुणी नव्हते. माझ्या अंगावरदेखील केसबिस काही येऊन पडलेले नव्हते. मघाचे ते गंगावनदेखील, मी टाकले, त्याच खुर्चीत शांतपणे पडून होते.

मी स्वत:च्या खुळेपणाला हसलो. व्हिस्की प्रमाणाबाहेर घेतल्याबद्दल स्वत:ला दोष दिला, आणि परत झोपण्यासाठी दिव्याच्या बटनावर हात ठेवला मात्र -

समोरच्या खिडकीत लक्ष जाऊन मी विलक्षण दचकलो.

खिडकीत काळेभोर, गुळगुळीत असे स्त्रीचे लांबसडक केस लोंबकळत होते. जसे काही वर न दिसण्याजोगे एखादे मुंडके टांगलेले असावे आणि त्या मुंडक्याचे केस तेवढे खाली लोंबावेत, तसे.

नक्की - नक्की हे भयंकर दृश्य - हा भास - भासच. त्या भासाकडे पाठ फिरवून मी खोलीत वळलो -

आणि पुन्हा एकदा दचकलो.

खुर्चीत मघाचे ते गंगावन नव्हते.

खोली माझ्याभोवती गरगर फिरू लागली.

मी धीर करून खिडकीकडे पाहिले.

ते लोंबकळणारे केस आता तिथे नव्हते.

मी सुस्कारा सोडला.

आणि एकाएकी माझ्या दोन्ही खांद्यांवर केसांच्या दोन बटा येऊन पडल्या. मी त्या काढून टाकू लागलो. झटकू लागलो, पण त्या झटकल्या जाईनात. उलट झटकणाऱ्या माझ्या हाताभोवतीच त्या बटांचे विळखे पडू लागले. माझ्या दोन्ही बाजूंनी त्या दोन जाडजूड काळ्याभोर बटा सापासारख्या माझ्या अंगावर चढू लागल्या. माझ्या गळ्याच्या रोखाने.

मऊ-काळ्याशार-वळवळणाऱ्या-सुटलेल्या केसांच्या-एकत्र जुडी झालेल्या - केस - भयंकर केस - लांब लांब केस -

मी किंचाळलो. न थांबता किंचाळतच राहिलो.

कॅप्टन धावत येऊन दारात उभे राहिले, तरी मी किंचाळतच होतो. त्यांनी माझ्याभोवती दोन्ही हात टाकून मला छातीशी धरले, तेव्हा कुठे माझी किंकाळी थांबली.

"केस - केस" मी स्फुंदत होतो. "ते माझा जीव घेणार -"

"आय सी!" माझा घाम पुसत ते म्हणाले, "आता इथं कुठं केस नाहीत. दिसतात तुला? - दिसतात?"

मी हळूहळू धीर करून आजुबाजूला पाहिले. केसांचा मागमूसही नव्हता.

"भास - असा भयंकर भास झाला मला -" माझ्या अंगावरचा काटा अजून गेला नव्हता.

"भास नव्हता तो -" कॅप्टन म्हणाले. आता ते चांगलेच शुद्धीवर आलेले दिसत होते - "ती आणि तिचा प्रियकर - तिला हाडांचा भास व्हायचा आणि त्याला केसांचा. या भासांमध्ये खंगून खंगून ती दोघं मेली. डोंगरमाथ्यावर त्यांना जाळलं, आणि आता ती झपाटतात. तो बायकांना, ती पुरुषांना, तुझ्यासारख्या."

"झपाटतात -?" भीतीने माझ्या तोंडून शब्द निघत नव्हता.

"हो. या असल्या अवस्थेत तू मेलास, तर तूदेखील दुसऱ्यांना झपाटशील. पण मी तुला मरू देणार नाही. मांत्रिक करीन - डॉक्टर करीन - पण मी तुला मरू देणार नाही -"

"तुम्ही काय बोलताय - मला समजत नाही -"

"मरू देणार नाही, कारण तुझी जबाबदारी माझ्यावर आहे. तुला तिनं झपाटलंय, डोंगरावर स्वत: हाय खाऊन मेली. आता दुसऱ्यांना झपाटतेय."

"कोण? कोण?"

"तीच. जिचं दु:ख विसरण्यासाठी मी असा बेसुमार पितो, ती, ही."

त्यांच्या बोटाच्या रोखाने मी भिंतीवर पाहिले.

तिथे तिचा फोटो होता. केसांचा पिसारा एका खांद्यावरून पुढे घेतलेला. गालाला पाकळीसारखी खळी. माझी प्रिया.

फोटोखाली दोन तारखा होत्या. एक तिच्या जन्माची आणि दुसरी तिच्या मृत्यूची.

■

झाड

हातातली बॅग गच्च पकडून मी पडावातून उतरलो. चपला भिजू न देण्याचा आटोकाट प्रयत्न करीत, धक्क्यावर पाय ठेवला.

माझ्याबरोबर आणखी थोडे तुरळक प्रवासी उतरले. पडावात गर्दी बिलकूल नव्हती.

वेळ संध्याकाळची होती. म्हणजे झगझगीत, सोनेरी सूर्यास्ताचीदेखील नव्हे. नुसताच मळकट, उदासवाणा, म्हटले तर आहे, म्हटले तर नाही, असा केविलवाणा प्रकाश सगळीकडे भरून राहिला होता.

धुक्याचे दगड निसरडे झाले होते.

बॅग सावरीत मी धक्का चढून आलो. गच्च पाय ठेवीत, क्षणभर वळून पाहिले. पडाव परत जाण्याच्या तयारीत होता. पाणी चुळुक् चुळुक् वाजत होते.

क्षणभर मनात कालवाकालव झाली. जिथून आलो, तिथे आता परत फिरणे नाही. कदाचित कायमचेच!

पण मनाला आवर घातला. मी जे करायचे मनात घेतले होते, त्यात हळवेपणाला जागा नव्हती. इतकी वर्षे भित्रेपणाने, बुजरेपणाने, वरिष्ठांचे सारे काही ऐकून घेऊन 'यस् सर' करीत काढली. मनात धुमसत राहिलो. सगळ्या बाजूंनी विचार करीत राहिलो. नको इतका विचार केला. डोके फुटेपर्यंत. सुदैवाने त्या विचारातच संपून गेलो नाही. धाडस करण्याइतपत धीर नशिबाने टिकून राहिला. जीव संधीची वाट पाहत टुकत राहिला. आणि एक दिवस संधी मिळाली त्यासरशी, ठोऽऽ! धुमसत राहिलेल्या शक्तींनी पेट घेतला. मोठ्ठा स्फोट झाला!

त्या स्फोटामध्ये एक जुने जग जळून खाक झाले आणि नव्या जगाची सुरुवात झाली.

हे नवीन पाऊल टाकताना मागचे सारे विसरायला हवे होते. क्रूरपणे, भावनाशून्यपणे! मग तिथे हळवेपणाचा काय उपयोग होता? जे संपले, तुटले, ते गेल्याचा शोक कशाला हवा होता? मी निकराने नजर वळवली. परत फिरणाऱ्या पडावाकडे पाठ फिरवली, आणि घट्ट मनाने, गच्च पावलाने धक्का चढून आलो.

मात्र हे सारे करताना मी आजुबाजूला लक्ष ठेवायला विसरलो नव्हतो. तीक्ष्ण नजरेने मी आजुबाजूचा वेध घेत होतो. आता मी पूर्वीचा सरळमार्गी लाचार कारकून राहिलो नव्हतो. माझ्या काखोटीच्या छोट्या बॅगमध्ये दोन लाख रुपयांच्या कोऱ्या करकरीत नोटा होत्या. आता मी कावेबाज, बेरकी, लक्षाधीश झालो होतो. पूर्वी कोणी माझ्याकडे पाहता, तर मला त्यात काहीच वाटण्याचे कारण नव्हते. आज मी लक्षाधीश होतो; आणि तसला गैरवाजवी मोकळेपणा मला बिलकूल परवडण्यासारखा नव्हता. माझ्याकडे कुणी पाहत नाही ना, मी बॅग जाणूनबुजून लपवीत आहे, असे तर कुणाला वाटत नाही ना, हे मी एकदा डोळ्यांच्या कोपऱ्यातून पाहून घेतले आणि झपझप निघालो.

मला शक्यतो कुणाच्या नजरेला पडायचे नव्हते. माझे जुने आयुष्य संपले होते. मीच संपवले होते. पण नवे अजून सुरू व्हायचे होते; आणि नव्याजुन्यामधला हा सांधा ठाऊक असलेला एकही साक्षीदार मला नको होता. मी फरारी होतो. ज्या इंजिनिअर्सच्या फर्मकडे सरकारी योजनांची प्रचंड कामे येतात, अशा एका फर्ममध्ये मी कारकून होतो. गेल्या कित्येक वर्षांपासूनचा विश्वासू कारकून होतो. माझ्या हातून कधीही नव्या पैशाचीही अफरातफर झालेली नव्हती. कारण अफरातफर करायचीच तर ती, एकदाच, आणि फार मोठ्या रकमेची, असा माझा निश्चय होता.

अखेरीस ती संधी आली. आमच्या फर्मच्या तिजोरीत दोन लाख रुपये येऊन पडले होते. लाच म्हणून मिळालेला, नाही तर असाच कसलातरी, रीतसर हिशेबात दाखवता न येण्याजोगा चोरटा पैसा होता तो! म्हणून तर बँकेत भरला न जाता, तो नुसता तिजोरीत लोळत पडला होता. मी फक्त थोडीशी शिताफी केली - बॉस कोट खुर्चीला अडकवून टॉयलेटला गेला, तेव्हा त्याच्या कोटातली चावी काढून घेऊन, ती तिजोरीच्या खालीच टाकून ठेवली. दरम्यान बॉसला चावी सापडली नसती, तरी आळ माझ्यावर येऊ नये, म्हणून! पण तो

प्रश्नच आला नाही; कारण मधल्या वेळात चावीची गरज भासलीच नाही. तो जेव्हा मीटिंगसाठी बोडरूममधे गेला, तेव्हा मी पैसे बॅगेमध्ये भरले आणि सरळ धक्क्यावर येऊन बोट पकडली. सारे काही इतक्या सहजपणे झाले, की ते तसे घडले यावर विश्वासदेखील बसू नये.

पण खरी कामगिरी पुढेच होती. मिळवलेले पैसे पचविणे, ही, ते मिळवण्यापेक्षा अधिक कठीण गोष्ट होती. मी फरारी झाल्यामुळे अर्थातच माझा गुन्हा सिद्ध झालेला होता. आता फक्त नाव बदलून वेगळे आयुष्य सुरू करणे, एवढी एकच गोष्ट माझ्या हातात होती. त्यासाठी मी या आडगावात निदान संध्यापुरता आसरा घेतला होता. इथे शक्य तेवढ्या कमी लोकांच्या नजरेला पडणेच माझ्या हिताचे होते.

एक बस जवळच उभी होती. घाईगर्दी करून बरेचसे लोक तिच्यात चढले. पण मी मागे रेंगाळलो. जवळच विडीकाडीचे दुकान होते. तिथून सिगारेट घेतली. हळूहळू सगळा धक्का रिकामा झाला. मनातून थोडीशी धास्ती वाटू लागली. आपण बस सोडून देण्याचा मूर्खपणा तर केला नाही ना, असे वाटू लागले. बॅग छातीशी गच्च दाबून धरीत, मी थोडा वेळ तसाच उभा राहिलो.

आणि अचानक सावल्यांमधून एक घोडागाडी पुढे आली. मी दचकून मागे झालो. गाडीवान मला म्हणाला, ''बसा.''

मी पाहातच राहिलो. वाढत्या काळोखामुळे असेल, किंवा आणखी कशामुळे, पण गाडीवानाचा चेहरा मला पूर्णपणे दिसत नव्हता. मात्र चेहऱ्याची एकच बाजू न् त्या बाजूच्या डोळ्यांतील चमक तेवढी जाणवली.

तो अधिक काही बोललाच नाही. कुठे जाणार हेदेखील त्याने विचारले नाही. मी गाडीत चढण्याची वाट पाहत तो आपल्या जागेवरच थांबला. मग मीही अधिक काही न बोलता गाडीत चढून बसलो. एका जवळच्याच गावाचे नाव सांगितले.

गाडी चालू झाली. आजुबाजूच्या नीरव शांततेत घोड्यांच्या टापांचा आवाज घुमू लागला. गाडी वळतावळता मी एकदा धक्क्याकडे पाहून घेतले.

धक्क्यावर चिटपाखरू नव्हते. करडे पाणी अजगरासारखे निस्तब्ध पसरले होते. मी सोडलेला किनारा तर आता वाढत्या काळोखात दिसेनासाच झाला होता.

कुणीतरी माझ्यासाठी मुद्दाम पाठवावा, तसा हा गाडीवान मला भेटला होता. मला कुठे जायचे आहे, हे कळल्यानंतर त्याने अधेमधे फालतू चौकशा बिलकूल केल्या नाहीत. मी त्याला आपणहून सांगितले की, मला राहण्यापुरती जागा हवी आहे. तो काही बोलला नाही; परंतु त्याच्या मौनावरूनच, कां कोण जाणे, माझी अगदी पक्की खात्री झाली, की अशा एखाद्या ठिकाणी तो मला अचूक नेऊन सोडील!

काळोख वाढत होता. परंतु वाट गाडीवानाच्या चांगलीच ओळखीची असावी, कारण झाडाझुडपांतून, दगडाधोंड्यांतून, जाणाऱ्या अरुंद रस्त्याने तो अत्यंत कौशल्याने गाडी हाणत होता. असे वाटत होते की, नेहमीच्या मळलेल्या वाटेपेक्षा वेगळी अशी ही वाट याने स्वत:च शोधून काढलेली आहे. घोडा तर पाखरासारखा धावत होता आणि गाडीच्या दोन्ही बाजूंनी वारे भिरभिरत होते. बराचसा रस्ता जंगलातून गेला होता, आणि काळोखात गुपचूप उभ्या असलेल्या माणसासारखे दिसणारे वृक्ष गाडीजवळून सर्रकन् नाहीसे होत होते. त्या जंगलातून तसा एकट्याने प्रवास करताना शांततेची भीती वाटत होती. निदान गाडीवानाने तरी काहीतरी बोलावे, असे वाटत होते, पण गाडीवान गप्पच होता. घोड्यासाठीदेखील तो काही आवाज काढत नव्हता. अधुनमधून आवाज येत होता, तो फक्त घोड्याच्या टापांचा, पाचोळ्याचा आणि जंगलातून सोसाटणाऱ्या वाऱ्याचा...

अखेरीस गाडी अचानकपणे थांबली आणि गाडीवान म्हणाला, ''इथं चौकशी करा.''

मी बॅग सांभाळीत खाली उतरलो.

समोर एक मोडकळीला आलेले एकमजली घर होते. मी गाडी लगेच सोडली नाही.

न जाणो, इथे व्यवस्था न झाल्यास, मला पुढे जावे लागले असते.

बिचकत बिचकतच मी फाटक ढकलले. जुने गंजलेले फाटक तक्रार करीत उघडले. मी तिथूनच ओरडून विचारले, ''कुणी आहे का?''

उत्तर आले नाही. माळ्याचे, नाहीतर रखवालदाराचे असे कुणाचे घर आढळते का पाहावे, म्हणून मी घराच्या मागच्या बाजूला गेलो.

मागच्या बाजूस खरेच एक पडका मांगर होता. मी बाहेरून पुकारल्यानंतर एकजण हातात कंदील घेऊन बाहेर आला.

कंदिलाच्या प्रकाशात त्याचा चेहरा नीट दिसत नव्हता. प्रकाशात उजळली होती ती चेहऱ्याची फक्त एक

बाजू. त्या बाजूचा डोळादेखील एका किरणाने चकाकत होता.

मी म्हटले - ''इथं कुणी असतं का? मला राहायला जागा हवीय.''

कंदिलवाला म्हणाला - ''इथं कुणीच नसतं. घर रिकामंच आहे. तुम्ही राहू शकता.''

मला आश्चर्य वाटले. पण एका परीने त्यात नवलाचे काही नव्हते. घर जरा मोडकळीला आले असेल, तर त्यात कोण राहणार? मालकाने दुसरी जागा घेतली असावी. हा रखवालदार किंवा माळी, जो कोणी असेल तो दुसरा काही कामधंदा करून इथेच राहत असावा. अधुनमधून घराकडे पाहात असावा, एवढेच.

मी भाड्याची चौकशी केली.

''पैशांची घाई नाही. सावकाश द्या.'' तो म्हणाला, ''चला, मी घर दाखवतो.''

तो कंदील घेऊन पुढे निघाला. मी पाठोपाठ गेलो.

घर बघायला जाण्याआधी गाडीवानाला मोकळा करावा म्हणून मी पुढल्या दारी आलो.

आणि मला आश्चर्याचा धक्काच बसला.

दरवाजात गाडीवान नव्हता आणि गाडीदेखील नव्हती.

मी रस्त्याच्या टोकापर्यंत दूरवर पाहिले. चिटपाखरूदेखील दिसत नव्हते. गाडीवान तर केव्हाच गाडी घेऊन गेला असावा, कारण रात्रीच्या शांततेतही गाडीचा आवाज कुठेच ऐकू येत नव्हता.

मला इतक्या दूरवर आणून पोहोचवल्यानंतर, पैसे न घेताच त्याने काय म्हणून जावे? तो पैसे घ्यायचे विसरला...? की मला केवळ इकडे आणून सोडण्यापुरताच तो मला भेटला होता?

आणि इतका वेळ लक्षात न आलेली एक गोष्ट अचानक माझ्या ध्यानात आली.

घराच्या अंगणातच एक उंच झाड होते. समोर एखादी ताडमाड आकृती दत्त म्हणून उभी राहावी, तसे ते झाड जणू काळोखातून एकदम समोर आले.

झाड सरळसोट उंच वाढलेले होते. कसले होते, ते मला समजले नाही. काळोखामुळे असेल, पण दिवसादेखील समजले असते, असे वाटत नाही. कारण मला झाडांची फारशी माहिती नव्हती. एक मात्र खरे की, ते उंच झाड घराच्या अंगणात असे पहारा देत बसलेले पाहून माझ्या मनावर एकदम दडपण आले. कंदिलवाल्याने चावी लावून दरवाजा उघडला. घर सारे मोकळेच होते. भिंती जुनाट होऊन त्यांचे पोपडे उडाले होते. जिथे तिथे कोळिष्टके माजली होती. गेल्या कित्येक दिवसांत इथे कोणी राहिल्याचे दिसत नव्हते.

जिना चढताना पायऱ्या कुरकुरल्या. कंदिलाच्या प्रकाशात सावल्या भिंतीवर नाचून गेल्या.

मला घर आवडले. सर्वसामान्य जगाचे सारे बंध तोडून माणसातून उठलेल्या माझ्यासारख्याला लपून राहायला उत्तम ढोल होती ती!

कंदिलवाल्याला निरोप देऊन मी सरळ आडवा झालो.

पोटात भूक होती. पण खाण्याची व्यवस्था जवळपास होण्यासारखी नव्हती. काळोखात अनोळखी ठिकाणी चालत जाऊन हॉटेल शोधून काढण्याचे, आणि खरे म्हटले तर, नंतर खाण्याचेदेखील त्राण माझ्यात नव्हते. दिवसभराच्या धावपळीमुळे आणि मनावर ताण पडल्यामुळे, मी अतिशय दमून गेलो होतो. अंथरायपांघरायला जवळ फारसे काही नव्हते. शिवाय हातून गुन्हा घडला असताना मनाला टोचणी लागून राहते. त्यामुळे माणूस झोपेला पारखा होतो म्हणे! त्यातून जागा अनोळखी, घर जुनाट आणि सोबतीला कोणी नाही! पण एवढे सगळे असूनही मी जमिनीला अंग टेकल्याबरोबर मेल्यासारखा गाढ झोपलो.

खिडकीतून उन्हे अंगावर आली, तेव्हा मी अचानक डोळे उघडले. काही वेळ मला, आपण कुठे आहोत, याचाही बोध होईना. मग हळूहळू सारे आठवू लागले. तरीही आठवत होते त्यातले खरे काय, खोटे काय, काही लक्षात येत नव्हते. आदल्या दिवशी घडलेल्या घटना म्हणजे एक भयंकर स्वप्न वाटत होते.

पण विचार करताकरता ध्यानात येऊ लागले की, ते भयंकर असले तरी स्वप्न नव्हते. आमच्या फर्मचे दोन लाख रुपये घेऊन मी खरोखरच फरारी झालो होतो आणि स्वत:च्या हाताने माझ्या पूर्वायुष्याला मूठमाती दिली होती. आज सगळ्या वर्तमानपत्रामध्ये ही बातमी ठळक अक्षरात प्रसिद्ध झाली असेल. पोलीस माझ्या शोधात असतील!

मोठ्या प्रयासाने मी मनातून हे विचार काढून टाकले. आता कच खाऊन चालण्यासारखे नव्हते. मागे वळून पाहणे माझ्या हातात राहिलेले नव्हते. आता धीराने वागणे जरूर होते. काहीच न झाल्यासारखे.

रात्री काहीच न खाता झोपल्यामुळे आता सडकून भूक लागली होती. मी बाहेर पडलो. फाटकातून बाहेर आल्यानंतर डावीकडे वळलो आणि सरळ नाकासमोर चालत राहिलो. थोडे चालल्यानंतर एक मरतुकडे हॉटेल लागले. मी सरळ आत गेलो, आणि बाकावर बसलो.

समोरच एक माणूस पेपर वाचत बसला होता. त्याचा चेहरा पेपराने झाकून गेला होता. फक्त चेहऱ्याची एक कडा दिसत होती आणि एक डोळाच काय तो अर्धामुर्धा दिसत होता.

मी चहा सांगितला. तो आला.

राहून राहून मला भास होत होता की, वर्तमानपत्राआडून दिसणारा तो एक डोळा माझ्याकडे रोखून पाहत आहे...

खाणेपिणे आटोपून मी त्या हॉटेलातून बाहेर पडलो. बिल देताना, पायऱ्या उतरताना, सारखा एकच भास होत होता - पाठीमागून कुणीतरी आपल्याकडे नजर लावलेली आहे - कुणीतरी रोखून पाहत आहे...

त्या भासाने मला बेचैन करून सोडले...

मी घरी परतलो. बॅग उघडली. नोटा जागेवर असल्याची परत एकदा खात्री करून घेतली. मनाची बेचैनी कमी होण्याऐवजी वाढत होती. बाहेर ऊन चढू लागले होते. मी जमिनीवर पसरलो. आकाशाचा एक निळा तुकडा पडल्यापडल्या डोळ्यांसमोर दिसत होता. ऊन डोळे जाळीत होते. दमवून टाकणारे विचार डोक्यात थैमान घालीत होते. विचारांच्या तंद्रीत पडल्यापडल्या, कधी डोळा लागला, हे माझे मलाच कळले नाही.

मी एकाएकी जागा झालो, तो कुणाच्या तरी रडण्याच्या आवाजाने. कुणीतरी ओक्साबोक्शी, अगदी हुंदके देऊन देऊन रडत होते. आयुष्यातले अगदी एकच समाधान असावे. आणि तेदेखील लुटले जावे, अशा दु:खाने ऊर फुटून कुणीतरी रडत होते.

मी कान देऊन ऐकत राहिलो. आता आणखी एक गोष्ट माझ्या ध्यानात आली. जे कुणी रडत होते, त्याचा आवाज फार विचित्र होता. इतका विचित्र की, तो धड मानवीदेखील वाटत नव्हता.

या कल्पनेने माझ्या अंगावर सरसरून काटा आला. या भर दुपारच्या वेळेस असे ऊर फोडून अमानुष स्वरात कोण रडत असेल? भुताखेतांविषयी मी आजवर पुष्कळ ऐकले होते. परंतु माझा त्यावर विश्वास नाही, असे मी म्हणत असे. कारण मला आजवर प्रत्यक्ष अनुभव नव्हता. पण आता वाटू लागले की, काल तशा अपरात्री हे आडबाजूचे घर घेताना, मी या संबंधात थोडा तरी विचार करायला हवा होता...

रडण्याचा आवाज क्षणोक्षणी वाढत होता. वातावरणात मिसळून जात होता. रात्रीच्या वेळी झाडांमधून रातकिडे 'किर्रर्र' असा आवाज करू लागल्यानंतर जसे त्या आवाजाचेच एक वातावरण बनते, तसे ते रडणे सारा आसमंत व्यापून राहिले. मी उठून खिडकीत उभा राहिलो. आवाजाच्या दिशेने पाहू लागलो.

पण त्या रडण्याचे उगमस्थान लक्षात आले, तेव्हा माझ्या आश्चर्याला पारावार राहिला नाही.

अंगणात ते उंच विचित्र झाड उभे होते. एखाद्या जुन्या-पुराण्या थकल्या-भागल्या वृद्धासारखे... आणि त्याच्या फांद्यांमधून ते रडणे ऐकू येत होते.

होय - ते झाड रडत होते. ओक्साबोक्शी रडत होते. उरी फुटून रडत होते. झाड रडत होते, असेच म्हटले पाहिजे. कारण तो नुसता त्याच्या पानांच्या सळसळीचा किंवा फांद्या एकमेकींवर घासल्याचा आवाज होता म्हणावे, तर तो आत्ताच कां ऐकू यावा? कालपासून एकदाही कां ऐकू येऊ नये? ते रडणे ऐकता ऐकता माझ्या अंगावर काटा उभा राहिला. कसले तरी अभद्र विचार मनात जमा झाले. वाटले, की हे रडणे माझ्यासाठी आहे. मी केलेल्या पापासाठी ते रडते आहे... आणि तरीही ते रडणे मला प्रत्यक्ष ऐकू येत आहे...

या जाणिवेने बेभान होऊन मी कितीतरी वेळ खिडकीत उभा होतो. माझ्यासमोरच ते झाड रडत होते; आणि एका अर्थी माझ्या पाठीमागे रडत होते. मग मी कुठे होतो? माझी जणू स्थळकाळाची शुद्ध नाहीशी झाली होती...

हुंदके देत देत ते झाड रडायचे थांबले. इतका वेळ त्या आकांताने दुमदुमणारे वातावरण आता शांत झाले.

पण माझ्या मनाची शांती मात्र पार ढासळली होती. काय करून बसलो होतो मी? माझ्यासाठी जगाने रडावे, असे काहीतरी -

काल रात्री जमा केलेला माझा धीर आता हळूहळू ओसरू लागला.

दुसऱ्या दिवशी मी त्याच हॉटेलात जेवायला गेलो.

आजही तो कालचा माणूस तिथे होता. तो पेपरवाला.

दुकानात वर्दळ फारशी नव्हती. फक्त तो आणि मी! बाकी सारे सुनेसुने होते.

मला ती शांतता असह्य झाली. मी त्याच्याजवळ सरकलो आणि बोलू लागलो. त्याची माझ्यावर रोखलेली नजर कायम होती. त्याला जणू बोलण्याची फारशी गरजच नसावी. गरज मलाच होती. माझ्या डोक्यात उठणाऱ्या असंख्य विचारांचा कोलाहल दडपून टाकण्यासाठी मला शब्दांचा नाद हवा होता. तो मधुनमधून

तुटकतुटक बोलत होता. त्यात नवीन काहीच सांगण्यासारखे नव्हते. आपण आपल्याच प्रांतोबेंबाशी बोलल्यासारखे मला वाटत होते.

मी त्याला माझ्या राहत्या घराविषयी सांगितले. विचारले, ''तिकडे काही तसा प्रकार -? म्हणजे भुताटकी वगैरे -''

''भूत? तुम्हाला भूत दिसेल याची भीती वाटते -'' नजर रोखून तो तऱ्हेवाईकपणे म्हणाला, ''मग भविष्य दिसेल याची कां नाही भीती वाटत?''

''भविष्य? ते कसं दिसेल?''

''जसं भूत दिसतं, तसंच. ध्यानात घ्या - तुम्ही मधे उभे आहात.'' बोटे नाचवीत तो सांगू लागला. ''एका बाजूला भूत आहे - ते तुम्हाला कधीतरी दिसू शकतं - भेडसावू शकतं. तसंच, अगदी तसंच दुसऱ्या बाजूला भविष्य आहे! आणि लक्षात ठेवा - भविष्यदेखील फारफार भीतीदायक असू शकतं. फार फार भयंकर! भविष्यकाळाला घाबरून राहा! भविष्याला घाबरून राहा!''

मी तिथून ताबडतोब काढता पाया घेतला. तो विचित्र माणूस जे बोलला त्यातले सगळेच मला समजले नाही. तरीही त्याला उलट उत्तर देण्याची किंवा काही विचारण्याची माझी छाती झाली नाही. मनातल्या मनात मी फार घाबरून गेलो होतो. मग मला नेमकी कशाची भीती वाटत होती, कुणास ठाऊक!

मध्यरात्री मी जागा झालो, तो एका विचित्र आवाजाने. कुणाला तरी धाप लागल्यासारखा, अडकलेल्या श्वासोच्छ्वासासारखा तो आवाज होता. जवळच कुणीतरी होते खास! आणि जे कुणी होते ते गुदमरून गेले होते! माझ्या अंगाला दरदरून घाम सुटला. मी कसाबसा उठून उभा राहिलो. पण पायातून वारे गेल्यासारखे पाय हलके झाले होते. आता माझी झोप पूर्णपणे उडाली होती आणि तरीही तो श्वासोच्छ्वास चालूच होता. म्हणजे मला स्वप्नही पडले नव्हते, की भासही होत नव्हता.

मी कसाबसा दिव्याच्या बटनापर्यंत पोचलो.

आता नजरेला काय पडेल ते पाहण्याची तयारी ठेवायची, अशी मनाची समजूत घालीत मी दिवा लावला.

खोलीत दुसरे कोणीही नव्हते.

आणि श्वासोच्छ्वास तर अजूनही ऐकू येत होता. अधिकाधिक दबलेला, अडलेला. एकाएकी एक आंचका ऐकू आला.

तो ऐकून मी खिडकीकडे धाव घेतली.

आणि माझ्या नजरेला जे पडले, त्याने माझी शुद्ध हरपण्याची वेळ आली.

बाहेर स्वच्छ चांदणे पडले होते. त्या चांदण्यात ते लंबूटांगे झाड उजळून निघाले होते, आणि त्याच्या फांदीला टांगलेल्या फासाला एक माणूस लोंबकळत होता! मी ऐकलेला स्वर हा त्याने दिलेला बहुधा शेवटचा आंचका असावा.

क्षणभर मी जागच्या जागी गोठून गेलो. काय करावे ते मला सुचेना. मग डोके एकदम काम करू लागले. मी पळतच मागील दारी गेलो. खोपटाच्या दारावर खटखट आवाज केला. झोपलेल्या माळ्याला उठवले. मला दिसलेल्या प्रकाराविषयी कसेबसे सांगितले. त्याला ते नीटसे कळले की नाही, कुणास ठाऊक! पण माझ्या भेदरलेल्या अवताराचा त्याच्यावर परिणाम झाला असावा. त्याने कंदील लावला व तो माझ्याबरोबर निघाला.

आम्ही दोघे धावत पळतच त्या झाडाशी येऊन पोचलो. मी बोट दाखवले. माळ्याने पाहिले. पुन्हा गोंधळून माझ्याकडे पाहिले. तशी मीदेखील वर पाहिले. डोळे ताणताणून पाहिले.

पण मघाच्या प्रकाराचा मागमूसदेखील आता तिथे नव्हता.

स्वत:शीच काहीतरी पुटपुटत माळी कंदील घेऊन परत गेला. मीदेखील जिना चढून वर गेलो. झाल्या गोष्टीवर माझा विश्वासच बसत नव्हता. झाडाला लोंबकळणाऱ्या त्या प्रेताच्या दर्शनाने माझ्या अंगावर आलेला काटा अजून कायम होता आणि ते प्रेत मात्र तिथून नाहीसे झाले होते! ती एका बाजूला कलंडलेली मान, ते गळलेले हात, फासाची ती गाठ आणि ते तारवटलेले डोळे - डोळे... एकदम मला जाणवले की मी या माणसाला कुठेतरी पाहिलेले आहे... कोण होता तो? कोण होता?

त्या रात्री मी झोपू शकलो नाही.

सकाळ झाली तरी पडल्या जागेवरून मी उठू शकलो नाही. माझ्या हातापायांतली शक्तीच जशी कुणी खेचून घेतली होती. अंगाला कापरे भरले होते. एक नाव नसलेली भीती माझा पाठपुरावा करीत होती.

कसाबसा उठलो आणि मी माझी बॅग उघडली. आत दोन लाखांच्या नोटांची बंडले होती. अजूनही सुरक्षित होती. मी ती बॅग उचलली, छातीशी धरली. मला आधार मिळाल्यासारखे वाटले. माझे भविष्य या

बॅगमध्ये होते. माझी भीती थोडी कमी झाली.

दिवसभरात मी काही बेत रचून ठेवला. मी ते पैसे जमिनीत पुरून ठेवणार होतो. समजा, पोलिसांनी मला पकडले, तरी ते पैसे त्यांच्या हातात पडायला नको होते. पैसे आता माझे होते आणि ते दुसऱ्या कुणालाच मिळणार नव्हते. या विचारासरशी मी मागील दारी गेलो. तिथे पुष्कळसे जुने सामान पडले होते. त्यात एक कुदळ होती. बरीच गंजली होती. पण माझ्या कामाला चालण्याजोगी होती. मी समाधानाने हसलो. गेल्या चार दिवसांत प्रथमच हसलो.

- आणि याच वेळी तो रडण्याचा स्वर माझ्या कानावर पडला. प्रथम हलकेहलके... अगदी दुरून आल्यासारखा... आणि मग वाढत जाणारा. चढता, उंच स्वर, हमसून हमसून रडल्याचा. मी झाडापाशी आलो. ते गदगदा हलत होते आणि स्फुंदून स्फुंदून रडत होते.

माझ्या चेहऱ्यावरचे हसू कधीच मावळले होते. त्याची जागा पुन्हा भीतीने घेतली होती. कां हे सारे मी ओढवून घेतले स्वत:वर? सरळ नोकरी करीत राहिलो असतो - निदान मन तरी साफ राहिले असते. कुणाची भीती नसती मनाला.

अर्धी रात्र झाली. मी बॅग घेतली. कुदळ घेतली. पैसे एका कापडी पिशवीत भरले, आणि झाडापाशी गेलो. कां कोण जाणे, मला त्या झाडाची बिलकूल भीती वाटत नव्हती. वाटत होते की, त्या झाडाला काहीतरी सांगायचे आहे, सुचवायचे आहे. भीती वाटत होती ती, ते जे काही सांगू पाहत होते, त्याची. झाडाची नव्हे. झाडाविषयी तर मला एक प्रकारचे सूक्ष्म आकर्षणच वाटू लागले होते.

मी झाडापाशी गेलो. कुदळीने हळूहळू खणू लागलो. मधेमधे थांबत. आजुबाजूची चाहूल घेत. पण सारे शांत होते. माझ्या या साहसाचा पत्ता कुणाला लागलेला दिसत नव्हता.

सारी जमीन चांदण्यात न्हाऊन निघाली होती. फक्त झाडाची सावली तेवढी एखाद्या गढूळ पाण्याच्या डबक्यासारखी मधेच साचून राहिली होती.

मी पुरेसे खोलवर खणले. आणि इतक्यात - इतक्यात एक कापडी पिशवी माझ्या हाताला लागली. कुणीतरी ती जमिनीत पुरून ठेवली असावी.

मी भोवताली खणले आणि ती पिशवी बाहेर काढली आणि त्यात जे दिसले ते पाहून मला आश्चर्याने वेड लागायची वेळ आली...

त्या पिशवीत शंभरशंभराच्या नोटांची असंख्य पुडकी भरलेली होती. जवळ जवळ माझ्याकडे होती, तितकीच...

मी त्या नोटांना हातदेखील लावला नाही. त्या जशाच्या तशा परत ठेवून दिल्या. माझ्याजवळची कागदी पिशवीदेखील तिथेच ठेवली. वर परत माती घालून सगळे साफ करून ठेवले; कुणाला पत्तादेखील लागणार नाही, असे.

सगळे सोपस्कार आटपून मी जायला निघालो. सहज वरती लक्ष गेले -

तो! तो तिथे होता! झाडाला टांगलेला. माझ्यापासून फक्त आठ-दहा फूट अंतरावर - मान एका बाजूला कलंडलेली - जीभ बाहेर आलेली - डोळे वटारलेले! मान फासात अडकलेली, आणि देह जमिनीपासून चौदा-पंधरा फुटांवर लोंबकळत असलेला!

मी जीव घेऊन पळत सुटलो. वर येऊन जमिनीवर अंग टाकले, तरी माझ्या छातीतली धडधड थांबली नव्हती.

सकाळ होईपर्यंत माझा जीव अधिकच हल्लक झाला होता. एकसारखे वाटत होते, कुणी आपल्याकडे पाहत आहे, कुणी आपल्याकडे बोट दाखवीत आहे. पैसे तर मी जमिनीत लपवलेच होते, पण तरीदेखील मनाला सुरक्षितता वाटेना.

तो सबंध दिवस मी बाहेरच पडलो नाही. पण घरात राहूनही भीती कमी होत नव्हती. सुरक्षित वाटत नव्हते. वाटायचे, आपल्यावर कुणीतरी पाळत ठेवली आहे. ते पाळत ठेवणारे समोरच आहे आणि त्याच्याच नजरकैदेत आपण आहोत...

दुसऱ्या दिवशी नाइलाजाने जेवायला जावेच लागले. पण मी माझी नेहमीची वेळ बदलून जेवायला गेलो. मला कुणाला टाळायचे होते, कुणास ठाऊक! पण कुणाचा भरंवसा वाटत नव्हता, एवढे मात्र खरे!

आणि तरीही तो तिथे होताच! तो पेपरवाला माणूस! पण आज तो माझ्याशी बोललादेखील नाही. दारात पाऊल टाकताच त्याने एकदा माझ्याकडे रोखून पाहिले, आणि तो समोरच्या माणसाशी काहीतरी कुजबुजू लागला...

आणि बापरे! त्याच्या समोरच्या माणसाकडे पाहिले, आणि मला धसकाच बसला.

तो पोलीस इन्स्पेक्टर होता! त्याच्याशेजारी पोलीस कॉन्स्टेबल बसला होता...

त्या पेपरवाल्याने पुन्हा एकदा माझ्याकडे पाहिले, आणि तो त्यांच्याशी बोलू लागला, हलक्या आवाजात.

मग मात्र मला तिथे बसवेना. एव्हाना मी मागवलेले ताट आले होते. परंतु मी त्याला बोटदेखील लावले नाही. मी जागचा उठलो आणि तसाच हॉटेलच्या बाहेर पडलो. अशा वागण्याने माझ्याकडे लोकांचे अधिकच लक्ष जाईल, इतका साधा विचारदेखील मला सुचला नाही.

मी एका तंद्रीत होतो, गुंगीत होतो. पाठीमागे वळून पाहण्याचा धीरदेखील मला होत नव्हता. पोलीस गावात आले होते. माझ्यासाठी - नक्की माझ्यासाठीच -

आजवर मनात जमून आलेल्या भीतीचे जणू अक्राळविक्राळ चक्रीवादळ उठले. त्या वावटळीने मला घेरून टाकले. पोलीस - दोन लाख रुपये - फरारी - बेअब्रू... कुजबुजणारे लोक, बोटे दाखविणारे लोक, हसणारे लोक! फक्त हसणारे! माझ्यासाठी रडणारे कुणी नाही! - नाही कसे? एक आहे! ते झाड! ते झाड माझ्यासाठी रडेल!

ते झाडच मला आसरा देईल!

मनासमोर एक चित्र आकार घेऊ लागले! लोंबकळणारी मान - फासाची दोरी! तारवटलेले डोळे - सुटका! आरोपातून, संशयातून, क्षणाक्षणाला जीव कुरतडणाऱ्या या भीतीपासून - सुटका!

ते झाडच मला आसरा -

सुटका - भीतीपासून -

ते झाडच मला -

मी मागील दारी पडलेल्या अडगळीतून एक दोरी शोधून काढली.

झाडावर चढलो - झाडाला फास नीट बांधला -

दोरी मानेभोवती आवळली -

झाडाचा आधार सोडला - श्वास गुदमरू लागला -

- आणि त्या भयंकर क्षणी मला एकदम एक उलगडा झाला -

रात्रीच्या वेळी झाडाला टांगलेले ते प्रेत - त्याचे ते डोळे - ते मला ओळखीचे वाटले होते.

- ते डोळे माझेच होते. तो देह माझाच होता - झाडाखाली पुरलेले ते पैसे माझेच होते!

आणि मला इथे आणून सोडणारा तो गाडीवान - तो कंदिलवाला - तो पेपरवाला - सारेसारे खरोखरच मला दिसले होते तसे होते का? की मीच स्वत:ला घाबरवत होतो? स्वत:च्याच सावल्यांना भूत समजत होतो?

भूत? की त्याइतकेच भीषण भविष्य?

त्या भयानक क्षणी या साऱ्याचा उलगडा होतोय् न होतोय् असे मला वाटले -

दुसऱ्याच क्षणी माझा प्राण गेला.

■

सूर्यास्ताच्या शेवटच्या क्षणी

१

झाडे उंच वाढलेली. रुंद, भारदस्त, वयस्क. शेजारीशेजारी उभी राहून एकमेकांशी लगट करणारी. जबरदस्ती करणारी. निर्ढावलेली.

गडद पानांची. एकमेकांत मिसळून गेलेली. चिमण्या पानांच्या झाडांवर चढलेल्या अजस्र पानांच्या वेली. मधे सूर्यप्रकाश झिरपेल एवढीच फट.

प्रकाशदेखील मावळता. किरमिजी. क्षणापूर्वीच सूर्य मावळला. दूरवरच्या ध्यानस्थ परक्या गूढ डोंगरामागे. मागे उरला किरमिजी प्रकाश. एखाद्या दबलेल्या हुंदक्यासारखा. म्हणजे त्यानंतर कधीही काळोख कोसळेल.

सूर्यास्तानंतर पसरणाऱ्या त्या काळोखाचे भान कड्याच्या टोकाशी उभ्या असलेल्या त्या प्रणयी युगुलाला मात्र नसावे. ते अजूनही मगन्, सूर्यास्ताच्या सोनेरी आठवणीत. संपलेल्या सायंकाळच्या मस्त धुंदीत. ती धुंदी अजूनही पसरलेली त्यांच्या अंगभर. ती उतरेल तेव्हा जाणीव होणार सूर्यास्ताची. पण हा क्षण मात्र अंधाराचा नव्हे - मावळत्या सूर्याचा. विझणाऱ्या शीतल तेजाचा.

हे सारे तो पाहत आहे. झाडांच्या आडून.

पाहतापाहताच त्याला ते जाणवते आहे. तोही जणू त्या युगुलातच मिसळून गेला आहे. स्वत:चे भान हरपून बसला आहे.

तरीही त्याच्यात आणि त्या युगुलामधे झाडे उभी आहेत. गर्द, भक्कम, मजबूत, सुदृढ झाडे.

तो सूर्यास्ताकडे पाहत होता. त्यांच्याकडे पाहत होता. त्यांच्या नजरेतून सूर्यास्ताकडे पाहत होता. त्यांच्यातून सूर्यास्त पाहतापाहता स्वत:ला आठवणींचे अर्घ्य देत होता.

- पण जागचा न हलता. जणू पाय टाकला, तर ती प्रणयपक्ष्यांची जोडी उडून जाईल. अवकाशावर उमटलेले ते सुंदर चित्र तरंग उठून त्यात विरून जाईल...

आपल्या विरत चाललेल्या केसांमधून तो हात फिरवतो. अस्वस्थ होत जातो. त्याला काहीतरी आठवू लागते.

असाच सुंदर क्षण... सूर्यास्त पाहत उभी असलेली आपण दोघे... तिच्या सुंदर चेहऱ्याला उजळून टाकणारा सोनेरी संधिप्रकाश... तो क्षण गेला... आणि सूर्यास्त झाला - अंधार पडला - ती त्या अंधारात कायमची विरून गेली - आपण एकटे पडलो - अंधारात चाचपडत राहिलो... तिच्यासाठी... अजूनही - आठवण आली की नंतर चष्मा पुसून घ्यावा लागतो - ती गेली - पण तिच्याबरोबर पाहिलेला तो सूर्यास्त... आपल्या मिठीत ती असतानाच डोळ्यांत परावर्तित झालेली सूर्यकिरणांची चमक -

- समोरचे युगुल आता एकमेकांच्या मिठीत होते. बाकी काहीही नजरेस पडत नव्हते. झाडात राहिलेल्या फटीमधून केवळ तेच एक सुंदर चित्र त्याला दिसत राहिले. त्या चित्राला पर्णसंभाराची गर्द चौकट होती...

- आणि अचानक...

झाडांमधून एक टिटवी कर्कश ओरडत गेली आणि समोरचे चित्र पालटले...

तो डोळ्यांत प्राण आणून पाहू लागला.

समोर एक भयंकर प्रकार घडत होता.

त्या युगुलातील तरुणाने समोरच्या तरुणीचे दोन्ही दंड गच्च धरले आणि सारी शक्ती एकवटून तिला कड्यावरून खाली ढकलून दिले. कसलाही प्रतिकार करायला तिला अवकाश मिळाला नाही. क्षणार्धात ती दिसेनाशी झाली.

फक्त तिची शेवटची किंकाळी वातावरणात घुमली. मग सारे शांत झाले.

तरुणाने एकदा आजुबाजूला पाहिले. कुणी पाहत आहे का, याची खात्री करण्यासाठी. त्याच्या नजरेला कुणीच पडले नाही. जंगल निर्मनुष्य होते. तो झपाझप चालू लागला.

२

मध्यमवयीन गृहस्थाने कपाळावरचा घाम पुसला. समोर दिसलेला प्रकार भयंकर होता. त्याच्या डोळ्यांसमोर बघता बघता एक खून पडला होता.

पण त्याने त्या तरुणाला पकडण्याची घाई केली नाही. तो कुठे पळून थोडाच जाणार? येऊन जाऊन तो कुठे परतणार, तर हॉटेलातच. कालपासूनच ती दोघे आपण उतरलोय त्या हॉटेलात उतरली आहेत. आज ब्रेकफास्टच्या वेळेस, जेवताना, पाहिलेच की त्या दोघांना आपण - मुलगी मोठी स्मार्ट होती. हसताना तिच्या गालांना खळ्यासुद्धा पडायच्या! आणि कसे कोण जाणे, तिच्या चेहऱ्यात आणि आपल्या गेलेल्या पत्नीच्या चेहऱ्यात काहीतरी साम्य होते. डोळे-भुवया-नजर? लक्षात येणे कठीण! पण साम्य होते खास! एकूण मुलगी देखणी होती, तरुण होती... आणि तिला हा असा अचानक मृत्यू यावा? निर्दय - राक्षस असला पाहिजे तो तरुण - बायकोचा खून करण्याइतका दुष्ट - नाहीतर काही काही जण - बायको म्हणजे त्यांचे सर्वस्व असते - जन्मभर कधी ते आपल्या बायकोला विसरू शकत नाहीत - आपणच पाहा ना - दहा वर्षे होतील ती गेल्याला - पण अजूनही - क्षणाक्षणाला तिची आठवण येते -

गृहस्थ थोडा वेळ कड्याच्या टोकाशी जाऊन उभा राहिला. आता झपाट्याने काळोख पडत होता. त्या झपाटणाऱ्या मंद प्रकाशात खालची दरी पाहता-पाहता त्याच्या अंगावर शहारे आले. खालचे दगड, झाडेझुडपे, सारे कसे छोट्या ठिपक्याएवढे दिसत होते. वरून पडलेल्या माणसाच्या, खाली पोहोचताक्षणी चिंधड्या होतील, यात शंका नव्हती. एखादे माणूस तोल जाऊन खाली पडते तर ते त्याचे दुर्दैवच, परंतु आपणहून एखाद्याला तशी कपाळमोक्षाची सजा देणे, यासारखे दुसरे क्रौर्य नव्हते...

या क्रौर्याला शिक्षा झालीच पाहिजे -

तो तरुण असा हातचा सुटणार नाही - कधीच नाही...

त्याचे ते बेदरकार हास्य, कपाळावर पुन्हापुन्हा येणारी एक बट, घारे डोळे - कुठे बरे पाहिले आपण त्याला? कुठे का असेना, या घटकेला आपल्याला त्या गोष्टीशी कर्तव्य नाही.

आत्ता तरी तो केवळ एक नीच खुनी म्हणूनच आपल्यासमोर उभा आहे -

आणि त्याला शिक्षा ही झालीच पाहिजे -

आत्ताच - तो हॉटेलवरून आपले सामान गोळा करून पळून जाण्यापूर्वी...

गृहस्थाने सारा धीर गोळा केला. त्या मरणाच्या दरवाजातून तो परत निघाला. आपले स्थूल शरीर सावरीत शक्य तेवढ्या वेगाने चालू लागला...

पाच मिनिटांत जंगल मागे पडले. भल्याबुऱ्या घटनांचे मुके साक्षीदार असलेली ती झाडे तशीच उभी राहिली. पाठीमागे पडली.

थोडे चालल्यावर एक पेट्रोल पंप लागला.

एक म्हातारा पारशी पंपावर होता. तिथून फोन करण्यासाठी गृहस्थाने त्याची परवानगी विचारली. पोलीस स्टेशनचा नंबरही त्याला विचारला.

''हलो - आय् हॅव टू रिपोर्ट अ मर्डर - एका माणसानं कड्यावरून ढकलून एका बाईचा खून केलाय - मर्डरर, तुम्हाला सहज मिळेल. ही हॅज रिटर्नड टू द होटेल - तुम्ही ताबडतोब या - पण एक सावधगिरी घ्या - चेकनाक्यावर सांगून ठेवा. कुणालाही गावाबाहेर पडू देऊ नका, आणि तुम्ही होटेलवर या. बहुधा तो एवढ्यात पळून जाणार नाही. नाही - आपल्याला कुणी पाहिलं असेल याची त्याला अजिबात कल्पना नाही -''

फोन खाली ठेवून त्याने कपाळावरचा घाम पुसला आणि तो होटेलच्या दिशेने झपझप निघाला...

३

होटेलला पोलिसांचा वेढा पडला.

मालक घाबरून गेला.

अजून चौकशीला सुरुवात झाली नव्हती. पोलीस सुपरिटेंडेंट त्याचीच वाट पाहत होटेलच्या अंगणात उभे होते.

अंदाजानेच त्याला ओळखून ते पुढे झाले - ''तुम्ही आत्ता फोन केलात?''

"हो," तो ठामपणे म्हणाला - "ते माझं कर्तव्यच होतं. डोळ्यांसमोर खून झालेला - अ कोल्ड - ब्लडेड मर्डर! भयानक - सिम्पली हॉरिबल!"

तो होटेलचा जिना चढू लागला होता. पोलीस त्याच्या मागोमागच होते.

होटेलची इमारत अवघी एक मजली होती. खोल्यादेखील फारशा नव्हत्या.

मंडळी जिना चढून गेली न गेली, एवढ्यात तो तरुणच समोरून आला. जिन्याच्या दिशेने जाऊ लागला. वाटेत आलेल्या पोलिसांकडे पाहिले न पाहिलेसे करून!

गृहस्थ ओरडला - "थांबा!"

तरुण थांबला. डाव्या हाताने कपाळावरची बट बेदरकारपणे मागे सारीत.

"ही इज द मॅन!" गृहस्थाने पोलीस सुपरिटेंडेंटना सांगितले.

पोलीस सुपरिटेंडेंटने त्याचा दंड धरला. तरुणाच्या चेहऱ्यावरचे स्मित मावळले. तो भेदरला.

"काय प्रकार आहे हा?"

"तुमच्यावर आरोप आहे. खुनाचा."

"खून? कुणाचा खून?" तरुणाचा आवाज कातर झालेला.

"अच्छा -! म्हणजे तुम्हाला खून कबूल नाही!" गृहस्थ दबलेल्या वरकरणी शांत आवाजात बोलू लागला, "ऐकायचंय तुम्हाला खून कधी केलात ते? मघा. संध्याकाळी, कड्याच्या टोकावरून. सूर्यास्ताच्या शेवटच्या क्षणी - तुम्ही तुमच्या बायकोला खाली ढकलून दिलंत कड्यावरून. हे तुम्हाला मान्य नाही?"

"नाही, मुळीच नाही. हा शुद्ध वेडेपणा आहे!" तरुण ओरडला.

"नाकबूल करण्यात काही अर्थ नाही." पोलीस सुपरिटेंडेंट अधिकारी स्वरात म्हणाले, "ते कृत्य करताना यांनी तुम्हाला पाहिलंय!"

बोलत बोलत ते सगळे तरुणाच्या खोलीवर पोहोचले. घाबराघुबरा झालेला मॅनेजरदेखील त्यांच्यामागे हजर होताच.

"मी माझ्या बायकोचा खून केला, असं यांनी तुम्हाला सांगितलं?" तरुण म्हणाला, "तर मग ती पाहा - ती तिथं बसलीय ती माझी बायको -!" त्याने रोखलेल्या बोटाच्या दिशेला सर्वांनी पाहिले. त्याची बायको तिथे बसलेली होती.

तिने वळून पाहिले, दरवाजात मंडळी जमा झालेली पाहून ती चपापली.

पोलीस सुपरिटेंडेंटची मुद्रा प्रश्नार्थक झाली.

"काय हो? हीच होती ना? - की दुसरी कोणी?" त्याने विचारले.

पण गृहस्थ काहीच बोलू शकत नव्हता. त्याची जणू वाचाच गेल्यासारखी झाली होती.

समोर बसलेली बाई तीच होती. ब्रेकफास्टच्या वेळेस, जेवणाच्या वेळेस दिसलेली. नुसती तेव्हाच नाही - तर संध्याकाळीदेखील त्याच्याबरोबर असलेली. त्याच खळ्या, तेच डोळे - सूर्यास्त पाहताना तीच होती - हो - अजून तीच साडी तिच्या अंगावर आहे. तीच ती - सूर्यास्त होताच त्याच्या मिठीत शिरलेली आणि त्याने दंड धरून -

मग ती - ती कोण? कड्यावरून ढकलून दिलेली -

वातावरणात घुमलेली ती आर्त किंकाळी कुणाची होती?

गृहस्थ चक्रावून गेला. त्याला काही समजेनासे झाले. समोरच्या आकृती अंधुक अंधुक होऊ लागल्या. फक्त त्या तरुणाचे ते स्मित - गव्याभोवतीचा रुमाल - तेवढेच स्पष्ट झाले - पुन्हा सारे अंधुक...

तरुणाचे स्मित रुंदावले -

गृहस्थाला काही समजत नव्हते. काही ऐकू येत नव्हते.

दोन्ही हातांनी डोके गच्च धरून तो आपल्या खोलीकडे निघाला. ढकलल्यासारखा.

बाहेर मॅनेजर पोलिसांची समजूत काढत होते.

"डोन्ट पे एनी अटेन्शन टू हिम. मधुनमधून असेच करतात. चक्करल्यासारखे. त्यांची वाईफ गेल्यापासून डोकं थोडं - म्हणजे तसे ठीक आहेत, पण कधीकधी - फार प्रेम होतं म्हणे त्यांचं आपल्या बायकोवर -"

तरुण खोलीत जातो. दाराची कडी लावून घेतो. पुन्हा बायकोला मिठीत घेतो. चुंबनांचा भडिमार करतो.

गृहस्थ आपल्या खोलीत तसाच पडलेला. काळोखात. समोर छोट्या फोटोफ्रेममधे एक हसरा फोटो - गालांना खळ्या, चमकणारे डोळे. काळोखात हे काही दिसत नाही. पण दिसायची गरजच नाही. गेली दहा वर्षे दररोज पाहून त्या फोटोतली रेषान् रेषा ओळखीची झाली आहे. मिटलेल्या डोळ्यांसमोरदेखील तो चेहरा

दिसतो. जसाच्या तसा.

आत्तासुद्धा काळोखात उघड्या डोळ्यांसमोर तो चेहरा आणून गृहस्थ हुंदका दिल्यासारखे पुटपुटत होता -

''व्हाय डिड यू हॅव टू लीव्ह मी? ...व्हाय डिड यू? ...व्हाय डिड यू?''

४

दुसऱ्या दिवशी.

तरुण सकाळपासूनच खूष होता. गेले कित्येक दिवस त्याला जो पेच पडला होता, त्यावर त्याला अचानक उपाय सापडला होता. त्या वेडपट गृहस्थानेच तो दाखवून दिला होता.

तसे म्हटले तर ती त्याची बायको नव्हती. त्याची कुणीच नव्हती. होती एक घटकाभराची गंमत. तसे तिने त्याला पुष्कळ सुख दिले होते. तरुण होती, देखणी होतीच; शिवाय प्रणयाच्या खेळातही तरबेज होती. जे सुख पुरुष घेणारच आहे, ते त्याच्यावर मुक्तपणे रंगून जाऊन कसे उधळायचे, हे ती जाणत होती. त्याचे आणि आपले, दोघांचेही सुख वाढवत होती.

तिच्या या कौशल्यावर तो खूष होता. पण तिला मात्र तेवढेच पुरेसे नव्हते. तिच्या मागण्या दिवसेंदिवस वाढत होत्या. तिला रीतसर लगन् हवे होते. घर हवे होते. मूल हवे होते, संसार हवा होता.

या साऱ्या गोष्टी त्याच्या आयुष्यातून कटाप होत्या. आयुष्याचे त्याचे चित्र फार वेधक, फार रंगीत आणि उसळत्या, फेसाळ बिअरच्या ग्लासासारखे उत्साही होते. मुले, संसार असल्या जबाबदाऱ्यांनी त्याला स्वत:चे पाय जखडून घ्यायचे नव्हते. आयुष्याच्या चित्राचे रंग विटू द्यायचे नव्हते. पण ते तिला समजत नव्हते. हजारदा सांगूनही पटत नव्हते. तशी ती थोडी मूर्खच होती. प्रणयाचे चातुर्य जसे काही तिच्यात अंगभूतच होते. परंतु यापलीकडे तिला विचारशक्ती फारशी नव्हती. एकेक गोष्ट अनेकवार सांगूनही तिच्या डोक्यात उतरत नसे. त्यातून स्वभाव मत्सरी. याने दुसऱ्या मुलीचे नुसते नाव घेण्याचा अवकाश, तिचे रुसवेफुगवे, अश्रू गाळणे, सुरू व्हायचे. हे तर त्याला मुळीच परवडणारे नव्हते. जगात इतकी मजेची ठिकाणे असताना एकाच जागी स्वत:ला बांधून घेण्याचे म्हातारे विचार त्याला कधीच पटले नसते. घरटे बांधून राहायला तो काऊचिऊ नव्हता - ते होते एक मोठे रंगीत फुलपाखरू! पण हे तिला समजत नव्हते. समजावण्याचे प्रयत्न व्यर्थ होते. आता तर ती लगनच्या घाईलाच आली होती. त्याने लगन् करावे, म्हणून त्याला धमक्यादेखील देऊ लागली होती. अर्थात् तो त्या धमक्यांना भीक घालणार नव्हता. तिच्या अश्रूंनी आपल्या चित्रातले रंग पुसले जाऊ देणार नव्हता.

तेव्हा आता तिच्याशी कायमचा संबंध तोडून टाकणे एवढा एकच मार्ग शिल्लक राहिला. पण ते तिला पटले नसते. ती चिवटपणे, लोचटपणे त्याच्यामागे फरफटत राहिलीच असती. नको तेव्हा मार्गात येत राहिली असती.

म्हणून जे काय करायचे ते तिच्या नकळत! पण काय करायचे?

खून?

खुनाची कल्पना त्याला आजवर सुचली नव्हती, असे नाही. पण तिच्यात धोका फार होता. स्वत: पकडले जाऊन मुळीच चालणार नव्हते. जे आयुष्य चैनीत, विलासात घालवायचे, त्याला एक टक्कादेखील धक्का लागता कामा नये. 'रिस्क' मुळीच नको. थंड डोक्याने उपाय शोधायला हवा. मग कितीही वेळ लागला तरी चालेल; पण करायचे ते अत्यंत सुलभतेने व्हायला हवे. अगदी पाण्याच्या धारेखाली धरल्यावर बोटावरचा डाग नाहीसा व्हावा, तितके सहज!

तिच्याबरोबर चैन करायला तो या हॉटेलात येऊन राहिला होता खरा; पण मनातूनच तो बेचैन होता. गदगदा हसत होता. शीळ घालीत होता. बेफिकीरपणाने केसांच्या बटा मागे सारीत होता. तिचा उपभोग घेत होता. पण मनात एकच विचार एकसारखा टिकटिकत होता - हिचे काय करायचे? हिचे काय करायचे?

आणि एकदम मार्ग सापडला. त्या चक्रम माणसाने खोटा आळ घेऊन तो दाखवून दिला.

मनावरचे एक मोठे ओझे उतरले.

तरुणाने शीळ घातली. गाणी गुणगुणली.

झक्क कपडे घातले. आवडता स्कार्फ गळ्याभोवती गुंडाळला.

सामानाची बांधाबांध दुपारीच झाली होती. सामान फारसे नव्हतेच.

होटेलचे बिल चुकते केले.

संध्याकाळची गाडी होती. त्याच्या मनातल्या हिशेबाने, रात्रीदेखील एक गाडी होती. एकट्यानेच जाण्यासाठी.

शेवटचा शृंगार करून त्यांनी खोली बंद केली.

दोघेही होटेलातून बाहेर पडली.

"सूर्यास्त पाहूया! शेवटचा सूर्यास्त इथला!" तो हसून म्हणाला.

दोघे रोजच्या सूर्यास्त पाहण्याच्या ठिकाणाशी आली. हातातील एकेक सूटकेस सांभाळीत.

अनिमिष नेत्रांनी दोघे सूर्यास्त पाहत राहिली.

सारे आकाश सोनेरी होऊन गेले.

सूर्याचा लाल किरमिजी गोल क्षितिजावरच्या स्तब्ध नितळ डोंगरामागे बुडू लागला.

ती त्याला बिलगली. सारे निर्मनुष्य होते.

मग त्यानेही वेळ वाया दवडला नाही. क्षणार्धात त्याने तिला मिठीत घेतले.

तिच्यावर शेवटच्या चुंबनांचा वर्षाव केला.

सूर्य अस्ताला गेला...

आणि सारी शक्ती एकवटून त्याने तिला कड्यावरून खाली ढकलून दिले.

प्रतिकार करायलाही तिला सवड मिळाली नाही.

फक्त तिची आर्त किंकाळी अवकाशात घुमली -

- आणि मग सारे शांत झाले.

आता काळोख पडू लागला होता.

त्याने आजुबाजूला पाहिले. मग दोन्ही सूटकेसेस उचलल्या आणि तो झपाट्याने चालू लागला.

एकाएकी त्याच्या अंगातून भीतीची लकेर उमटली.

तो पाहत होता... झाडांमधून.

तोच. केस विरू लागलेला, चष्मावाला मध्यम वयाचा. काल पोलिसांना घेऊन आलेला.

आजही तो इथे आला होता. कदाचित आपल्या पाळतीवर. कदाचित केवळ रोजच्या सवयीने.

तरुण क्षणभर थबकला.

दुसऱ्या क्षणी त्याचे भान परत आले.

तो हसला. म्हणाला - "काय? आज नाही ना झाला तो भास?"

गृहस्थ काहीच बोलला नाही.

तरुणाला अधिकच धीर आला.

"नाही - म्हणजे झाला असला, तर सांगतो की आज पुन्हा पोलिसांना कळवून स्वत:चं हसं करून घेऊ नका. कारण आज ती आधीच पुढं गेलीय. स्टेशनवर. तिकिटं काढायला. मी सामान घ्यायला मागं राहिलो..." हातातल्या सूटकेसेस वर उचलून दाखवीत तो म्हणाला.

तरीही गृहस्थ काहीच बोलला नाही.

तरुण पुन्हा एकदा हसला आणि निघाला. "बराय, ओळख ठेवा." जाता जाता पुन्हा एकदा मागे वळून तो म्हणाला - "आणि माझं मत विचाराल, तर तुम्ही एखाद्या चांगल्या डॉक्टरचा सल्ला घ्या. म्हणजे हे भासबिस कायमचे नाहीसे होतील -"

एवढे बोलून तो सूटकेसीस सावरीत झाडांमधून दिसेनासा झाला...

५

बऱ्याच वेळाने तो गृहस्थ चालू लागला.

त्याला स्वत:चे स्थूल शरीर जणू काही सावरत नव्हते.

शरीराचे ओझे झालेच होते. त्याहून जड ओझे होते ते जगण्याचे.

विलक्षण थकल्याप्रमाणे एकेक पाऊल उचलीत तो निघाला.

काळोखातून तो कसाबसा पेट्रोल पंपापाशी पोचला.

त्याने नि:शक्तपणे फोनची डायल फिरवली.

दबलेल्या, थकलेल्या सुरात तो फोनवर बोलू लागला-

"हलो, पोलीस स्टेशन का? मला एक मर्डर रिपोर्ट करायचा आहे. एका माणसानं आपल्या बायकोला कड्यावरून ढकलून तिचा खून केला - खरंच सांगतो - बिलीव्ह मी - मोटिव्ह-हो-मोटिव्हसुद्धा सांगतो. तिनं

त्याला फसवलं - एका खुशालचेंडू तरुणाबरोबर संबंध ठेवले - म्हणून त्याला खून करणं भाग पडलं तिचा - कारण त्यानं तिच्यावर जीवापाड प्रेम केलं - अजून करतोय - तुम्ही ऐकताय ना इन्स्पेक्टर - मला - मला एक मर्डर रिपोर्ट करायचाय - त्याशिवाय - त्याशिवाय माझी सुटकाच नाही यातून - या भासांमधून. मर्डर आजचा कालचा नाही, इन्स्पेक्टर - दहा वर्षांपूर्वीचा आहे - आणि मर्डरर - मर्डरर मीच आहे - मला अॅरेस्ट करा, इन्स्पेक्टर - मी माझ्या बायकोचा खून केला... तुम्ही मला अॅरेस्ट केल्याशिवाय हे भास थांबणार नाहीत - ही किंकाळी ऐकू यायची राहणार नाही - गेली दहा वर्षं ही किंकाळी माझ्या कानात घुमते आहे, इन्स्पेक्टर - गेली दहा वर्षं घुमते आहे...''

■

मला विक्रम दिसतो

एके दिवशी निर्मला माझ्या खोलीत घाबऱ्याघाबऱ्या आली, आणि म्हणाली, ‘‘तुम्हाला काही सांगायचंय!’’

वाचता वाचता माझी तंद्री भंग पावली. तरीही आवाजात चिडकटपणा शक्यतो येऊ न देता मी म्हणालो - ‘‘काय झालं?’’

‘‘केव्हापासून तुम्हाला सांगायचंय म्हणतेय, पण म्हटलं, बोलले, तर तुम्ही खुळ्यात काढाल!’’

‘‘सांगून टाक पाहू एकदा काय ते आता,’’ माझ्या स्वरात चीड डोकावलीच. ‘‘सुरुवातीपासून सगळं सांग!’’

‘‘आपल्या नितीनबद्दल आहे -’’

‘‘नितीन?’’ माझी निम्मी उत्सुकता संपली. नितीनच्या कागाळ्या दिवसातून चार वेळा माझ्यापाशी येत असत. मी तिकडे फारसे लक्ष देत नसे. सात-आठ वर्षांचा मुलगा तो. हे वयच मस्ती करण्याचे! त्याकडे थोडी डोळेझाकच करायला हवी. त्यातून बाप म्हणजे काही जेलर नव्हे!

पण निर्मला फारच घाबरलेली दिसत होती, त्या अर्थी प्रकार नेहमीपेक्षा अधिक गंभीर असावा.

‘‘त्या दिवशीची गोष्ट. नितीन आपल्या कंपाउंडबाहेर कुणाशी तरी बोलत होता. मला वरून फक्त नितीनच दिसत होता; पण त्याच्या हावभावावरून कळत होते की, तो कुणाला तरी आत बोलावतोय आणि त्याचा तो दोस्त काही आत यायला तयार नाही!’’

‘‘कोण होता तो?’’

‘‘मी त्या वेळी विचारलं नाही. नितीनला हाक मारली, आणि तो वर आल्यानंतर कामाच्या गडबडीत विचारायचंच विसरून गेले. पण दुसऱ्या दिवशी पुन्हा हाच प्रकार! माझ्या मनात आलं की, हा मुलगा फारच शिष्ट दिसतो आहे. नाही तर नितीननं एवढी आर्जवं केल्यानंतर तो आत आल्याशिवाय राहिला नसता! म्हणून मी लक्षात ठेवून नितीन आल्यावर त्याला विचारलं - ‘कुणाला रे बोलवत होतास?’ ’’

‘‘विक्रमला!’’ तो म्हणाला.

‘‘विक्रम? विक्रम कोण?’’ मी आजुबाजूच्या मुलांमध्ये हे नाव ऐकलेलं नव्हतं.

‘‘माझा मित्र!’’

‘‘मग? तो आत कां येत नव्हता?’’

‘‘कुणास ठाऊक! मी किती सांगितलं, पण ऐकतच नाही!’’

‘‘जाऊ दे नसलं यायचं त्याला तर! तू तरी कशाला एवढा आग्रह करतोस?’’

‘‘आमचा तो विषय तेवढ्यावरच राहिला. पण मग एके दिवशी नितीनला यायला उशीर झाला. त्या दिवसामधे तुम्हाला ऑफिसात काम असायचं. घरी यायला उशीर व्हायचा. यायचा ते दगदगलेले. तुमच्या दगदगीत आणखी भर कशाला, म्हणून मी त्या वेळी बोलले नाही. पण नितीन घरी आला, तो खूपच उशिरानं. मी त्याला उशिराचं कारण विचारलं. तो म्हणाला, ‘‘खेळायला गेलो होतो.’’

मी विचारलं, ‘‘कुणाबरोबर?’’ तर म्हणाला, ‘‘विक्रमबरोबर!’’

‘‘अग, त्याचा शाळेतला मित्र असेल तो!’’ तिच्या हकिगतीचा रोख न कळून मी म्हटले.

‘‘ती चौकशी केली मी.’’ निर्मला म्हणाली. ‘‘त्याच्या शाळेत नाही तो, पण त्याला भेटतो मात्र बहुधा शाळा सुटल्यानंतर, शाळेजवळच!’’

‘‘असेल. मग त्यात विशेष ते काय?’’

‘‘दिवसेंदिवस त्यांची मैत्री वाढतेच आहे. बऱ्याच वेळा तो माझ्याकडून विक्रमला देण्यासाठी खाऊ नेतो. कधी आपली खेळणी त्याला देऊन टाकतो.’’

‘‘मला तरी यात काही वावगं दिसत नाही.’’

''मलाही त्यात काही वावगं वाटलं नाही. पण मुलांचे मित्र कोण आहेत, हे आपल्याला ठाऊक नको का?''

या विषयातील हिची मते मला ठाऊक होती. नितीनच्या बाबतीत ही अगदी पहिल्यापासूनच फार काळजी घेत असे. त्याचे आरोग्य, त्याची स्वच्छता, त्याचा पोषाख, त्याच्या सवयी, हे सारे अगदी निर्दोष व्हावे म्हणून तिची धडपड असे. त्यासाठी ती वरचेवर डॉक्टरांचा सल्ला घेई. वाचन करी. सुदैवाने आमची परिस्थिती चांगली होती. नितीन आमचा एकुलता एक मुलगा. त्यामुळे त्याची सर्व बाजूंनी काळजी घेणे आम्हाला सहज शक्य होते. पण तरीही निर्मला कधीकधी जरा जास्तच काळजी करते, असे मला वाटायचे.

''मी नितीनला खोदूनखोदून विचारून विक्रमची थोडीफार माहिती काढली.'' निर्मला पुढे सांगू लागली. ''त्यातून मला जे कळलं त्यामुळं माझं फारसं समाधान झालं नाही. नितीन उलटसुलट किंवा उडवाउडवीच्या गोष्टी सांगतो. विक्रम राहतो कुठं, तर 'खूप लांब' म्हणतो - तुझ्यासारखे कपडे घालतो का, विचारलं, तर म्हणतो - 'नाही, त्याचे कपडे मळके असतात.' 'त्याची आई नाही का ते स्वच्छ धूत?' असं विचारलं तर म्हणाला, 'मला नाही माहीत!' पण एकूण माझा समज असा झाला की, हा विक्रम चांगल्या घरातला मुलगा नसावा.''

हे हिचे आणखी एक! मुलांनी फक्त आपल्या बरोबरीच्या मुलांमध्ये मिसळायचे. खालच्या वर्गातल्या मुलांशी बोलायचेदेखील नाही वगैरे. मला हे फारसे पटत नसे. गरिबी-श्रीमंतीतला फरक मुलांच्या थोडाच लक्षात येतो? आणि येत नसल्यास आपण तो मुद्दाम त्यांच्या डोक्यात कशाला भरवायचा? अर्थात् ही म्हणते त्यातही तथ्य होतंच! हलक्या मुलांमध्ये मिसळून नितीनला वाईट सवयी लागल्या असत्या तर?

''मी शेवटी नितीनच्या मागंच लागले की, तुझा हा विक्रम मला बघायचाय. एक दिवस तू त्याला घरी घेऊन ये! पण नितीन दाद देईना. दररोज म्हणायचा की मी खूप सांगितलं विक्रमला, पण तो घरी यायलाच तयार नाही. मग मला संशय यायला लागला. कदाचित नितीन खोटंच बोलत असला तर? विक्रमच्या नावावर घरातून खाऊ घेऊन, खेळणी घेऊन -''

''निर्मला!'' मी तिला दटावलं. ''आपला नितीन तसा नाही!''

''ते आहेच हो!'' ती थोड्या ओशाळवाण्या स्वरात म्हणाली, ''पण कधीकधी ऐकतो आपण असं काही. म्हणून मी प्रत्यक्षच जाऊन विक्रमला पाहायचं ठरवलं.''

''आलीस पाहून?''

''सांगते ना. मुद्दाम शाळा सुटायच्या वेळेस मी गेले. नितीनच्या शिक्षकांना विचारलं मी विक्रमबद्दल. त्यांना काहीच माहिती नव्हती. बहुधा तो नितीनचा शाळेबाहेरचा मित्र असावा, असं ते म्हणाले; पण त्यांनी तरी नितीनला बाहेरच्या कुठल्याच मुलाबरोबर पाहिलं नव्हतं. शेवटचा तास पीटीचा होता. नितीन ग्राउंडवरून सरळ घरी जाणार होता. म्हणून मी जाऊन शाळेच्या दरवाजात उभी राहिले.

''कवाईत करीत असलेल्या नितीनवर माझं लक्ष होतंच. घंटा वाजताच त्यानं बाजूला ठेवलेलं दप्तर उचललं आणि तो फाटकाच्या दिशेनं पळत सुटला. तिथं तो क्षणभर घोटाळला आणि मग एकटाच निघाला.

''त्याच्यामागून काही अंतरावरून मी चालत राहिले. त्याला अर्थात हे माहीत नव्हतं. मी घरी गेल्यानंतर थोड्या वेळानं तो आला. मी त्याला विचारलं, ''काय रे, आज एकटाच आलास घरी की, बरोबर कुणी होतं?''

''हो - विक्रम होता ना!'' तो एकदम म्हणाला. ''त्याच्या बोलण्यातल्या मोकळेपणावरून आणि माझ्या नजरेला नजर देण्यावरून, त्याचं म्हणणं खरं मानणं भाग होतं. पण ते खोटं असल्याचं मी तर प्रत्यक्ष पाहिलंच होतं. म्हणून मी त्याला थोडं दरडावून विचारलं - 'खरं सांगतोस?' 'हो - अगदी तुझी शप्पथ!' तो म्हणाला. मी विचारलं, 'कुठं भेटला विक्रम तुला?' 'शाळेच्या दारात. नेहमी तिथंच भेटतो तो!' अगदी निष्पाप चेहऱ्यानं नितीन म्हणाला.

''शेवटी काल मला या प्रकाराचा थोडासा उलगडा झाला. अर्थात त्यामुळं मी अधिकच बुचकळ्यात पडले. आता ही गोष्ट मला वाटत होती, तेवढी साधी राहिलेली नाही!''

''म्हणजे? काल काय झालं?''

''काल नितीनला थोडं बरं वाटत नव्हतं, माहितेय ना? म्हणून मी त्याला शाळेत पाठवलं नाही. संध्याकाळच्या वेळी तो जरा बेचैन झाला. त्याची तब्येत चांगली होती - पण त्याला कंटाळा आला होता. 'तुला खेळायला जायचंय का?' असं मी त्याला दोनतीनदा विचारलं. तरी तो जाईना. मात्र खिन्नपणे खिडकीबाहेर पाहत उभा राहिला. थोड्या वेळानं एकदम आनंदानं ओरडला. 'आई, विक्रम आला - मी खाली जाऊन येतो' आणि माझ्या परवानगीची वाट न पाहता दरवाजा उघडून धाडधाड पायऱ्या उतरून तो खाली गेला. मी खिडकीतून पाहिलं तेव्हा मला कुणीच दिसलं नाही. म्हणून मीही त्याच्यामागोमाग गेले.

''नितीन गप्पा मारीत फाटकाशी उभा होता. गप्पा मारीतमारीत फाटकाला लोंबकळत होता.''

''कुणाशी गप्पा मारत होता? विक्रमशी?''

''असं तो म्हणतो. पण माझ्यावर विश्वास ठेवा. तिथं नितीन एकटाच उभा होता. त्याच्या पुढ्यात कुणीही नव्हतं!''

निर्मलेच्या त्या वाक्यानं मला असा काही धक्का बसला!

''तुझी खात्री आहे की तिथं कुणी नव्हतं?'' मी हातातलं पुस्तक दूर फेकून दिलं.

''हो - आणि त्याआधी शाळेतून येतानासुद्धा - कधीच - कुणीच नव्हतं. विक्रम नावाचा मुलगा अस्तित्वातच नाही!''

''मग नितीन बोलतो कुणाबरोबर?''

''नितीन स्वत:शीच बोलतो!'' निर्मला म्हणाली. ''माझी खात्री झालीय की तो स्वत:शीच बडबडतो, अगदी हातवारे करून. आणि आपल्या या वागण्याचं समर्थन म्हणून त्यानं हा विक्रम शोधून काढला आहे.''

''तू म्हणतेस तसं असेलही. पण एरवी तर त्याच्या वागण्यात काही विचित्र दिसत नाही! त्याच्या डोक्यात काही बिघाड झालेला नाही... अभ्यासातही तो चांगला आहे...''

''त्याच्या डोक्यात बिघाड झालाय असं कुठं म्हणते मी? पण त्याला स्वत:शी बडबडण्याची सवय लागलीये एवढं खरं!''

मी काळजीत पडलो. हा काय नवीनच प्रकार?

दुसऱ्या दिवशी मी नितीनला जवळ बोलावलं. निर्मला म्हणते त्याप्रमाणं विक्रम म्हणजे जर तो स्वत:च असेल, तर ते त्याला पटवून देणं मुळीच कठीण नव्हतं.

''काय रे नितीन, तुझ्या त्या दोस्ताला - काय बरं त्याचं नाव -''

''विक्रम!'' तो उद्गारला.

''त्याला एकदा घरी तर बोलाव!''

''तो येत नाही. मी कितीदा बोलावतो!''

''कां रे? आपलं घर आवडत नाही त्याला?''

''उंहुं. कुठलंच घर त्याला आवडत नाही. त्याला आपलं मोकळ्यावर फिरायला आवडतं!''

''मग - स्वत:च्या घरी कसा राहतो?''

''नाहीच राहत!''

''म्हणजे? घरी राहत नाही? मग त्याचे आईबाबा -''

''त्याला कुणीच नाही. तो एकटाच आहे.''

''कसा आहे रे तो दिसायला? तुझ्यासारखा गोरा गोरा पान?''

''अं हं. तो काळा आहे!''

माझी खात्री झाली. विक्रम अगदी नितीनच्या विरुद्ध होता. नितीनकडे जे जे होते, ते ते विक्रमकडे नव्हते. कदाचित् आपल्याजवळच्या या साऱ्या गोष्टीच नितीनला नकोशा वाटत असतील. त्यामुळे त्याच्या मनाने अशी एक मूर्ती घडविली असेल की, जिच्यापाशी हे काहीकाही नव्हतं. विक्रम नितीनचा तो आदर्श असावा. घरच्या शिस्तीचा काच नसलेला, धाक लावायला आईबाबादेखील नसलेला, शाळेत न जाणारा, कपडे मळतील, याची पर्वा न करणारा, नितीनला न जमणाऱ्या गोष्टी बेदरकारपणे करणारा! त्याच्या अपुऱ्या इच्छा पुऱ्या करणारा!

''आणि बरं का बाबा, पूर्वी म्हणे त्याच्याकडे एक कुत्रा होता काळाकुट्ट! तो म्हणे इतका हुषार होता!'' ... नितीन रंगात येऊन सांगू लागला.

दुसऱ्या दिवशी मी त्याला मानसशास्त्रज्ञाकडे घेऊन गेलो.

आम्ही दोघंही बाहेर थांबलो. नितीनची जुजबी माहिती मी त्यांना दिलीच होती. विक्रमविषयी आम्हाला माहीत असलेले सारे काही त्यांना सांगून ठेवले होते.

डॉक्टरांनी नितीनला असंख्य प्रश्न विचारले. अगदी कसून तपासणी केली. नितीन बाहेर येताच, निर्मला त्याला घरी घेऊन गेली. मी आत डॉक्टरांकडे गेलो.

''काळजी करायचं काही कारण नाही!'' डॉक्टर हसत हसत म्हणाले, ''द बॉय इज परफेक्टली नॉर्मल! फक्त थोडासा सेन्सिटिव्ह आहे. त्यामुळे त्यानं कल्पनेनं स्वत:चा एक दोस्त तयार केला आहे. त्याला कुणी भावंड नाही, होय ना? या वयात कधीकधी मुलांना, आपल्याला एखादं भावंड असायला हवं, असं वाटतं. ते

नसलं तर तो कल्पनेनं भावंड किंवा मित्र तयार करतात... पुढं पुढं ते त्यांना खरंच वाटायला लागतं. थोडी मोठी झाली की ती विसरतात हे सारं.''

पण डॉक्टरांचा समज चुकीचा ठरला. नितीन विक्रमला अजिबात विसरला नाही. उलट, त्याचे आणि विक्रमचे संबंध अधिकच दाट होत गेले. त्याला पूर्वीपेक्षा अधिक वेळा विक्रम दिसू लागला. नितीनच्या म्हणण्याप्रमाणे विक्रम आता पूर्वीपेक्षा अधिक धीट झाला असावा. कारण आता तो कंपाउंडच्या आत येऊ लागला होता. इतकंच नाही, तर मी किंवा निर्मला बरोबर असतानाही तो रस्त्यावर वा पार्कमध्ये भेटू लागला होता. अर्थात आम्हाला तो कधीच दिसत नसे; पण त्याच्याशी बोलताना वा खेळताना नितीनचे जे हातवारे किंवा हालचाली होत, त्यावरून त्याच्याबरोबर दुसरं कुणी नाही असं म्हणणं शक्य नव्हतं. अनेक वेळा तो विक्रमचे जे वर्णन करीत असे त्यात तिळमात्र विसंगती नसे. नितीनच्या वयाच्या मुलाची कल्पनाशक्ती इतकी सुसंगत असणं शक्यच नव्हतं. बरं, त्याचे इतर सगळे व्यवहार बिनचूक होते. त्यामुळे त्याच्या डोक्यात काही बिघाड झाल्यासारखं वाटत नव्हतं. तरीही आमची काळजी कायम होती. कारण नितीन विक्रमला विसरेल, अशी नुसती आशा ठेवून काम भागणार नव्हतं. प्रत्यक्षात नितीनला विक्रम दिसेनासा व्हायला हवा होता!

''बाबा -'' एके दिवशी नितीन म्हणाला, ''विक्रम परत जायचं म्हणतो. त्याला इकडे कंटाळा आलाय!''

''परत? कुठं?''

''कुठं कोण जाणे. ते सांगत नाही तो मला!''

''ठीक आहे. मग जाणार असेल तर जाऊ दे!''

''तो मला, बरोबर चल, म्हणतो. मी जाऊ, बाबा?''

नितीनच्या या नवीन कल्पनेने मी हादरून गेलो. विक्रम त्याला आपल्याबरोबर बोलावीत होता - कुठे? ते कुणालाच ठाऊक नव्हते.

''इकडं फार कंटाळा येतो त्याला. इथं त्याचा कुत्रादेखील नाही ना? म्हणून! तरी तो म्हणतो मी आणीन काळूला इथं. पण मी जाऊ बाबा त्याच्याबरोबर? तसं झालं ना, की, तो म्हणतो, मी, तो आणि त्याचा काळू, आम्ही तिघं सगळा वेळ खेळत बसू. अगदी मज्जेत!''

आमचे बोलणं मी निर्मलेला शब्दश: सांगितले नाही; पण मनातून मात्र मी धास्तावलो. नितीनला विक्रम खरोखरच दिसतो, याविषयी आता मला शंका राहिली नाही. मानसशास्त्राच्या अतिविचारानं आम्ही सत्याकडे पाठ फिरवीत बसण्याची शक्यता होती. चुकीच्या मार्गानं विचार करता करता एखाद्वेळी फार उशीर होण्याचा संभव होता. सारे काही हाताबाहेर जाण्याआधीच या प्रकाराच्या मुळाशी जायला हवे होते आणि मुळाशी जायचे तर नितीनला विक्रम खरोखरच दिसतो; ही कल्पना आधी मान्य करायला हवी होती.

मी नितीनला विचारले - ''विक्रम तुला पहिल्यांदा कुठं भेटला?''

मी विक्रमविषयी आस्थेनं बोललो, याचाच नितीनला फार आनंद झाला. त्याने माझ्या प्रश्नाला उत्तर देण्याचा अगदी मनापासून प्रयत्न केला. पण त्याला काही आठवत नव्हते.

पुन्हा रस्ता बंद!

निर्मला म्हणाली, ''हल्ली - या वर्षभरातच नितीन विक्रमचं नाव घ्यायला लागला, नाही का?''

मग या वर्षभरात नितीन कुणाकुणाला भेटला असेल, याचा आम्ही विचार केला, पण काही सापडेना. नितीनच्या वर्णनावरून विक्रम काहीसा खेडवळ, हलक्या घरातला वाटत होता. अशा मुलांना तो भेटणार तरी कुठं? यंदा तर नितीन गावीदेखील गेला नव्हता.

मी नितीनच्या शाळेत बारकाईनं चौकशी केली. शिपाई, माळी सर्वांकडे स्वत: जाऊन विचारपूस केली. काहीही उपयोग झाला नाही.

नितीनच्या डोक्यात विक्रम आला कुठून, हे कळल्याखेरीज तो तिथून घालवणं कसं शक्य होतं?

शेवटी निरुपाय होऊन मी नितीनलाच म्हटलं, ''तू काही तरी सांगतोस. विक्रम आहे म्हणतोस, मग तो आम्हाला दाखव पाहू!''

नितीन जिद्दीने म्हणाला, ''कधी तरी दिसेलच तुम्हाला!''

खरेच विक्रम मला दिसायला हवा होता! त्याशिवाय मला काहीच करण्यासारखे नव्हते. इकडे विक्रमच्या गोष्टी मला नितीनकडून दररोज ऐकायला मिळत होत्या. नितीन त्याला विसरणे शक्यच दिसत नव्हते. उलट त्यांची मैत्री अधिकच दाट होत चालली होती. शिवाय नितीनने धोशा लावला होता, ''मी विक्रमबरोबर जाऊ? तो मला रोज बोलावतो.'' मी त्याला सांगत असे, ''आधी मला विक्रम दाखव!''

आणि एके दिवशी नितीन माझ्याकडे धावत आला. त्याचा आनंद जणू त्याच्या इवल्याशा शरीरात मावत

नव्हता. ‘‘बाबा, तुम्हाला विक्रम पाहायचा होता ना? हा बघा!’’ तो ओरडत होता.

मी पाहिलं. त्याच्या हातात एक लहानसा फोटो होता.

त्याच्या शाळेच्या ट्रिपचा फोटो होता तो.

मुलांच्या त्या गर्दीत एका कोपऱ्यात नितीन होता आणि त्याच्याजवळच एक काळा, मोठ्या डोळ्यांचा, अव्यवस्थित कपड्यांतला मुलगा उभा होता.

त्याच्या पुढ्यात एक काळा कुत्रा होता.

काही वेळ मी थक्क होऊन त्या फोटोतल्या मुलाकडे पाहातच राहिलो. नितीन नेहमी जे विक्रमचं वर्णन करीत असे, ते त्या मुलाला अगदी बरोबर लागू पडत होते.

एकूण विक्रम अस्तित्वात होता!

मग आम्हालाच तो कसा दिसत नव्हता?

नितीनला भास होत होता म्हणावे, तर इथे चक्क तो मुलगा फोटोत दिसत होता!

मी निर्मलेला फोटो दाखवला. तिने मला चांगलेच निरुत्साही केले. म्हणाली, ‘‘कशावरून हा विक्रमचा फोटो? नितीनला काहीतरी शोधताना हा फोटो मिळाला. त्याच्या नेहमीच्या वर्णनाप्रमाणे दिसणारा एकजण त्याला या फोटोत सापडला. त्यानं तो विक्रम म्हणून दाखवला, एवढंच. असं बघा, हा फोटो आहे कधीचा? अडीच वर्षांपूर्वी नितीन शाळेच्या ट्रिपला गेला तेव्हाचा. आणि तो विक्रमबद्दल बोलतो कधीपासून? अजून वर्षदेखील झालं नाही त्याला...’’

मी तिच्या बोलण्याकडे लक्ष न देण्याचे ठरवले. मला काहीही करून विक्रमच्या रहस्याचा भेद करायचा होता; पण त्याला सुरुवात कुठून आणि कशी करावी, तेच कळत नव्हते. आता एक धागा मिळाला होता. तो सोडून चालला नसता.

मी तो फोटो घेऊन नितीनच्या शाळेत गेलो. त्या फोटोमधल्या शिक्षकांना भेटलो. त्यांच्याकडून मला अधिक माहिती कळली. अडीच वर्षांपूर्वी नितीनच्या शाळेची ट्रिप कल्याणगडावर गेली होती. त्या वेळी कुणी तरी हौशी विद्यार्थ्यानं काढलेला फोटो होता तो. त्यातल्या त्या काळ्या मुलाबद्दल मी विचारपूस केली. तो शाळेतला विद्यार्थी नव्हता. गडावरच्याच कुणाचा तरी मुलगा होता तो. त्याचे नाव त्या शिक्षकांना माहीत नव्हते; परंतु ट्रिपच्या त्या दिवशी तो मुलांच्या बरोबर मिसळला होता, हे मात्र त्यांना साधारणपणे आठवत होते.

दुसऱ्याच दिवशी मी कल्याणगडच्या गावी हजर झालो.

प्रत्यक्ष गडावर मी पोहोचलो तेव्हा संध्याकाळ झाली होती. अंधारू लागले होते. हवेत गारठाही जाणवू लागला होता. गडाचा बुरुज काळोखात अधिकच अजस्र वाटत होता. ढग जणू बुरुजावर उतरल्यासारखे दिसत होते. तटाच्या जवळपास थोडी मनुष्यवस्ती दिसत होती. तिथे हळूहळू घासलेटचे दिवे, चिमण्या लागायला सुरुवात झाली होती. त्या बाजूने बोलण्याचा थोडा थोडा आवाज येत होता. पण एकूण वातावरण उदासवाणे चिडीचिप्प होते. एक वेळ रात्र परवडली, पण असल्या संध्याकाळच्या वेळी, का कुणास ठाऊक, मला नेहमीच एक विचित्र हुरहूर लागून राहते.

मी वस्तीकडे जाऊ लागलो. वाटेत एक छोटेसे देऊळ होते. आत वाकून पाहिले, तेव्हा देवीची खडबडीत दगडी मूर्ती दिसली. कुणी तरी देवळाच्या तोंडाशी लावलेल्या दिवलीच्या प्रकाशात ती मूर्ती काहीशी कठोर वाटत होती.

हात जोडून मी देवळावरून पुढे गेलो. पहिल्या घराशी थांबलो.

एक म्हातारा जमिनीवर बसून अंगाला तेल चोपडीत होता. मी त्याला विचारले, ‘‘विक्रम कुठं राहतो?’’

थोड्या अंतरावर एक कुत्रे अंगावर काटा येईल अशा सुरात विव्हळले.

म्हाताऱ्याला पहिल्याने माझ्या प्रश्नाचा अर्थ समजल्यासारखा दिसला नाही. मग मी पुन्हा विचारले, ‘‘इथं विक्रम कुठं राहतो?’’

‘‘विक्रम?’’ माझ्याकडे शून्य नजरेने पाहत म्हाताऱ्याने विचारले, ‘‘विक्रम कोण?’’ पुन्हा कुत्रे विव्हळले.

त्याला काय सांगावे तेच मला समजेना. मी म्हटले - ‘‘तो - लहान मुलगा - दहाएक वर्षांचा असेल!’’

म्हाताऱ्याच्या डोक्यात आता थोडासा प्रकाश पडला. ‘‘तो होय?’’ त्याने कोपऱ्यात बसलेल्या कुणाला तरी हाक मारली. काळोखातून एक मुलगा पुढे झाला. पण तो विक्रम नव्हता. ‘‘यांना सावव्याकडे घेऊन जा!’’

मुलगा पुढे झाला. म्हाताऱ्याला नमस्कार करून मीदेखील चालू लागलो. म्हाताऱ्याने आपले, तेल चोपडण्याचे काम पुढे चालू केले.

एका खोपटात आम्ही शिरलो. आत एक छोटी दिवली मिणमिणत होती. आम्ही दारातूनच विचारले - ''सावळ्या आहे का?''

''कोन हाय?'' असा बाईच्या आवाजातला प्रश्न आला.

मी काही उत्तर देणार एवढ्यात अगदी जवळच कुत्रे गळा काढून रडू लागले. मी दचकलो. मग लक्षात आले की काळोखामधे पडलेले ते काळे कुत्रे मला दिसलेच नव्हते. एवढे लक्षात आले आणि मी पुन्हा एकदा दचकलो. काळे कुत्रे! मी विक्रमच्या घराशी आलो होतो, यात शंका नव्हती.

एवढ्यात आतून विचारणारी ती बाई बाहेर आली. ''कोन हवंय तुम्हाला?''

''सावळ्या घरात नाही?'' माझ्याबरोबरच्या पोराने विचारलं.

मी सरळच विचारले - ''विक्रम कुठं आहे?''

मी हा प्रश्न विचारताच काही उत्तर न देता ती बाई एकदम स्फुंदू लागली. माझ्याबरोबरचा मुलगाही माझ्याकडे चमत्कारिक नजरेने पाहू लागला.

रडण्याचा भर ओसरल्यावर ती बाई एवढेच कसेबसे म्हणाली - ''विक्रम गेला! आज धा म्हैने व्हतील त्याला!''...

- आणि ती आतल्या काळोखात नाहीशी झाली.

कसल्या तरी चमत्कारिक गुंगीत मी गड उतरून आलो. मी गड उतरायला लागलो आणि त्याच वेळी गडावरचा नगारा सुरू झाला. किती वर्षं तो नगारा वाजत होता कुणास ठाऊक. मध्यंतरी सारे जग बदलले होते - तरीही अजून नगारा बडवण्याचे काम कुणी तरी करीतच होतं. नगाऱ्याचा धम् धम् आवाज त्या काळोखात ऐकणाऱ्याच्या छातीत धडकी भरवीत होता. ऐकले त्याने मी इतका सुन्न झालो होतो की, आपण कुठल्या जगात वावरत आहोत, हेच कळेनासे झाले होते. रोज असे काही घडत नाही; आणि तरीही माझ्या अवतीभवती ते घडत होते. माझ्या अनुभवाला येत होते.

विक्रमचे घर दाखवायला माझ्याबरोबर आलेला मुलगा भारावल्यासारखा माझ्या- मागून येत होता. त्याने मला आणखी माहिती दिली. दहा महिन्यांपूर्वी विक्रम बुरुजावरून पाय घसरून खाली पडून वारला होता. त्यानंतर कित्येक दिवस त्याचा कुत्रा काळू त्याला शोधीत फिरे; पण नंतर काळू चमत्कारिक वागू लागला होता. लोक म्हणत, त्याला विक्रम दिसतो. काळू खंगत चालला होता. अस्थिपंजर झाला होता. नुसता एका जागी पडून तो विव्हळत राही.

सकाळी मी गावात जाणाऱ्या बस-स्टँडवर उभा होतो. एवढ्यात तो मुलगा कुठून तरी धावत आला आणि म्हणाला -

''काल रात्री काळू मेला!''

माझ्या छातीत भीतीचे असंख्य नगारे वाजू लागले.

रात्री मी घरी पोहोचलो, तेव्हा नितीन आनंदाने नाचत होता. हसतहसतच तो मला म्हणाला - ''बाबा, आज आम्ही चिक्कार खेळलो. मी, विक्रम आणि काळू. विक्रमला काल रात्रीच काळू मिळाला!''

माझ्या पायाखालची जमीन हादरू लागली.

''नितीन?-'' मी त्याला जवळ घेऊन म्हटले, ''अडीच वर्षांपूर्वी तुला विक्रम कल्याणगडावर भेटला. तेव्हा तुमची गट्टी झाली, होय ना?''

''हो!'' आठवण करून देताच नितीनला सारे आठवले. ''तेव्हा मी त्याला आपल्या घरी बोलावलं होतं. त्याच्या मनातून खूप यायचं होतं; पण त्या वेळी त्याला येता आलं नाही!''

''हो, नितीन. जिवंत माणसांना वाटेल तेव्हा वाट्टेल तिथं जाता येत नाही. विक्रमची आणि तुझी दोस्ती झाली, म्हणून विक्रम तुला भेटायला इतक्या लांबवर आला, हे खरं; पण तू त्याच्याशी दोस्ती ठेवता कामा नये, नितीन - कारण तुम्हा दोघांच्यात फरक आहे! तू जिवंत आहेस - आणि विक्रम मेलेला आहे! जिवंत माणसांची मेलेल्या माणसांशी मैत्री होऊ शकत नाही, नितीन!''

नितीन काहीच बोलला नाही. मी बोललो त्याचा अर्थ तरी त्याच्या लक्षात आला की नाही, कोण जाणे! पण तो गंभीर मात्र झाला.

दुसऱ्या दिवशी नितीन शाळेतून घरी परतला नाही. आम्ही त्याची वाट पाहिली. शाळेत जाऊन चौकशी केली.

तो शाळेतून बराच लवकर निघाला होता, असे कळले. वर्गशिक्षक म्हणाले की, 'मला बरं वाटत नाही, मी जातो' असं सांगून तो निघाला. ''त्याला एकट्यालाच कसं सोडलंत?'' विचारले, तर ते म्हणाले की, 'मी माझ्या

दोस्ताबरोबर जातो' असे त्यानं सांगेतलं.

दोस्ताबरोबर - म्हणजे विक्रमबरोबर!

माझ्या छातीत धडकी भरली.

मी आणि निर्मलेनं ताबडतोब कल्याणगडची वाट धरली.

आम्ही कल्याणगडावर पोहोचेपर्यंत रात्र फार झाली होती.

सगळीकडे शांत होते.

फक्त नगाऱ्याचा 'धम् धम्' असा गंभीर आवाज आसमंतात घुमत होता.

आम्ही बुरुजाशी गेलो.

बुरुजाच्या तळाशी लोकांची गर्दी जमली होती.

मी लोकांचे कडे फोडून पुढे झालो.

मध्यभागी जमिनीवर नितीनचा लोळागोळा झालेला देह पसरला होता.

पाहणाऱ्यांनी सांगितले की, नितीन एकटाच धावत बुरुजाच्या टोकाशी गेला आणि त्याने तिकडून खाली उडी टाकली.

पण मी बरोबर समजून चुकलो आहे की, नितीन त्या वेळी एकटा नव्हता. विक्रम आणि काळूदेखील तिथे असले पाहिजेत. त्याच्याशी खेळत, त्याला खुणावीत, बोलावीत. नाही तरी कधीपासून विक्रम त्याला बोलावीतच होता.

मी हे लिहीत असतानाच मला जवळपास कुत्रे भुंकल्याचा आवाज ऐकू आला.

मी धावत जाऊन खिडकी उघडू लागलो. निर्मला माझ्यापाठोपाठ आली - "काय झालं?" तिने विचारले.

"आत्ता कुत्रं भुंकलं. तू नाही ऐकलंस?"

"नाही!" माझ्याकडे चमत्कारिक नजरेनं पाहत ती म्हणाली. "नितीन गेला त्या दिवसापासून कसलेकसले चमत्कारिक भास होताहेत तुम्हाला! चला बरं - झोपा जरा!"

मी तिच्याकडे लक्ष न देता खिडकी उघडली. बाहेर चांदणे पडले होते. त्या चांदण्यात मला ते अगदी स्पष्ट दिसले - ते तिघे -

दोन मुलगे आणि एक कुत्रा!

▪

साधा माणूस

केशव

''केशऽव - केशव कुठं मेलाय?''

अण्णासाहेबांची गर्जना.

घरातल्या प्रत्येकाच्या कानावर ती पडते. फक्त अगदी आतल्या खोलीत बकुळीच्या फुलांचा गजरा करीत बसलेल्या केशवच्या सोडून.

आपल्या 'स्टडी'मधल्या प्रचंड शिसवी काळ्याकुट्ट टेबलाशी बसलेले अण्णासाहेब. टेबलाचे पाय लांबरुंद. टोकाशी वळलेले. एखाद्या काळ्याकभिन्न कामगाराच्या घोटीव श्रमिक पोटऱ्यांसारखे. टोकाशी पसरलेली फताडी पावले - जनावराच्या नखदार पंजासारखी. त्यांची खुर्ची म्हणजे एखादे सिंहासनच. खुर्चीची पाठ चांगलीच उंच आणि वरच्या टोकाशी निमुळती. तिला टेकून, खुर्चीच्या दोन्ही हातांवर दोन हात ठेवून, एखाद्या वयस्क सम्राटाच्या ऐटीत बसलेले मध्यमवयीन अण्णासाहेब.

दोनच सेकंदांपूर्वी अण्णासाहेबांनी अंगातल्या रेशमी जाकिटाच्या खिशातून साखळीवाले सोन्याचे घड्याळ काढून वेळ पाहिलेली आहे. मिनिट काटा बाराकडे सरकू लागलेला त्यांना दिसतो. क्षणभर ते त्या सोन्याच्या घड्याळातल्या निरनिराळ्या गतींनी सरकणाऱ्या काट्यांकडे पाहतात. आणि त्यांना एकदम आठवण होते की रोजच्याप्रमाणे केशवने पावणेपाच वाजता आपला कोको आणलेला नाही. त्यांच्या अस्वस्थतेला मग वाट फुटते. चवताळलेल्या वाघासारखे ते डरकाळी फोडतात - ''केशऽव - केशव कुठं मेलाय?''

त्यांची ती डरकाळी घरभर घुमते. पन्नास वर्षांपूर्वीचा तो जुना बंगला - पण अजून आपल्या पायावर ठाम उभा आहे. मोठा हॉल, त्यात लटकणारी मौल्यवान बिलोरी झुंबरे, दाराखिडक्यांच्या प्रशस्त चौकटी आणि त्यांत बसवलेल्या अजूनही शाबूत असलेल्या हिरव्या, निळ्या आणि लाल काचा - सारे सारे पार करून ती आरोळी आतल्या खोल्यांच्या दिशेने घुमते. पिंजऱ्यातला पोपट शहारून पंख फडफडावतो.

अण्णासाहेबांचा राग साऱ्यांना माहीत; त्यामुळे केशवचे नाव घेतल्यानंतर केशवखेरीज दुसऱ्या कुणाची पुढे जाण्याची शहामत नाही. 'तू कां आलास?' म्हणून, समोर येईल त्याला, हाताला लागेल ते घेऊन, बडवून काढायचे. म्हणून जो तो आपापल्या जागी क्षणभर श्वास रोधून स्तब्ध उभा राहतो; पण अण्णासाहेबांच्या पुढे जात नाही. केशव जातो की नाही, याची वाट पाहत सगळे थांबतात.

केशवचे लक्ष मात्र बकुळीच्या हारातून विचलित होत नाही. एकेका फुलाने हार वाढत असतो, भरगच्च होत असतो. त्याचे सारे लक्ष त्या इवल्या फुलाच्या गाभ्यात शिरणाऱ्या सुईमधे एकाग्र झालेले असते. विचार एवढाच की, हार चांगला व्हायला हवा, नीलाबाईला आवडायला हवा, या विचाराने त्याच्या मुद्रेवर स्मित पसरते. अगदी हलकेच. एखाद्या लहानशा बाळासारखे. निर्व्याज स्मित.

- आणि एवढ्यात अण्णासाहेबांची दुसरी कर्कश हाक कान फोडायला आल्यासारखी येऊन आदळते -

''केशव - कान फुटले का? जिवंत आहेस की मेलाऽस?''

केशवचा थरकाप होतो. हार तसाच अपुरा ताम्हणात टाकून, तो धडपडत उठतो. एखाद्या भित्र्या सशासारखे कान टवकारतो. समोरच्या भिंतीवरच्या घड्याळाकडे नजर टाकतो. पाच वाजले! बापरे! म्हणजे अण्णासाहेबांचा कोको न्यायला तब्बल पंधरा मिनिटे उशीर?

तो धावतच स्वयंपाकघरात जातो. आचाऱ्याकडून कोकोचा कप घेतो आणि घाईघाईने 'स्टडी'पाशी येतो. रोजच्या सवयीने वाटेत पोपटाच्या पिंजऱ्याशी थांबण्याचेदेखील आज तो टाळतो.

त्याने समोर ठेवलेला कोको अण्णासाहेब ढसाढसा पितात.

आणि मग त्याचे बखोट धरून त्याच्या एक कानाशेलात लगावतात.

''शिंच्या - रांडेच्या - कुठं गेला होतास इतका वेळ मरायला? रोजचं काम परत परत सांगायला कोण तुझा बाप येणार का?''

अण्णासाहेबांच्या शिव्या केशव शांतपणे ऐकून घेतो. त्यांच्या हातचा मारदेखील मुकाट्याने खातो. आता हे नेहमीचेच झालेले आहे. काही ना काही कारणाने मार हा खावाच लागतो. बोलणे ऐकून घ्यावेच लागते...

केशव काही अण्णासाहेबांचा नोकर नव्हे. तो त्यांचा आश्रित. लांबच्या नात्यातला अनाथ मुलगा. जवळ करायला दुसरे कुणीच नसल्यामुळे अण्णासाहेबांच्या आश्रयाला आलेला. त्यांनी त्याला कायमचेच आपल्याजवळ ठेवून घेतलेले. दोन वेळचे जेवण, कपडे, वर पाचपंचवीस रुपये देऊन. केशवच्या गरजा तशा फारशा नाहीत. त्याला कसले व्यसन नाही, की वेळ घालविण्याचे साधन नाही. स्वभावाने अतिशय शांत, अबोल. काही झाले तरी कुणी त्याचा आवाज चढलेला ऐकला नाही. पण तसा तो मूर्ख नव्हे. सगळी कामे टापटिपीने करील. सदरा-लेंगाच, पण स्वच्छ घालील. अण्णासाहेबांचा कामाचा व्याप मोठा. अनेक धंद्यांत त्यांचे पैसे गुंतलेले. वय उताराला लागलेले, तेव्हा बरीच कामे ते घरी बसल्याबसल्या करतात. सेक्रेटरी काही वेळा येऊन जातो. पण पत्रे पोस्टात नेऊन टाकणे, निरोप पोचवणे, असली बिनअकलेची, साधी, पण कटकटीची कामे केशवला करावी लागतात. या कामांप्रमाणेच त्याची घरातली काही कामेही नेमलेली आहेत. सकाळी अण्णासाहेबांच्या चहाच्या टेबलावर सगळी वर्तमानपत्रे रचून ठेवणे, दुपारी वामकुक्षीनंतर त्यांना ठराविक वेळी उठवणे, रात्री घड्याळाला चावी देणे, अशी नानाविध कामे. ती सगळी केशवनेच करायला हवीत अशातला भाग नाही. परंतु कशी कोण जाणे, ती त्याच्यावर येऊन पडली आहेत. तोही ती आजवर बिनबोभाट पार पाडीत आला आहे.

दररोज पावणेपाच वाजता, स्टडीमधे कोको घेऊन येण्याचे काम असेच.

उशीर करण्याबद्दल मिळालेल्या शिव्या केशव एक अक्षर न बोलता खातो. त्याच्या चेहऱ्यावरची रेषाही हालत नाही. कदाचित त्याच्या मनात अजूनही बकुळीच्या हाराचेच विचार येत असावेत...

शेवटी अण्णासाहेबच बोलायचे थांबतात. ''तुला टोणग्याला किती बोला, किती मारा - परिणाम म्हणून नाही.'' असे भरतवाक्य करून ते गप्प होतात.

त्यांचा चेहरा घामाने चिंब झालेला असतो - हाताने ते कागदांचे ढिगारे चाचपू लागतात...

एका बाजूला पडलेला नॅपकिन केशव त्यांच्या हातात देतो. ते घसाघस घाम पुसून तो बाजूला फेकतात. केशव कोकोची कपबशी उचलून शांतपणे स्टडीच्या बाहेर पडतो.

दारालगतच नीला उभी असते.

सगळा प्रकार तिने ऐकलेला असतो.

नीला अण्णासाहेबांची एकुलती एक मुलगी. पहिल्या बायकोपासून अण्णासाहेबांना मूलच झालेले नाही. तिच्या मृत्यूनंतर बऱ्याच उशिरा त्यांनी दुसरे लगन् केले. बायको फार वर्षे लाभली नाही. पण एक मुलगी मात्र झाली. तीच नीला.

नीला हळुवारपणे विचारते, ''फार मारलं का रे तुला?''

केशव नुसती मान हलवतो. नकारार्थी. पण तिने असे विचारले, यातच त्याला लागलेले सारे भरून आलेले असते.

तो तसाच आत जातो, कोकोची कपबशी विसळून ठेवतो; आणि पुन्हा येऊन बकुळीचा हार गुंफू लागतो.

पाच मिनिटांत हार पुरा होतो. केशव तो तसाच घेऊन अण्णासाहेबांच्या स्टडीपाशी येतो. दाराबाहेर थांबतो. हातात हार घेऊन. नीलासाठी ताटकळत.

आणि एकदम एक गोष्ट लक्षात येऊन तो दचकतो.

अण्णासाहेबांचा आवाज चढलेला असतो.

नीलाशी बोलताना त्यांचा आवाज सहसा चढत नाही.

पण आज ते भलतेच चिडले असावेत.

''हे बघ, नुसती मैत्री ठीक आहे - पण काही भलतंसलतं करायचं मनात आणलंस तर बघ! आधीच ताकीद देऊन ठेवतोय! डिवचला तर माझ्यासारखा वाईट माणूस दुसरा नाही - सांगून ठेवतो!'' अण्णा नीलाला सांगत असतात.

''पण अण्णा, मी तसलं काही म्हणाले तरी का? तुम्हाला उगाच वाटतं -'' नीलाचा रडवेला सूर.

''नाहीतर उद्या म्हणशील, मला त्याच्याशी लगन् करायचंय - तर ते काही चालणार नाही. ती भिकारडी

माणसं - आपल्या तोडीची नाहीत. मी आपल्यापेक्षा अधिक श्रीमंत जावई शोधणार आहे - त्या आधी तू वेडंवाकडं काही करून माझ्या तोंडाला काळं फासलंस, तर बघ - मग तू माझी मुलगी नाहीस आणि मी तुझा बाप नाही -''

यानंतर नीलाचे शब्द ऐकूच येत नाहीत. नुसते हुंदके -

मुसमुसतच ती 'स्टडी'बाहेर पडते; आणि केशवकडे न पाहताच तडक आपल्या खोलीत जाते.

केशवच्या हातांतला बकुळीचा हार तसाच राहतो.

सुभाष

खिन्न होऊन नीला खाली पाहत बसलेली.

आजुबाजूला काळेशार फत्तर. त्यांत पाहण्यासारखे काहीच नाही.

दूरवर पाणी. पण तेही निपचित पडलेले. त्याची बिलकुल जाग नाही.

हातांच्या लांब नखांवरून बोटे फिरवीत नीला उदास बसलेली. तिचा हा चाळा विमनस्कपणे निरखीत खडकावर ऐसपैस पसरलेला सुभाष.

सुभाष नेहमीच असा ऐसपैस बसलेला असतो. आरामशीर.

तसे पाहिले तर सुभाषचे आयुष्य बिलकुल आरामात गेलेले नाही. घरची गरिबी - शिक्षणाला पुरेसा पैसा नाही, चैन तर दूरच राहिली. पण तरीही सुभाष कुणाचा मिंधा नाही. शिष्यवृत्त्या मिळून शिक्षण पुरे केलेले. महत्त्वाकांक्षा जबरदस्त. आत्मविश्वास प्रचंड. हिशेबीपणा भलताच. 'हवं ते मिळवणारच' ही पुरती खात्री - मग त्यासाठी कुठलेही मार्ग अवलंबिण्याची तयारी. नव्यानव्या योजना डोक्यात नेहमी तयार. ज्या गरिबीने आईबाप ग्रासले होते, ती आपल्या वाऱ्यालाही उभी राहू नये, ही मनोमन इच्छा. त्यासाठी वाटेत आलेल्या सगळ्या अडचणींवर मात करण्याचा निर्धार. त्या निर्धारापोटीच चेहऱ्यावरचे ते बेफिकीर स्मित. डोळ्यांतली हुषारीची चमक.

तसे त्याचे नीलावर प्रेम नाही असे नाही. पण नीलाचे वडील श्रीमंत आहेत, आणि नीला त्यांची एकुलती एक मुलगी आहे - त्यांच्यानंतर त्यांच्या साऱ्या वैभवाची एकुलती एक वारस आहे, हे तो विसरूच शकत नाही. नीला सुंदर आहे, सुस्वभावी आहे, तिचे आपल्यावर प्रेम आहे, हे सारे खरे; परंतु हे गुण असलेली दुसरी एखादी मुलगीही लाभणे शक्य असते. मात्र नीलाची श्रीमंती - तो गुण लाखात एखादीचाच - हा त्याचा सरळ हिशेब. त्याचे प्रेम आंधळे नाही, हिशेबी आहे. हिशेबीपणात काही चुकते, असे त्याला वाटत नाही. उलट हिशेबी विचार करून नीलाच्या प्रेमाची किंमत त्याला अधिकच मोठी वाटू लागली आहे.

''तू त्यांना जावई म्हणून मुळीच नकोयस.'' त्या दिवशीचा सगळा प्रसंग तपशीलवार सांगून झाल्यावर नीला म्हणते, ''आपल्या प्रेमाविषयी मी कधी एका शब्दानंही बोलले नाही. पण तरी कशी कोण जाणे, अण्णांना शंका आलीच आहे.''

''नंतर काही सांगून टाकलंस?'' सुभाष अंदाज घेतो.

''नाही - मी काय बोलणार? तेच ताडताड बोलत होते. तुमचं घर आमच्या तोडीचं नाही, म्हणून पुढंमागं काही घडण्याआधी धोक्याचा इशारा देतोय, म्हणाले. मला तर ऐकून रडूच यायला लागलं. आपल्या प्रेमाची किंमत त्यांना कधीच कळायची नाही. त्यांना आपला स्वत:चा पैसाच प्यारा! खरं तर आपल्या प्रेमापुढं काय महत्त्व आहे रे पैशाचं?'' नीला कळवळून विचारते.

''हो ना - पैशाचं काय महत्त्व?'' सुभाष सहजपणे म्हणतो.

''तू काही बोलली नाहीस, हेच बरं झालं.'' तो हसत हसत सांगतो. ''वेळ आली की काय करायचं ते पाहता येईल.''

''वेळ आलीच आहे, सुभाष -'' नीला आर्जवीपणे म्हणते. ''मला नाही फार दिवस तुझ्यापासून दूर राहता येणार.''

'वेळ आलेलीच आहे -' सुभाष मनातल्या मनात म्हणतो. 'मी केमिकल ॲनालिसीस ब्युरो काढतो आहे - त्याला पैशांची फारच गरज आहे -'

-''आणि अण्णा काही ऐकून घेणार नाहीत.'' नीला विलक्षण केविलवाणी झालेली. हा इतका शांत कसा तेच कळत नाही - ती मनात म्हणते - पण शांत आहे म्हणूनच त्याचा आधार वाटतो - ''आपल्या लगनचं नाव काढलं तर ते मला बाहेर पडायचीसुद्धा बंदी करतील - आणि अण्णांचं म्हणजे, एकदा डोक्यात घेतलं, की प्राण गेला तरी हेका सोडणार नाहीत.''

'प्राण गेला तरी?' मनातल्या मनात सुभाषला हसू येते - 'प्राण गेल्यावर हेका सोडावाच लागेल. हेकाच का, सगळंच, सारी इस्टेटही सोडावी लागेल - नसले सोडणार तर त्यासाठी प्राणच सोडावा लागेल -'

स्वत:च्या विचारांनी सुभाष स्वत:च दचकतो.

पण क्षणभर तो विचार डावलून तो तिला म्हणतो - ''जाऊ दे ग. इतकी काय काळजी करतेस? काय वाट्टेल ते झालं तरी आपलं लगन् झाल्याशिवाय राहत नाही.''

ती शांत होते. त्याच्याकडून हेच शब्द तिला ऐकायला हवे असतात.

''इतकी सुंदर संध्याकाळ असल्या भलत्यासलत्या विचारात कशाला वाया दवडायची? आता हस पाहू - आणि जवळ ये अशी.''

तिची सारी आशंका निघून जाते; आणि ती त्याच्या आधीन होते. त्याच्या मिठीत सारी चिंता विसरून जाते.

- संध्याकाळी बाजूला टाकलेला विचार सुभाष घरी पोहोचताच त्याच्यासमोर दत्त म्हणून उभा राहतो.

अण्णासाहेबांचा आग्रही स्वभाव - काही झाले तरी ते या लगनला तयार होणार नाहीत -

- पण हे लगन् झालेच पाहिजे. आजवर कुठल्याच गोष्टीत आपण माघार घेतलेली नाही. शिवाय पैशांची गरज - ती आहेच!

यावर उपाय - उपाय एकच!

अण्णासाहेब या जगातून नाहीसे झाले पाहिजेत.

मघाशी या विचाराने जितके दचकायला झाले, तितके आता होत नाही.

विचार भयंकर आहे खरा, परंतु अडचणीतून सुटायचा तोच एक खात्रीचा मार्ग आहे -

फक्त अण्णासाहेबांचे मरण व्यवस्थित - आपण प्रत्येकच गोष्ट करतो तितके, किंबहुना अधिकच व्यवस्थित आखायला हवे.

- मुख्य म्हणजे कसलाही आरोप अंगावर येता कामा नये...

हे कठीण आहे - स्वत:वर येऊ नये याहीपेक्षा तो दुसऱ्या कुणावर तरी यायला हवा - अगदी सहजपणे.

दुसऱ्या कुणावर...?

सगळी हुषारी वापरून बेत आखायला हवा आणि... दुसरे कुणीतरी अलगद जाळ्यात सापडायला हवे...

पण दुसरे कोण...

एक भोळा, लहान मुलाच्यासारख्या निर्व्याज स्मिताने फुललेला चेहरा त्याच्या डोळ्यांसमोर येतो. बस् - जाळ्यात गुंतवण्यासाठी इतका योग्य माणूस दुसरा मिळणार नाही...

तो चेहरा केशवचा असतो.

अण्णासाहेब

येत्या आठवड्यात अण्णासाहेबांची भेट घ्यायचे सुभाषने पक्के केलेले असते.

तसा सुभाष अण्णासाहेबांच्या बंगल्यावर अधुनमधून येत-जात असतोच. त्यांना आपल्या प्रगतीच्या बातम्या देतो - काहीशा खोट्या नम्रतेने, 'तुमचे आशीर्वाद हवेत' वगैरे हसत हसत बोलून जातो.

अण्णासाहेब त्याच्या या नम्रतेने फसत नाहीत. त्याची प्रगती, नाही म्हटलं तरी त्यांना थोडीशी खुपतेच. आज ना उद्या हा मुलगा नाव कमावेल, हे त्यांनी जाणलेलेच आहे. ही गरिबाची मुले एका पिढीत वर येऊन आपल्यासारख्या घरंदाज गर्भश्रीमंतांशी बरोबरी करतात, हे त्यांना खपत नाही, तेव्हा सुभाषवर त्यांचा थोडाफार रागच! पण तो आपणहून येतो, आशीर्वाद मागतो, त्यामुळे त्यांनाही वरकरणी हसून साजरे करावे लागते.

पूर्ण विचार करून सुभाषने सारी योजना पक्की केलेली आहे. त्याप्रमाणे तो गुरुवारी अण्णासाहेबांची भेट घेणार आहे -

बुधवारी तो केशवला भेटतो.

बंगल्यापासून थोड्या अंतरावरच.

तो केशवच्या हातात एक कागद देतो. एका केमिस्टसाठी लिहिलेली ती चिठ्ठी. 'स्ट्रिचनाइन'ची बाटली हवी म्हणून. नेहमीच्याच केमिकल रिसर्चच्या कामासाठी.

''हे बघ, केशव - हे औषध साधंसुधं नाही - जालीम विष आहे - त्याचे नुसते चार थेंब टाकले तरी बस. मुख्य म्हणजे ते कोकोसारख्या पेयात इतकं झक्क मिसळतं की पिणाऱ्याला संशयसुद्धा येत नाही; पण प्यायल्यापासून पंधरा मिनिटांत सगळा खेळ खलास!'' तो मुद्दामच सारे काही सविस्तरपणे समजावतो.

केशवला विषाची माहिती होती, असे पुढेमागे सिद्ध करता यावे, म्हणून.

केशव ऐकत असतो. सुभाषविषयी त्याला नेहमीच आदर वाटत आला आहे. सुभाषला तो 'सुभाषसाहेब' म्हणतो.

''आता तू म्हणशील, की एवढं जालीम विष आणि तो केमिस्ट मला देईल कसा? तर तू नुसती ही चिठी दाखवलीस की बस्. अरे, केमिस्ट माझा चांगला दोस्त आहे - मला नेहमीच तो माल पुरवीत आला आहे. दोन दिवस गडबडीत आहे म्हणून - नाहीतर मीच घेऊन आलो असतो.''

''उद्या मी अण्णासाहेबांकडे येणार आहे - तेव्हा तू मला बाटली दे. त्यांच्यासमोर देऊ नकोस हं - नाना चौकशा करीत बसतील.''

एवढे सांगून आणि पैसे देऊन सुभाष केशवचा निरोप घेतो.

गुरुवारी पावणेपाचला पाच मिनिटे असतानाच तो अण्णासाहेबांच्या स्टडीत हजर होतो.

अण्णासाहेब नेहमीसारखेच आपल्या सिंहासनवजा खुर्चीत विराजमान झालेले असतात. सुभाषने केलेल्या सस्मित नमस्काराचा, ते सम्राटाने मुजरा घ्यावा तसा, किंचित मान डोलवून स्वीकार करतात. ''बस ना - किती दिवसांनी आलास?'' म्हणतात.

सुभाष बसतो.

त्याचा उजवा हात विजारीच्या खिशातली स्वत: आणलेली छोटी स्ट्रिचनाइनची बाटली चाचपतो.

बरोबर पावणेपाच वाजता केशव अण्णासाहेबांचा कोको घेऊन येतो.

कोको आणून ठेवताच त्याला बाहेर पाठवण्यासाठी सुभाषने एक-दोन युक्त्या ठरवून ठेवलेल्या असतात. पण सुदैवाने अण्णासाहेबच त्याला 'सुभाषसाठी चहा आण' म्हणून बाहेर पाठवतात; त्यामुळे त्या वापराव्याच लागत नाहीत.

अण्णासाहेब कोकोचा कप उचलणार, एवढ्यात सुभाषचा धक्का लागतो आणि टेबलवरची शाईची दौत सांडते. 'सॉरी', 'सॉरी' म्हणत सुभाष कोकोचा कप ताब्यात घेतो. अण्णासाहेब शाईचा ओघळ कागदावर सांडेल या भीतीने कागद बाजूला करू लागतात. ही संधी साधून सुभाष कागदांची एक चवडच्या चवड खाली ढकलून देतो. अण्णासाहेब खाली वाकून कागद गोळा करू लागतात.

सुभाष शांतपणे स्ट्रिचनाइनची बाटली उघडून ती कोकोत उपडी करतो. बंद करून खिशात टाकतो. बस. शांतपणे एवढी एकच हालचाल तो करतो आणि कप हातात धरून स्वस्थ उभा राहतो.

अण्णासाहेब सगळे कागदपत्र गोळा करून उभे राहतात.

सुभाष कप त्यांच्यासमोर ठेवतो. नेहमीच्याच पद्धतीने बेफिकीरपणे हसत म्हणतो, ''आणखी कप सांडला असता -''

केलेल्या धावपळीमुळे अण्णासाहेब अधिकच वैतागलेले. चमच्याने कोको ढवळीत ते ओरडतात - ''केशव - ए केशव - कधी पहिल्या हाकेला यायचा नाही-''

केशव येतो. सुभाषचा चहा घेऊन.

''ही शाई नीट पुसून घे.'' ते केशवच्या अंगावर ओरडतात.

सुभाष शांतपणे खिशातून सिगारेट काढतो. खोट्या नम्रतेने अण्णासाहेबांना म्हणतो - ''चालेल ना सिगारेट ओढली तर?''

''अरे, चालेल चालेल. तू म्हणजे मला काय अगदीच हा समजतोस?'' अण्णासाहेब हसत हसत म्हणतात.

पण पाचच मिनिटांत त्यांना वाटते, की आपण उगाचच सुभाषला परवानगी दिली. समोरून येणाऱ्या धुराने त्यांना कसेतरीच होऊ लागलेले. गरगरल्यासारखे वाटते...

हळूहळू धूर वाढतवाढत जातोय असे वाटते. त्या धुरामध्ये खोली अस्पष्ट होऊ लागते.

हळूहळू खोलीच्या भिंती पाण्यातून दिसणाऱ्या वस्तूसारख्या हलू लागतात. पुसट होतात स्पष्ट होतात...

धुरामध्ये एक लाल निखारा दिसतो - बहुधा सिगारेटचे जळते टोक -

पण त्यामागे चेहरा कुणाचा आहे?

हा सुभाष? पण सुभाषच का हा? मग तो आपल्याकडे रोखून कां पाहत आहे?

त्याचे डोळे बारीक बारीक होत शेवटी त्यांचे दोन लहानसे जळते निखारे होतात - लालभडक -

अखेरीस एकच जळते टोक -

या भिंती - हे सारे असे फेर धरल्यासारखे... केशव - काहीतरी निळेभडक काय ओरपीत बसला आहे?

निघाला-चालला... केवढा अजस्र वाटतोय - गेला - हा दरवाजा - नाही - ही भिंत...

आणि यातच हो एक वेदना - ? कुठून येतेय? छातीतून-पोटातून? मस्तकातून?

हाऽय - या ठिणग्यांतून - या जाळांतून कुठेतरी पळून जावं - ओरडावे - शब्द कां फुटत नाही - सारे लालभडक - आग... आगीच्याच भिंती... आगीचेच दार... तो जळता निखारा मस्तकात... आग... आग...

अण्णासाहेब खाली कोसळतात.

पिंजऱ्यातला पोपट फडफड फडफड पंख वाजवीत पिंजऱ्यातल्या पिंजऱ्यात धडपडतो. केशव धावतच त्याच्याजवळ जातो.

आणि त्याच वेळी त्याच्या कानांवर सुभाषची हाक येते -

"केशव - धाव! अण्णासाहेबांना बघ, काय झालं -"

नीला

अण्णासाहेबांच्या मृत्यूचा धक्का नीलाला बसतो - नाही असे नाही. परंतु ती त्यातून त्यामानाने लवकरच सावरते.

कदाचित एकुलती एक मुलगी असल्यामुळे असेल, पण एका दिवसात ती प्रौढ झाल्यासारखी वाटू लागते. घराचे कर्तेपण ती हातात घेते. कदाचित अण्णासाहेब गेल्यामुळे तिला एक चिंता मिटल्यासारखेही वाटत असावे.

आणि याबरोबरच ती एका विचारात बुडून जाते - अण्णासाहेबांचा खून कोणी केला?

अण्णासाहेब विषबाधेने मेले हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट असते. पोस्टमॉर्टेममध्ये 'स्ट्रिचनाइन' मिळते. कोकोच्या कपातही ते आढळते. कोकोतून ते दिले गेले, हे सिद्ध होते.

अर्थातच केशव पकडला जातो.

नीला काही बोलत नाही - बोलूच शकत नाही. पण खरा प्रकार काय झाला, हे तिला मनोमन समजलेले असते.

न राहवून ती सुभाषकडे जाते. सुभाषने अलीकडे एकट्यासाठी एक स्वतंत्र खोली घेतलेली आहे.

नीला येते, तेव्हा सुभाष आरामात पुस्तक वाचीत सिगारेट ओढत पडलेला असतो.

नीलाचा गंभीर चेहरा पाहून त्याला थोडे आश्चर्य वाटते. ही तीच नीला का - कालपर्यंत लहान मुलीसारखी चटकन् असहाय होणारी?

नीला ठामपणे विचारते - "सुभाष, अण्णांचा खून कुणी केला?"

सुभाष हसून खांदे उडवतो. "मला काय माहीत? खुनी शोधणं हे पोलिसांचं काम आहे." तो नेहमीच्याच बेफिकीरीने म्हणतो.

"तुला माहीत आहे, सुभाष. तुला चांगलंच माहितेय." नीला जेमतेम एवढे बोलते आणि इतका वेळ आणलेले तिचे अवसान एकदम गळून जाते. ती सुभाषच्या खांद्यावर डोके ठेवते आणि हलक्या आवाजात म्हणते - "मी कुणाला सांगणार नाही, सुभाष - पण मला तरी माहीत हवं. आपण दोघांनी एकमेकांना फसवता कामा नये, नाही का? सांग ना, सुभाष - तूच - तूच केलंस ना हे?"

सुभाष काहीच बोलत नाही.

"तू अण्णांच्या कोको पिण्याच्या वेळेस तिथं आलास. त्यांच्या कोकोत विष घातलंस, आणि नंतरच्या गडबडीत विषाची बाटली सहजपणे नाहीशी केलीस. बिचारा केशव - पोलिसांनी त्याला धरलंय."

"तो बोलणार नाही - त्याला काही माहीतही नाही." सुभाष सहजपणे म्हणतो. आणि "तो बोलो अगर न बोलो, कोर्टात केस त्याच्याविरुद्धच जाणार. माझा खुनाशी संबंध काय? केवळ त्या वेळी मी तिथं आलो, एवढाच योगायोग. विषाची बाटली माझ्याजवळ सापडली नाही; किंबहुना, माझ्याजवळचं स्ट्रिचनाइन संपलेलं होतं, हेच मी आदल्या दिवशी केमिस्टला पाठवलेल्या चिठ्ठीवरून सिद्ध होतं. माझे आणि अण्णासाहेबांचे संबंध अतिशय चांगले होते, हे सगळ्यांना माहीत आहे. त्यांचा खून करायचं मला काही कारणच नाही. याउलट, केशवला त्यांनी आजवर कसं वागवलं, याला सगळे साक्षी आहेत. संधी मिळताच केशव त्यांचा सूड घेऊ शकला असता. विषाची बाटली आयतीच त्याच्या हातात होती. त्या विषाचे गुणधर्म आमच्या बोलण्यात आले होते, हेही मी सांगू शकेन. म्हणजे केशवला त्या विषाची चांगली माहिती होती. शिवाय बाटली सील्ड नसते - नुसती बुचवाली... आयडिन्ची असते तशी! म्हणजे केशवला मोटिव्ह होता - संधी होती! आणि त्यानं ती घेतल्याचं सहज सिद्ध होऊ शकतंय! कारण विष कोकोच्या कपातच सापडलंय! कोकोचा कप केशवनेच आणला! वाटेत पोपटाच्या पिंजऱ्याकडे उभं राहण्याची त्याला सवय होती. तिथं उभं

राहून तो कप आणताना विष मिसळू शकला असता!''

''कोर्टात असंच सिद्ध होईल, सुभाष. कारण तू सगळ्या गोष्टींचा विचार करून हुषारीनंच खून केलायस. पण सुभाष - मला हे चांगलं वाटत नाही - आपल्यासाठी तो बिचारा निष्पाप माणूस फासावर लटकणार -''

''आता हे पोलिसांना जाऊन सांग की सुटलीस...'' पहिल्या प्रथमच शांतपणा थोडासा ढळून सुभाष म्हणतो.

''नाही रे? मी कशी कुणाला सांगेन? पण मनात येतं, ते सांगितलं. चूक एकट्या तुझीच नाही. मीच तुला भरीला पाडलं. तुझ्या पापात माझाही वाटा आहे -''

''पापपुण्याच्या गोष्टी सोडून दे, नीला. अग, या जगात माणसानं स्वत:पुरता विचार करावा. पीक हवं असेल तर सगळं तण उपटून काढावंच लागतं. दयामाया न ठेवता. आणि केशव निष्पाप आहे, म्हणजे काय? त्याच्यात माझ्याइतकी हुषारी नाही - अग, परोपकार करतं कोण? जो तो स्वार्थच साधत असतो. काहींना तो साधतो. काहींना नाही! केशवला जमलं असतं, तर त्यानंही इतकी वर्षं अण्णांच्या लाथाबुक्क्या खाल्ल्या नसत्या! पूर्वीच असलं काहीतरी करून दाखवलं असतं! पण बावळट माणसाला म्हणायचं, निष्पाप -''

नीलाच्या मनाची टोचणी काही केल्या कमी होत नाही. घरात तिला एकसारखी केशवची आठवण होत राहते. पोपट 'केशव-केशव' ओरडतो, म्हणून ती त्यालाही सोडून देते...

केशव

पोलीस लॉकअप्मध्ये ती त्याला भेटायला जाते, तेव्हा तिला पाहून तो हरखून जातो. तो तसे बोलत नाही, पण ती आल्यामुळे त्याचा चेहरा आनंदाने फुलतो.

ती त्याचे सांत्वन करते. त्याला म्हणते, ''केशव, अरे लोक काहीही म्हणोत. माझी खात्री आहे, की तू निष्पाप आहेस.''

''तू काळजी करू नकोस'' ती म्हणते. ''आपण चांगला वकील देऊ - तो तुला सोडवेल बघ. अगदी नक्की.''

केशव हसतो, ''वकील काय करणार?'' तो म्हणतो.

''काय करणार म्हणजे? सगळे साक्षीपुरावे काढून तो सिद्ध करील, की तू निर्दोषी आहेस.''

''मला निर्दोषी ठरवून दोषी कोणाला ठरवतील? सांगा ना -''

अचानक विचारलेल्या या प्रश्नाने ती दचकते. खरेच, या प्रश्नाचे उत्तर तिच्याकडे नव्हते. जे होते, ते देणे शक्यच नव्हते. ती कावरीबावरी झाली.

केशव तिच्याकडे रोखून पाहत होता.

- आणि एकदम तिच्या लक्षात आले की हा बोलत नाही, कदाचित कधीच बोलणार नाही. पण त्याच्या सारे लक्षात येऊन चुकले आहे - आपले सुभाषवरचे प्रेम, त्याला अण्णांचा विरोध - सारे सारेच.

''दोषी कोणी का असेना,'' त्याचे रोखून पाहणे टाळीत ती म्हणते - ''पण तू तर निर्दोष सुटशील-''

''मला सुटायचं नाही, नीलाबाई -'' केशव म्हणतो - ''कोर्टात खोटंनाटं करून मला सुटायचं नाही.''

''म्हणजे?''

''माणसानं करावं तसं भरावं. करूनच्या करून शिक्षेला कशाला भ्यायचं? मी अण्णासाहेबांचा खून केला - शिक्षा मलाच व्हायला हवी -'' केशव शांतपणे म्हणतो.

''तुझ्यावर आरोप आहे खुनाचा. पण खरोखर खून तू केला नाहीस, केशव -'' नीला तळमळून सांगते.

''मीच केला नीलाबाई, मीच केला. त्या दिवशी सुभाषसाहेबांसाठी ती बाटली आणली - मीच त्यातलं थोडं विष अण्णासाहेबांच्या कोकोत टाकलं.''

''नाही नाही - हे खरं नाही.'' आश्चर्याने नीलाचे डोळे विस्फारतात. ''तू कां करशील असं? केवळ अण्णा तुला मारायचे म्हणून?''

''नाही, नीलाबाई. माराचं काय, पोटाला तर तेच घालत होते! मारण्याबद्दल माझ्या मनात कधीच राग नव्हता. पण तुम्हाला - तुम्हाला दु:ख देत होते ते, नीलाबाई - ते - ते मला सहन होत नव्हतं. तुम्हाला सांगितलं तर राग येईल - पण मला - मला तुमच्याबद्दल पहिल्यापासून काय वाटतं, हे तुम्हाला नाही कळणार -''

''अरे पण केशव - मला -''

''नीलाबाई, तुम्ही आणि सुभाषसाहेब - जोडा कसा लक्ष्मीनारायणासारखा शोभतो. पण हे अण्णासाहेबांना पटत नव्हतं. म्हणून मी - मी म्हटलं आपण मेलो गेलो - कुणास काय त्याचं - पाचोळ्यासारखी

आम्हो माणसं - पण तुमच्यासारख्यांना आपला तेवढाच उपयोग झाला, तर आयुष्य साथकॊ लागेल... सुखॊ राहा नीलाबाई... तुम्ही आणि साहेब... विसरू नका गरिबाला...''

तिच्या डोळ्यांना धारा लागलेल्या. तो मात्र नेहमीसारखाच हसत... ते मोकळं - प्रसन्न - एखाद्या लहान बाळासारखं हसू...



रत्नाकर मतकरी

जन्म : १७ नोव्हेंबर, १९३८

रत्नाकर मतकरी यांची १६ फेब्रुवारी १९५५ रोजी आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून 'वेडी माणसं' ही एकांकिका प्रथम प्रसारित झाली. तेव्हापासून आजपर्यंत, साठ वर्षांहून अधिक काळ, त्यांची समृद्ध कारकीर्द बहरतेच आहे.

साहित्य, रंगभूमी, दूरदर्शन आणि चित्रपट या विविध माध्यमांतून त्यांनी लेखक, निर्माता, दिग्दर्शक आणि चित्रकार म्हणून काम केले आहे. नाटक, एकांकिका, बालनाट्य, कथा, कादंबरी, ललित लेख अशा वेगवेगळ्या साहित्यप्रकारांत त्यांनी दर्जेदार लेखन केले आहे. नाटकांचे लेखन, निर्मिती, दिग्दर्शन, नेपथ्य आणि संगीत यांची संकल्पना, वेषभूषा रेखाटन आणि अभिनय अशा विविध क्षेत्रांत त्यांनी आपली कामगिरी अत्यंत निष्ठेने बजावली आहे.

त्यांच्या पत्नी प्रतिभा मतकरी यांच्या मदतीने त्यांनी 'बालनाट्य', 'सूत्रधार' आणि 'महाद्वार' अशा तीन नाट्यसंस्था सुरू केल्या. प्रयोगशीलता, निर्मितीची अथक ऊर्जा, चैतन्य, उपक्रमशीलता; तसेच अंतर्मुखता आणि समाजाभिमुखता यांचे संतुलन हे रत्नाकर मतकरींच्या कलावंत-व्यक्तिमत्त्वाचे खास पैलू आहेत.

रत्नाकर मतकरी

रत्नाकर मतकरी यांचे साहित्य


कादंबरी

- अॅडम

गूढकथा

- स्वप्नातील चांदणे
- खेकडा
- कबंध
- संभ्रमाच्या लाटा
- फाशी बखळ
- निजधाम
- एक दिवा विझताना...
- निर्मनुष्य
- मध्यरात्रीचे पडघम
- रंगांधळा
- मृत्युंजयी
- संदेह






कथासंग्रह

- परदेशी

नाटक

- तनमन
- जादू तेरी नजर






"मनाची टोचणी चालूच होती.
आपण एका माणसाला मरू दिलं, फासावर लटकावलं,
हे मनाला खातच होतं. कुठंही दोरी दिसली, की ते सारं
आठवायचं. मग हाताचा चाळा सुरू व्हायचा.
सहज दोरीची गाठ मारली जायची. माझं वागणं
शहाणपणाचं नव्हतं, हे माझं मलाच कळत असे.
पण दोरी पाहिली, की ती रात्र डोक्यात फिरायची.
आणि घरात सगळीकडे दोऱ्या; चिकाच्या पडद्याला दोरी,
ताक घुसळायला दोरी, अंघोळ करायला घरामागच्या
विहिरीवर जावं, तर चांगला जाडजूड दोरखंड.
त्या दोरखंडाचा गच्च फास कळशीभोवती आवळताना,
ती रात्र डोळ्यांसमोर यायची. जीव गलबलायचा.
मी रहाट गडगडत सोडून द्यायचा आणि तळापासून
थोड्या अंतरावर कळशी तशीच लोंबकळत ठेवायचा.
अधांतरी... फाशी गेलेल्या माणसासारखी."

गूढकथेला मानवी मनाचे कंगोरे देणाऱ्या आणि त्यामुळेच
मराठी कथासाहित्यात अढळपद मिळवणाऱ्या,
रत्नाकर मतकरी यांच्या कथांचा आगळावेगळा संग्रह.







कथासंग्रह

₹ 120
ISBN-
9788177664503
9 788177 664503

Follow us

e-Book Available

www.mehtapublishinghouse.com
मेहता पब्लिशिंग हाऊस